
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



# राव[illegible]ी कविता

REFBK-0011990

मराठवाडा साहित्य परिषद प्रकाशन

# रावसाहेबांची कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

REFBK-0011990

मूल्य : ४-००

मराठवाडा साहित्य परिषद्

मराठवाडा साहित्य परिषद् प्रकाशन

प्रकाशक :

**मराठवाडा साहित्य परिषद**

औरंगपुरा, औरंगाबाद.

जानेवारी १९६१

मूल्य : चार रुपये

मुद्रक : जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
मालक : भारत मुद्रक आणि प्रकाशक
लि. सराफा, औरंगाबाद.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...३५३८८... विः ...काव्य...
क्रमांक ...१६७... नों: दि: ......

## प्रकाशकाचें पान

मराठवाडा साहित्य परिषद् आणि रावसाहेब र. ल. जोशी यांच्यांत अतिशय आत्मीयता आणि जिव्हाळा होता. त्यांच्या हयातींतच त्यांच्या काव्यसंग्रहाचें प्रकाशन परिषद् करणार होती. परंतु खंडकाव्याचा आग्रह आणि आज उद्यां म्हणतां म्हणतां तो योग पाहिजे होता तसा येऊं शकला नाहीं ४·८–५८ ला रावसाहेबांचा अंत झाला आणि आज त्यांच्या काव्यसंग्रहाचें परिषद् प्रकाशन करीत आहे.

या प्रकाशनाच्या कामीं परिषदेजवळ पत्रव्यवहाराशिवाय कांहीं साधन नव्हतें. परंतु रावसाहेबांच्या कुटुंबियांनीं श्रीमती सुंदराबाई जोशी, सौ प्रभावती जोशी पुणें, डॉ. सौ. सोनूताई कॅनरन् विकाराबाद, यांनीं आपणांस शक्य असलेली सर्व माहिती परिषदेला पुरविली. तसेंच

श्री. दे. ना टिळक आणि अशोक टिळक या पिता-पुत्रांनींहि आपल्या-जवळील रावसाहेबांचा पत्रव्यवहार आणि माहिती परिषदेला पाठविली. या सर्व सुहृदांच्या साह्यानें आज हा काव्यसंग्रह परिषद् प्रकाशित करीत आहे. रावसाहेबांचा मराठीच्या दरबारीं असलेला मान आणि जिव्हाळा शारदेच्या दरबारांतील त्यांचें निर्विवाद स्थान, याचा विचार करतां प्रकाशक म्हणून प्रस्तुत संग्रहाचें रसिकांनीं स्वागत करावें अशी तिऱ्हाइत-पणाची व औपचारिक विनंतीच कशाला हवी? मराठी मन इतकें अनुदार आणि परकें थोडेंच आहे? परिषदेनें मराठवाडा विद्यापीठास ज्या पुस्तकांच्या प्रकाशनाबाबत अनुदानाची विनंति केली होती आणि विद्यापीठानेंहि अनुदान देऊन आपली गुणग्राहकता व्यक्त केली त्या प्रकाशनांपैकीं हें १ लें प्रकाशन आहे. मराठवाडा विद्यापीठाच्या या प्रोत्साहनाबद्दल परिषद् व संपादक त्याचे आभारी आहेत.

त्याचप्रमाणें वरील प्रकाशनासाठीं भारत सरकारच्या सांस्कृतिक खात्यानेंहि अनुदान देऊन परिषदेचा उत्साह वाढविला याचा कृतज्ञता-पूर्वक निर्देश करणें परिषदेचें कर्तव्य आहे.

**मराठवाडा साहित्य परिषद्.**



ख्रिस्तवासी रावसाहेब र. लु. जोशी

॥ श्री ॥

# रावसाहेब र. लु. जोशी

१८५७ सालचें बंड म्हणा, स्वातंत्र्ययुद्ध म्हणा,– हा आपापला दृष्टिकोन आहे– संपून १८ वर्षे झालीं आणि मार्च २ तारखेस नाशिक जवळील शरणपुरांत रेव्हरेंड लुकस मलोबा जोशी यांच्या पोटीं रावसाहेबांचा जन्म झाला. रावसाहेबांचें मूळ घराणें भगूरचे रहिवाशी! लुकस मलोबा जोशी यांचे मूळ नांव विठोबा मलोबा जोशी. हे भगूरचे पाटील किंवा कुळकर्णी असे कांहींतरी होते. घरीं माया चांगलीच होती आणि खेरीज वडिलांना हे एकुलते एक! मात्र ख्रिस्ती धर्माचा अभ्यास आणि विचार पूर्णपणें केल्यानंतर धर्म ही आपल्या वैयक्तिक व आध्यात्मिक आर्ततेची बाब अशा भावनेनें विठोबा जोशांनीं ख्रिस्ती धर्मात आपल्या मनःशांतीचा साक्षात्कार प्राप्त करून घेतला आणि ते दीक्षा घेऊन ख्रिस्तानुयायी बनले. त्या काळाचा विचार केला असतां हिंदु समाजांतून विशेषतः स्पृश्य समाजांतून ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेऊन बाहेर पडणें अतीशय भयंकर कृत्य समजलें जात असे. वडिलार्जित इस्टेटीवर आपल्या हातानें पाणी सोडून मोकळें होणें, आप्त-स्वकीयांच्या प्रेमाला पारखे होणें इतकेंच नव्हे, तर समाजाच्या तिरस्काराचा कायमचा विषय बनणें या सर्व सामाजिक शिक्षा आजन्म भोगाव्या लागत. धर्मांतर हें व्यक्तिजीवनांत असिधाराव्रत होतें. परंतु विठोबा मलोबा जोशी यांनीं आपल्या आध्यात्मिक साधनासाठीं या व्यावहारिक दिव्याशीं आनंदानें टक्कर दिली व ते ख्रिस्ताचे एकनिष्ठ अनुयायी बनले. यांचें इंग्रजी ज्ञान किती होतें हें कळण्यास आज साधन नाहीं. परंतु पदवीचा पासपोर्ट

नसतानांहि इंग्रजी भाषेवर त्यांचा चांगलाच अधिकार होता. ख्रिस्ति धर्मग्रंथांचा अभ्यास त्यांनी अतीशय सखोल केलेला होता. त्याकाळीं जिल्हाधीश - कलेक्टर्स - हे युरोपियन (गोरे) असत. विठोबा मलोबा जोशी हे नुसते विद्वान ख्रिस्तभक्त म्हणूनच नव्हे तर ‘ रेव्हरंड ’ म्हणूनहि मान्यता पावले होते. माले्गांवला इंग्लिश चर्च आणि तेथें गोरे मिशनरी असतांना सुद्धां तेथील गोऱ्या कलेक्टरानें आपल्या मुलाचा बाप्तिस्मा विठोबा जोशी म्हणजेच रें. लुकस जोशी यांच्या हातानें करवून घेतला. ही गोष्ट त्यांच्या ज्ञान आणि विचारसंपन्न अशा व्यक्तिजीवनाची साक्ष देण्यास पुरेशी आहे.

देवळालीला गोऱ्या पलटणीची मोटी छावणी होती. त्यांच्यासाठीं तेथें एक मोठें चर्चहि बांधण्यांत आलेलें होतें. देवळालीच्या चर्चमधील चॅपलीन जर कोठे परगांवीं गेलेला असला, तर तेथील इंग्लिश सर्व्हिस घेण्याचें काम विठोबा जोशांना म्हणजेच रे. लुकस जोशांना करावें लागे. यावरूनहि त्यांच्या पुरोगामी आणि विचारी व्यक्तित्वाची ग्वाही आपणांस पटूं शकते.

रेव्हरंड लुकस जोशी– रावसाहेबांचे वडील–हे आपल्या भोंवतालच्या समाजांत अतीशय धार्मिक आणि सुधारणाप्रिय विचारांचे फार थोर पुरुष म्हणून ओळखले जात. यांना पांच पुत्र झाले. सर्वांत वडील कॅनन डी. एल्. जोशी, यांचें सर्व आयुष्य मुंबईंतच गेले. यांच्यानंतर १० वर्षांनी दुसरे चिरंजीव प्रा. सॅम्युअल एल्. जोशी यांचा जन्म झाला. हे बडोदा कॉलेजमध्यें १२ वर्षें प्राध्यापक म्हणून राहिल्यानंतर Exchange प्रोफेसर म्हणून अमेरिकेला गेले आणि शेवटपर्यंत तिकडेच राहिले. तिसरें चिरंजीव रेग्युएल एल्. जोशी– म्हणजेच आपणा सर्वांना ठाऊक असलेले रावसाहेब जोशी–! चौथे डॉ. लेम्युएल एल्. जोशी हे बी. एससी. होऊन अमेरिकेला गेले आणि डॉक्टर बनले. तेथून परत आल्यानंतर केमिकल ॲनलायझर टु गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे म्हणून त्यांची नियुक्ति झाली. ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें ते प्राध्यापक म्हणूनहि काम करीत. मात्र हे वयाच्या ४५ व्या वर्षींच स्वर्गवासी झाले. पांचव्या चिरंजीवांनाहि आयु-

ष्याचा तुटवडा जाणवला. कारण ते अमेरिकेहून शेतकी विषयांत पारंगत होऊन परत आले आणि त्यांची इहलोकीची यात्रा संपली. रेव्हरेंड लुकस जोशांचे तिसरे चिरंजीव म्हणजे आपले रावसाहेब जोशी.

रावसाहेबांच्या बाल आणि विद्यार्थी जीवनाविषयीं तशी फार कमी माहिती आहे. एखाद्या वेळीं आपल्या मुलांबाळांना आठवणी सांगतांना म्हणून जें कांहीं त्यांनीं सांगितलें तेवढेच या बाबतींतील साधनसूत्र। अशा आत्मकथनाचा मागोवा घेतांना असें कळतें कीं, रावसाहेबांचा जन्म शरणपुरांतच (२ मार्च १८७५) झाल्यानें त्यांचें प्राथमिक शिक्षणहि तेथेंच झालें. रे. लुकस जोशी हे कांहीं वर्षें औरंगाबादीं येऊन राहिले होते. तेव्हां रावसाहेबांच्या प्राथमिक शिक्षणाची कांहीं पाउलें त्यांना येथें औरंगाबादेंत टाकावीं लागलीं : येथून पुढे ते मुंबईला मनी स्कूलमध्यें गेले. या वेळीं त्यांचें वय साडेबारा वर्षांचें होतें. या वेळची एक आठवण गंमत म्हणून ते आवर्जून सांगत असत. मनी स्कूलमध्यें गेल्यानंतर तेथें एका मुलानें यांना विचारले 'तुझं वय काय?' रावसाहेबांनीं अगदी भाबडेपणाने उत्तर दिलें. "I am half past twelve." तो मुलगा हंसत निघून गेला. दुसरा मुलगा आला. त्यानेंहि तोच प्रश्न विचारला आणि यांनी पहिलेंच म्हणजे 'Half past twelve' हेंच उत्तर दिलें. मुलें हंसत होतीं आणि वरचेवर नवीं मुलें येऊन तोच एक प्रश्न विचारून व रावसाहेबांचें भाबडें उत्तर ऐकून हंसत जात होतीं. आपल्या उत्तराला हीं मुलें हंसतात कां तें रावसाहेबांच्या बालबुद्धीला कळेना. ते चिडले आणि मुख्याध्यापकाकडे गाऱ्हाणें घेऊन गेले. तेथेंहि एकच हंशा पिकला. मात्र– मुख्याध्यापकांनी अतिशय प्रेमळपणें त्यांना त्यांची चूक समजावून सांगितली.

औरंगाबाद, मुंबई येथील शिक्षणानंतर त्यांना हैदराबादीं जावें लागले आणि तेथील निजाम कॉलेजमध्यें रावसाहेबांचा पुढील अभ्यास प्रारंभ झाला. येथें ते इंटरपर्यंत शिकले. हैदराबादेच्या मराठी भाषिक समाजांतील प्रख्यात पुढारी श्री. वामनराव नाईक आणि ख्यातनाम डॉक्टर गोरक्षकर हे त्यांचे वर्गबंधु होते.

शिक्षण संपल्यानंतर रावसाहेब मुंबईला आले आणि २५ रुपयांवर पोस्ट खात्यांत त्यांची पहिली नेमणूक झाली. धर्मानें ख्रिस्ति आणि आडनांव मात्र जोशी या कारणासाठी आरंभी आरंभी लोक त्यांची खूपच टिंगल करीत. बाट्या म्हणून हिणवीत. परंतु आपल्या शांत आणि धीरोदात्त स्वभावानें, रावसाहेबांनी हें सर्व हलाहल पचवून टाकलें. आणि आपल्या प्रेमळ, परोपकारी आणि दयाळू व्यक्तित्वानें, याच भोंवतालच्या टवाळखोरांतून प्रेमळ आणि प्रामाणिक मित्र निर्माण केले. प्रत्येक आपत्ग्रस्ताला शक्य तों साह्य करण्याचें रावसाहेबांचें जन्मजात व्रत असल्याने त्यांचा मित्रपरिवार दर दिवशीं वाढत गेला आणि त्यांची टवाळी करणारेच त्यांचे जिव्हाळ्याचे स्नेही बनले.

मुंबईच्या पोस्ट ऑफिसमधून पोस्ट मास्तर म्हणून रावसाहेबांना जेंव्हा बाहेर गांवीं जाण्याची पाळी आली तेव्हां तेथील त्यांच्या कार्यालयीन मित्रांनी रावसाहेबांना एक जंगी ‘ निरोप ’ दिला. या कार्यक्रमांत सर्व जाती आणि पंथाचे लोक होते. तेथील पोस्ट ऑफिसमध्यें अशा प्रकारचा हा पहिलाच समारंभ होता. आपल्या सहकाऱ्यांचीं अंतःकरणें रावसाहेबांनी अक्षरशः जिंकलीं होतीं. या आपल्या जिव्हाळ्याच्या साह्यकर्त्याला आपली आठवण सतत रहावी म्हणून पोस्ट ऑफिसच्या सर्व कार्यकर्त्या सहकारी बांधवांनी, रावसाहेब आणि त्यांच्या पत्नी सौ. सुंदराबाई या दोघांना एकेक सोन्याची आंगठी दिली. रावसाहेबांना देखील आपल्या या सहकारी मित्रांच्या विषयीं इतका जिव्हाळा होता कीं ही आंगठी त्यांनी आमरण आपल्या हातांतून दूर केली नाहीं. आणि पोस्ट कामगारांच्या हितसंबंधाबाबत प्रत्येक वेळीं मार्गदर्शनास ते कधीं चुकले नाहीत.

रावसाहेबांच्या जीवनांत अनेक स्थळांचा सहवास आला आणि त्यांचें मित्रवर्तुळ वाढत गेलें. १९५४ मध्यें पोस्टमास्तर म्हणून ते नाशिकला गेले. तेथून त्यांची बदली सोलापूरला झाली आणि पुढे सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांचें वास्तव्य हैदराबादींच राहिलें. हैदराबादेच्या त्या परिस्थितींत राजकारणाचा तर वासहि खपणें अशक्य होतें.

साहित्याच्या क्षेत्रांतहि अनंत बंधनें आणि अडचणी असत. हैदराबाद संस्थानांत स्वतंत्र पोस्टखातें असल्यानें भारताच्या टपाल खात्याचीं केवळ १४ कार्यालयें तेव्हां हैदराबाद राज्यांत होतीं. रावसाहेबांची नोकरी भारत सरकारची असल्यानें त्यांना संस्थानी सरकारचें विशेषसें सोयीर-सुतक पाळण्याचें कारण नव्हतें. ही जरी वस्तुस्थिति असली तरी पण स्थानिक मराठी भाषिकांत कांहीं कार्य करावयाचें म्हणजे सरकारी अडथळ्यांचें अस्तित्व हमखास जाणवे. परंतु अशाहि अडचणीच्या परिस्थितींत महाराष्ट्र साहित्य संमलनाचें १६ वें अधिवेशन रावसाहेबांच्या धीरोदार आणि चिकाटीच्या सहकार्यानें, ज्ञानकोशकार डॉ. केतकरांच्या प्रभावी अध्यक्षतेखालीं शंभर टक्के यशस्वी झालें. इतर कार्यें बरींचशीं झालेलीं असलीं तरी परिषद् संमेलन वाद निकालांत काढण्याच्या दृष्टीनें यशस्वी प्रयत्न या वेळीं झाले. पुढे कैक वर्षेपर्यंत संमेलनाच्या पाहुण्यांना त्या वेळीं खाल्लेल्या पक्वान्नाचे ढेकर येत होते आणि दरबारी वैभवाच्या गाद्या गिरद्यांच्या आठवणी होत होत्या. सरकार आणि जनता यांच्या मधील महत्त्वपूर्ण दुवा सांधून कार्याची नौका यशस्वी रीतीनें पार नेण्यास रावसाहेबांचें कुशल धुरीणत्व आणि सहकार्य प्रामुख्यानें उपयोगी पडलें. हें सर्व संमेलन सहकाऱ्यांनी एकमुखानें मान्य केलें होतें.

आपल्या सरकारी नोकरीची मुदत यशस्वी रीतीने पूर्ण करून त्यांनी पेन्शन मिळविलें. रावसाहेबांना निसर्गोपचार पद्धतीची चांगलीच माहिती आणि गाढ व्यासंग होता. नोकरीच्या आयुष्यांत सुरतेला असतांना तेथील स्नेही मित्रांना त्यांनी सुरतेला परत एकदां येण्याचें कबूल केलें होतें. आपल्या शब्दाच्या परिपालनासाठीं रावसाहेबांनी आपल्या पेन्शनीचा कांहीं भाग विकून रकम उभारली आणि सुरतेला निसर्गोपचार पद्धतीचें एक आरोग्य मंदीर उठाविलें महाराष्ट्र मंडळाची स्थापना केली आणि यशस्वी रीतीने गणेशोत्सव साजरा केला. मात्र रावसाहेबांचें हें आरोग्यमंदीर यशस्वी झालें तरी व्यावहारिक दृष्ट्या स्थिर आणि लाभदायक होऊं शकलें नाहीं. याला रावसाहेबांचा परोपकारी, मायाळू आणि प्रेमळ स्वभाव प्रामुख्यानें कारण होता. अर्थात थोड्याच

काळांत तें बंद करणें भाग पडलें. व्यावहारिक स्थिरतेचा प्रश्न असा निकालांत निघाल्यानंतर श्री. धनंजयराव गाडगीळांसारख्या सन्मित्रांच्या सल्ल्याप्रमाणें रावसाहेबांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याची धुरा उचलली. एप्रिल १९३६ पासून डिसेंबर १९४२ पर्यंत म्हणजे उणींपुरीं सात वर्षें रावसाहेबांनी परिषदेची सर्वांगीण स्थिरता आणि उत्कर्ष यासाठीं आपली वृद्ध काया शिणविली सभासदांची अडीचशे असलेली प्रारंभीची संख्या एक हजारापर्यंत नेली. डॉ. माधवराव पटवर्धन स्मारकाचें कार्य यशस्वी रीत्या शेवटास नेलें आणि परिषदेला एका पद्धतशीर कार्यमार्गावर स्थिर केलें. परिषदेचें कार्य सोडल्यानंतर रावसाहेब आपल्या कुटुंबासुद्धां विकाराबादीं येऊन राहिले. तें शेवटपर्यंत तेथेंच होतें. मात्र येथें असतांनाहि त्यांचें जाणें येणें, पुण्यामुंबईला आणि नेहमींच हैदराबादला होत असे. मराठवाडा साहित्य परिषदेशीं व तिच्या कार्यकर्त्यांशीं रावसाहेबांचे संबंध अतिशय आपुलकीचे व जिव्हाळ्याचे झालेले होते. रावसाहेबांच्या या उत्तर आयुष्यांतच त्यांच्यावर सरस्वतीचा महाप्रसाद झाला आणि ते मराठीचे महाकवि बनले.

'मी साहित्यिक नाहीं' असें आवर्जून म्हणणारे रावसाहेब अखेरीला महाकवि बनले हा कशाचा परिणाम ? आपल्या एका पत्रांत ते श्री. दे. ना. टिळकांना लिहितात, "साहित्यिकांच्या सहवासामुळें माझ्याठायीं काव्यशक्ति निर्माण झाली आहे असा तुमचा चुकीचा समज झाला आहे. साहित्य परिषदेंत साहित्यिकांच्या कलागती मिटविण्यांत व संस्थेचें नित्याचें कार्य पार पाडून तिची घडी नीट बसविण्यांत माझा सात वर्षांचा सारा वेळ खर्च झाला. नित्याचें वाचनदेखील बंद पडलें होतें." (२८-२-५३). रावसाहेबांच्या रोमरोमांत मराठी व महाराष्ट्र यांचा डोळस अभिमान भरलेला होता. घरांतील वातावरणाचा परिणाम बाळपणींच मराठी साहित्याच्या जिज्ञासू विद्यार्थ्याची भूमिका तयार करण्यांत झाला. ते म्हणतात, "रसिकाची भूमिका निर्माण करण्याचें कार्य माझ्या ज्येष्ठ बंधूंनी केलें. नांदगांवच्या मिशन शाळेंत ते माझे शिक्षक होते. कविता समजावून सांगण्याची त्यांची हातोटी चित्तवेधक होती. घरी मुक्तेश्वर, श्रीधर,

तुकाराम इत्यादिकांच्या कविता ते तन्मयतेनें पठण करीत असत. पुढें मलाहि तो नाद लागला. इतका कीं, एफ. ए. च्या परीक्षेसाठीं संस्कृत सोडून मी मराठी हा विषय निवडला." मराठीच्या वैशिष्टयपूर्ण प्राचीन काव्याचा रावसाहेबांनीं चांगलाच व्यासंग केलेला होता. भावमधुर रसिक अंतःकरण तयार होतें. मात्र कविता करणें हा योग इतरांच्या प्रमाणेंच त्यांच्याहि कल्पनेबाहेर होता. ते लिहितातच "कविता करतां येईल असें मला स्वप्नांत देखील वाटलें नव्हतें. सत्तरीनंतर एकाएकी कविता बाहेर पडूं लागली याचें माझें मलाच आश्चर्य वाटलें. शब्द कोठून येतात व कसे चपखल बसतात याचा विचार करूं लागले म्हणजे हा चमत्कार आहे असा भास होतो. ईश्वरी-प्रसाद आणि टिळकांच्या कवितेचा प्रभाव हे या चमत्काराला कारणीभूत झाले आहेत असें निश्चित वाटतें." (१४-३-५३). "माझ्या काव्याचें स्फूर्तिस्थान एकच व तें म्हणजे टिळकांची कविता. टिळकांचेच सूर माझ्या कवितांतून मधून मधून ऐकूं येतात." (२८–२–५३)

धर्मानें ख्रिस्ति असून सुद्धां मराठी आणि महाराष्ट्र यांच्या बाबतींत रावसाहेबांजवळ तडजोड नाहीं. धर्मांतर केलेल्या लोकांच्याविषयीं हिंदु समाजांत जो दुजाभाव आणि परकेपणा तेव्हां होता आणि क्वचित् आजहि आढळतो, त्याबद्दल रावसाहेबांची भूमिका अतीशय पुरोगामी आणि तर्कशुद्ध होती. ते लिहितात, "हिंदु पत्रांतून नाताळविषयक लेख आल्याचें समजून मला आश्चर्य वाटत नाहीं. जेत्यांचा धर्म म्हणून ख्रिस्त या नांवाचा पूर्वीं असलेला तिटकारा आतां नाहींसा झाला आहे. निर-निराळ्या कवितांतून ख्रिस्ताविषयीचे उल्लेख व पूज्यभाव व्यक्त होत आहेत. ख्रिस्ताचें चारित्र्य व बोल असे आहेत कीं ते भक्तिरसानें ओथंब-लेल्या महाराष्ट्र मनाचा चटकन ठाव घेतील. माझ्या मित्रमंडळींत कारण-परत्वें ख्रिस्ताचा उल्लेख आल्यास ते त्याजविषयीं किती आदरानें बोलतात याचा मला अनुभव आला आहे. ख्रिस्ती समाजाविषयीं मात्र त्यांचें मत बरें नाहीं ख्रिस्ती लोक हिंदु संस्कृतीचे द्वेष्टे आहेत असा त्यांचा समज झाला आहे व त्याला कारणेंहि आहेत. (याच विषयाबाबत श्री.

दे. ना. टिळकांना ते लिहितात- ) 'एक उपेक्षित द्रष्टा' हें पुस्तक लिहून प्रसिद्ध करण्यास तुम्हास खिस्ती समाजाची भीती वाटते. हें पाहून मन खिन्न झालें! या आडांतल्या बेडकांच्या रटरटीला तुम्ही भीक कां घालतां? सारा महाराष्ट्र समाज तुमच्या पाठीशी आहे हें चांगलें लक्षांत ठेवा. "**धर्मान्तर म्हणजे समाजान्तर नव्हे.**" हें तत्व त्या समाजाला चांगलें पटलें म्हणजे थोड्याच अवकाशांत खिस्ताचे अनेक निष्ठावंत हिन्दु अनुयायी निर्माण होतील. अशी माझी श्रद्धा आहे. त्यांची आध्यात्मिक भूक भागविण्याचें सामर्थ्य खिस्ताच्या तत्वज्ञानांत आहे. या भावी गटाच्या प्रभावामुळें पाश्चात्यांचा ( Cocksuredness ) व त्यामुळें आलेली ( rigidity ) लुप्त होईल." ( २८–२–५३ )

रावसाहेबांच्या कवि बनण्याचाहिं एक फार मोठा चमत्कार आहे. मराठीचा व्यक्तिशः त्यांनी अभ्यास केलेला होताच परंतु आपण 'कवि' बनूं हें त्यांनाहि कधीच संभवनीय वाटलें नव्हतें. अशा अवस्थेंत वयाची सत्तरी उलटलेली असतांना एके दिवशीं तापाचा जोर चढतो काय आणि त्या कहालीच्या अवस्थेंत काव्याचे सूर शब्दरूप घेऊन खडे होतात काय! साराच चमत्कार!! उतरत्या वयोमानांत आठवणीचा भाता बहुतेक रिकामा होत असतो. परंतु रावसाहेबांच्या बाबतींत तेंहि एक आश्चर्यच आहे. काव्यगायनाच्या कार्यक्रमांस त्यांनी कधीं आपल्या वह्यांचें ओझें वागविलें नाही. जें काय असेल तें सर्व डोक्यांत तयार. अमक्या कवितेची आठवण नाहीं हें रावसाहेबांनी कधीच म्हटलें नाहीं. आठवणीचा अक्षय भाता सदैव भरलेला असे. स्फुट कवितांपासून खंड-काव्याच्या प्रदीर्घ रचनेपर्यंत कांहींहि ऐका. सर्व जिभेवर तयार असे. आजच्या तरुण पिढीला, त्यांच्या विसराळु प्रकृतीबद्दल ते कितीदा तरी गमतीने चिडवीत.

रावसाहेबांच्या काव्यरचनेला खंडकाव्यापासून प्रारंभ झाला हाहि एक चमत्कारच म्हणावा लागेल. 'अद्भुत द्वंद्वयुद्ध' या त्यांच्या दीर्घ काव्याचें मुद्रण प्रस्तुतच्या संग्रहांत झाललें आहे. मात्र त्यांच्या संकल्पित खंडकाव्यांत 'दिव्य यज्ञ' हेंहि एक खंडकाव्य होतें. पण तें प्रत्यक्षांत

साकारूं शकलें नाहीं. ते एका पत्रांत म्हणतात, " दिव्य यज्ञ " या आगामी काव्याचे सूर कधी कधी लागत असतात. असेच सूर काल दिवशीं लागून पृथ्वीवृत्तांत एक कविता गुंफली गेली. पृथ्वीवृत्ताचे गण फार त्रासदायक आहेत. तशांत माझी प्रकृति शार्दुल विक्रीडित वृत्ताची. तेव्हां गुंफण चालू असतांना वाणीचा प्रवाह पदोपदीं अडखळूं लागला. पण करणार काय ? " दयार्ततम वैखरी " हा श्लोक प्रथम पृथ्वीवृत्तांत स्फूर्त झाला व मग मला निमूटपणें त्या वृत्ताचा अवलंब करणें भाग पडलें. माझा मराठी भाषेचा अभ्यास पद्धतशीरपणें झाला नसल्यामुळे मजकडून भाषेच्या व व्याकरणाच्या चुका होण्याचा संभव आहे. " ( २७-६-५७ )

रावसाहेबांचा स्वभाव अतीशय चोखंदळ आणि चौकस. ते म्हणत 'तुम्हा साहित्यिकांचा कारभार भोंगळ असतो. मी पोष्टाचा मनुष्य आहे. मला असें पटत नाहीं. काटेकोरपणाने सर्व गोष्टी व्यवस्थित, जेव्हांच्या तेव्हां आणि नीटनेटक्या झाल्या पाहिजेत. ही पोष्टाची प्रकृति आहे.' याचा अनुभव त्यांच्या पत्रव्यवहारांतहि येत असे. एखादी कविता उतरून पाठवितांना त्यांतील नवीन शब्दांच्या अर्थ टीपा, व्याकरणाचीं रूपें यांचा ते कवितेच्या शेवटीं आवर्जून निर्देश करीत. एवढ्याशा गोष्टीने काय होतें ही चालढकलीची भाषा त्यांना ठाऊक नव्हती. आपलें खंडकाव्य लवकर पूर्ण करा हा लकडा जेव्हां त्यांच्या मागें लावला जात असे तेव्हां ते म्हणत " खंडकाव्याला विलंब लागण्याचें मुख्य कारण म्हणजे तें गुंफलें जात असता मधेंच अन्य सूर येऊन एखादी स्फुट कविता होई. असें झालें म्हणजे विषयाचा धागा सुटे. एखादें कार्य हातीं घेतलें म्हणजे सारें सोडून त्याच्या मागें लागावयाचें हा माझा प्रकृतिस्वभाव. पण कवितेच्या बाबतींत हें पारडें उलटें झालें आहे व मी नादिष्ट होत चाललों आहे ! दोनच दिवसांमागें मागच्या चैत्रांत पाहिलेलें दृश्य तरळूं लागून सूर निघाले. सूर्य अस्तास गेला आहे, चतुर्दशीचा चंद्र वर आला आहे, कापसासारखे पांढरे शुभ्र ढग जमले आहेत, मंद वाऱ्याची झुळूक त्यांची पिंजण करीत आहे,असें तें मनोहर दृश्य होतें.

पूर्वेची कड सारुनी ढकलिला कोणी वरी गोल हा
मेघांचे नभिं शुभ्र पुंज जमले ज्याची कराया चहा

\+ \+ \+

पिंजारी बसला अदृश्य गगनीं कापूस पिंजावया
निर्नादें हलकें फिरे धनुकली वायूसवें लीलया

हे सूर तूर्त वाऱ्यावर टांगून ठेवले आहेत. यापूर्वीं झालेल्या ४।५ कवितांचीहि अशीच विल्हेवाट लावली आहे. खंडकाव्य पुरें झालें म्हणजे तें हस्तगत करण्याचा प्रयत्न होईल. स्फूर्त झालेले पाठ तसेच राहतील किंवा नाहीं याची शंका असते. कधीं कधीं नंतरच्या गुणगुणण्यांत शब्द यंत्रासारखे भराभर बदलले जातात." (२८–२–५३) खंडकाव्याची गुंफण चालू असतांनाच त्यांच्या स्फुट कवितांच्या फुलांचा ताटवा मोहरत होता.

रावसाहेबांच्या काव्याचा साकल्यानें विचार केल्यास मराठी आणि महाराष्ट्र यांचा डोळस अभिमान हा त्यांतील स्थायीभाव दिसतो. शक्य तेवढ्या प्रकारांनी आणि पर्यायांनी त्यांनी आपल्या या मातृदैवतांची पूजा केलेली आहे. विशेषतः त्यांच्या तोंडून या कविता ऐकत असतांना आत्माभिमानाचा जीवंत साक्षात्कार त्यांच्या स्वरांत व डोळ्यांत ठसठशीतपणें होत असे आणि त्यांच्या 'कविता झाली' या शब्दांचें मर्म तेव्हां ध्यानांत येत असे. ते कविता करीत नसत. त्यांना कविता होत असे, स्फुरत असे आणि म्हणूनच त्यांच्या जिव्हाळ्याच्या आत्मानुभवानें त्यांचे शब्द ओलेचिंब असलेले आपणांस दिसतात.

मराठीच्या संसाराची घडी चांगल्या प्रकारें बसावी या बाबतींत रावसाहेबांनी जे परिश्रम उपसले ते सर्वमान्य आणि अजोड असे आहेत. रावसाहेबांनी उपसलेले कष्ट हे मराठीच्या आस्थेवाईक भक्तापासून साहित्योपासकापर्यंत सर्वांना सारखे मान्य आहेत. साहित्यिकांची एक संपूर्ण पिढी त्यांच्या परिचयाची आणि प्रेमाची असल्यानें सर्वांना त्यांच्या प्रामाणिक कर्तव्यतत्परतेची पुरेपूर जाणीव असलेली दिसते. आयुष्याच्या

क्रमांक ...-११-... नों. दि. ...

उत्तरार्धांत त्यांच्यावर झालेला शारदेचा महाप्रसाद हाहि सामान्य नव्हे. मधून मधून आपल्या कवितांचे उतारे रावसाहेब अनेकांना लिहून पाठवीत असत. अशाच एका प्रसंगीं साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी त्यांना पुढीलप्रमाणें उत्तर लिहिलेलें आहे.

श्री. पुणें, १२-४-४६

रावसाहेब जोशीं यांस, कृ. सा. न. वि. वि. आपलें पत्र व कवितांचा उतारा पोंचला. त्यांचा उपयोग सवड होतांच करीन. आपल्या ठिकाणीं काव्याचा झरा आतां फुटला आहे. तो असाच वहात राहूं द्यावा. त्याला बूच घालूं नये. कळावे. न. चिं. केळकर.

परिषदेच्या कार्यांत अनेकांगी सावधपणा बाळगून आपसांतील मत-भेदाची तीव्रता कमी करण्याचा रावसाहेबांचा सतत प्रयत्न असे. अशाच एका प्रसंगीं अत्रे-माटे वाद विकोपाला जाऊं नये म्हणून रावसाहेबांचे प्रयत्न चालू असतांना त्यांना डॉ. माधवराव पटवर्धन यांनी पुढील पत्र लिहिलें आहे.

कोल्हापूर-शाहुपुरी, १४-८-३९

प्रिय रावसाहेब, आपण अगत्यपूवक पत्र पाठवून माझ्या प्रकृतीची चौकशी केलीत हें पाहून फार आनंद झाला. आपण येथें आलां तेव्हां चुकामूक थोडक्यानें झाली. आपल्या कामगिरीचें वर्तमान मात्र मी वाचून आनंद मानीत आहे. अत्रे-माटे वाद थांबविण्यासाठीं जें सुंदर भारदस्त पत्र प्रकाशित करण्यांत आलें त्याच्याखालीं तुमची स्वाक्षरी असल्याचें वाचून सूत्रधार तुम्ही तर नव्हता अशीहि मला शंका येऊन गेली.... केसरींत नकुलालंकाराचें परीक्षण गेल्या शुक्रवारीं आलें. कवितेचें मर्म परीक्षकास समजलें नाहीं याचें वाईट वाटतें असो. आपल्या पत्नीस नमस्कार. माधवराव पटवर्धन.

रावसाहेबांच्या काव्यांतील प्रामाणिक भावनांचा मनोहर विलास नव्या आणि जुन्या अशा दोन्ही पिढीच्या वाचकांना आकर्षून घेण्यास

समर्थ असा आहे. नव्या पिढींतील रसिकांना देखील त्यांच्या काव्यानें वेड लावावें अशी त्यांची गुंफण आहे. नवकाव्याच्या एका विशेषाचा पायंडा पाडणारे श्री. बा. सी. मर्ढेकर यांनी रावसाहेबांना एक पत्र लिहिलेलें आहे. ते असेः—

श्रीरामसमर्थ ५१०, ए. १६ वा रस्ता खार.
मुंबई २१, ता. २२ ऑगस्ट १९४६

सप्रेम नमस्कार वि. वि.

आपलें ता. १९ ऑगस्टचें कृपापत्र मिळालें. इतक्या अगत्यानें आणि आपुलकीनें आपण लिहिलें याबद्दल आपले आभार शब्दांत कसें मानावें! आपणासारख्या तपोवृद्धांचे धन्यवाद यांशिवाय आम्हां लहान जनांस दुसरें भूषण कसलें? ‘औक्षण’ ‘औक्षवंत होवो’ या अधिकारी स्नेहानें दिलेल्या आपल्या आशीर्वादाचें छत्र घेऊन ‘औक्षण’च काय पण माझा सारा वाङ्मयीन पांगुळगाडा भविष्य कालांत वैभवानें मिरवील. हा अहंकार नाहीं, भोळा हुरूप आहे.

मागें मि. सोपानदेवांसमवेत आपली भेट घ्यायची ती घेतां आली नाहीं ही टोंचणी अजून आहे. त्यांच्याकडून आपल्या कांहीं ओव्या ऐकल्या. त्या संपूर्णपणें ‘सह्याद्रींत’ वाचल्या; सहर्ष वाचल्या. ज्ञानेश्वरी ओवीचें धनुष्य आपण सुंदर वांकविलें आणि त्यांतून मराठीचा रांगडा टणत्कार बहारदारपणें ऐकविलात. हेवा वाटण्या इतका आल्हाद झाला. पुढील भागांकडे डोळे लागून आहेत.

आशीर्वादाचा लोभ रहावा यापरतें दुसरें मागणें नाहीं. हीच विज्ञापना.

आपला,
**बा. सी. मर्ढेकर**

मराठीचा संसार स्थिर पायावर उभा रहावा म्हणून रावसाहेबांनी जो आटापीटा केला त्याची कल्पना थोड्यांना आहे. ते एकदा लिहितात ‘माझ्यासारख्या अनधिकारी माणसाने साहित्य क्षेत्रांत लुडबुड करावी याचा मला आतां पुरा वीट आला आहे. महाराष्ट्राची संघटना व मातृभाषेची सेवा

करण्याची संधि या दृष्टीनें मी परिषदेचें काम पत्करिलें होतें व गेल्या सात-वर्षांत स्वतःच्या प्रकृतीकडे किंवा आर्थिक परिस्थितीकडे कांहींहि लक्ष्य न देतां उत्तर आयुष्यांत सारें बळ एकवटून मी काम करण्याचा प्रयत्न केला. हीच शक्ति माझ्या नित्याच्या कार्यक्षेत्रांत खर्च झाली असती तर माझ्या हातून प्रचंड कार्य पार पडलें असतें याची मला खात्री पटून खंत वाटते. साहित्य क्षेत्रांत वावरत असलेला हेवादेवा, निष्क्रीय वावदूकपणा, पोकळ मिरवणुकीची पोरकट हौस इ. पूर्वायुष्यांत न अनुभवलेल्या प्रकारांनुळे माझ्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होऊन माझें उर्वरित आयुष्य बरेंच घटलें आहे. तें अधिक कमी करून घेण्यास पुन्हां उद्युक्त होणें हें माझ्या मतें आत्महत्येच्या पातकासारखें आहे. मागच्या आजारांत योग्य वेळीं विश्रांति घेण्यास न फावल्यामुळें माझें वजन २३ पौंडांनीं कमी झालें होतें. तें बरेंचसें भरून काढण्यास व प्रकृति पूर्ववत् निकोप करण्यास या खेपेस बराच कालावधि लागला. पुन्हा तसला प्रयोग करून पाहण्यास या उतार वयांत माझें मन कचरते.' (१३मे१९४३)
हातीं घेतलेलें काम आपल्या जीवनाचेंच अंग आहे अशा एकनिष्ठ जाणिवेनें तें पार पाडावयाचें हा जो कर्तव्यबुद्धीचा तिखटपणा तो त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळें वरपांगी बडेजावाला तेथें वाव सांपडणें अशक्य होते. कौटुंबिक सोयी गैरसोयींचा विचार करून रावसाहेबांनी विकाराबादीं आपल्या उर्वरित आयुष्याची वाटचाल केली यांत इतर कांहीं बाबी असल्या किंवा नसल्या तरी पण साहित्याच्या क्षेत्रांतहि त्यांना संकुचित हेवा दाव्याचे आणि पोषाखी वरपांगीपणाचे जें दृश्य हरघडी दिसे त्याबाबत आलेला उबग हें कारणहि होतें असें म्हणणें अयोग्य ठरणार नाहीं. त्यावेळीं हैदराबादीं मराठवाडा साहित्य परिषदेची वाटचाल यशस्वी रीतीनें चालू होती आणि तेथें या वरकरणी पोषाखीपणाला आणि हेवा दाव्यांना स्थानहि नव्हतें म्हणून रावसाहेबांना तें वातावरण आपल्या उतार वयांत अधिक पथ्यकर आणि योग्य असें वाटलें. कार्य-कर्त्यांना हमखास स्फूर्ति देणारें असें त्यांचें व्यक्तिमत्व या दृष्टीनें फार उपयुक्त ठरलें. प्रत्येक वेळीं आपल्या भोंवती असणाऱ्या प्रत्येकाला

योग्य तो वाव मिळाला पाहिजे याविषयींची त्यांची दक्षता आणि सक्रिय तळमळ या गोष्टी असामान्य होत्या आणि हेंच रावसाहेबांचें लोभस व महत्त्वपूर्ण श्रेष्ठत्व होतें. निवडणुकांच्या प्रसंगीं चालणाऱ्या हातचलाख्या आणि डावपेंच या गोष्टी त्यांच्या प्रामाणिक भावनेला मानवणाऱ्या आणि परवडणाऱ्या नव्हत्या. याचसाठीं अनेकांचा आग्रह असतांनासुद्धां त्यांनी पुनश्च या बाबतींत विचार केला नाहीं. " नवीन चिटणिसांच्या व त्यांच्या पुरस्कर्त्यांच्या धोरणानुसार असलेली कार्यपद्धति माझ्या कार्यपद्धतीशीं जुळत नसल्यामुळें निष्कारण खेचाखेची होऊन कार्यनाश होणार असें मला स्पष्ट दिसून आलें व या नवतरुणांचा उत्साह मावळण्यास निमित्त होऊं नये म्हणून शांतपणें विचार करून या बुढ्या घोड्यानें एकाकी जीवन पतकरिलें आहे." परिषदेची अर्धातप एकनिष्ठ सेवा केल्यानंतरहि तें कार्य सोडतांना रावसाहेबांच्या आंतरिक तळमळीची वस्तुस्थिति काय होती याची येथें पूर्णपणें कल्पना आपणास येऊं शकते.

अधिक लिहावयाचें नाहीं. 'क्रियाशील साहित्यिक' या दृष्टीनें रावसाहेबांचें महत्त्व फार मोठें आहे. त्यांच्या काव्याचें मूल्यमापन रसिक करतील त्यासाठीं 'वडव्यांच्या मध्यस्थीची' आवश्यकता नाहीं. जी निरलस वृत्ति मनांत ठेऊन त्यांनी आपलें कार्य केलें तें इतिहासाला ठाऊकच आहे. व्यक्तींनी त्याची बूज केली किंवा न केली तरी त्याची खंति अशा कर्मयोग्यांना नसते. मराठवाड्याच्या मायपोटांत रावसाहेबांना अंतिम शांति आणि मानसिक प्रसन्नता लाभावी हाहि एक योगायोगच आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांशी रावसाहेबांचे संबंध अतीशय जिव्हाळ्याचें आणि प्रेमाचे होते. त्यांच्या काव्याचे पहिलें वाचन हैदराबादेच्या रसिकांत हमखास होई आणि वाटल्यास क्वचित् कांहीं शब्द-पालटहि शक्य होई. संस्था आणि व्यक्ति यांच्यांतील अविभाज्य संबंध तेथेंहि असल्यानें त्यांच्या अनुभवी मार्गदर्शनाचा फार मोठा लाभ सर्वांना होत असे. रावसाहेबांच्या हयातींतच त्यांच्या खंडकाव्याचा नसला तरी स्फुट कवितांचा संग्रह प्रकाशित करावा अशी सर्वांची इच्छा होती परंतु योगायोग आणि नियति कांहीं वेगळी होती. त्यांच्या माघारी कां असेना

आज त्यांच्या काव्याचा हा संग्रह परिषदेला प्रकाशित करतां येत आहे यांत परिषदेला एका नैतिक कर्तव्याची पूर्तता होत असल्याचें समाधान आहे. कारण परिषदेशीं जो जिव्हाळा रावसाहेबांच्या ठिकाणीं होता त्याची पूर्णता या कर्तव्यपूर्तीनें होईल असें आम्ही कधींच समजत नाहींत.

हैदराबादीं मराठवाडा साहित्य परिषदेचें कार्यालय असेतोंपर्यंत दर पंधरा–वीस दिवसांनी पत्र आणि महिना-दीड महिन्यांनी भेट यांत कधीं अंतर पडलें नाहीं. नोव्हेंबर १९५६ मध्यें राज्यपुनर्रचना झाली. मराठवाडा मुंबई राज्यांत आला. एकत्र आलेला कार्यकर्त्यांचा गट विस्कळीत होऊन गेला. मात्र पत्रव्यवहाराचा प्रघात अधिक दक्षतेनें चालू राहिला. मराठवाडा साहित्य संमेलनाच्या परळी वैजनाथ येथील ७ व्या अधिवेशनाचें उद्घाटन तसेंच औरंगाबादीं भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचें उद्घाटन हीं रावसाहेबांच्या हातून झालीं. मराठवाड्यानें त्यांच्याविषयींच्या आपल्या पूज्यभावनेची ही अल्पशी बूज राखली.

नेहमींचा पत्रव्यवहार चालू असतांनाच एके दिवशीं रावसाहेबांच्या नातवाचें– चि. अविनाशचें– पत्र आलें. मजकूर थोडाच पण हृदयावर आघात करणारा होता:– "कळविण्यास खेद होतो कीं, रावसाहेब र. लु. जोशी यांस दि. ४–८–५८ रोजीं सकाळीं ९॥ वाजतां देवाज्ञा झाली. कांहीं विशेष आजारी नव्हते. मात्र ९९ डिग्री ताप होता. शेवटपर्यंत ते बोलत होते. अगदीं दोन मिनिटें आधीं त्यांना थोडीशी कळ आली आणि घरघर सुरू झाली. थोड्याच वेळांत त्यांना कांहीं त्रास न होतां मृत्यु आला. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित आणि निश्चितता होती."

रावसाहेबांची तपोवृद्ध मूर्ति आज आपल्यांत नाहीं. त्यांच्या कणखर आणि सडेतोड मातृभाषाप्रेमाची वानगी त्यांच्या भावमय रचनेंत हमखास आढळून येईल. त्यांच्या दणगट आणि सडेतोड व्यक्तित्वाचें दर्शन येथें आपणांस निश्चित होईल. मराठी आणि महाराष्ट्राच्या या महनीय पुजाऱ्याला निस्सीम भक्तीनें प्रणाम करून शारदेच्या चरणीं त्यांची ही भावांजुली अर्पण करूं या.

**– न. शे. पोहनेरकर.**

# कवितांचा अनुक्रम


| क्रमांक | नांव | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | संसार व मन | १ |
| २ | रुग्ण शय्येवरून | २ |
| ३ | आर्या | ३ |
| ४ | विडंबन | ३ |
| ५ | कलह | ४ |
| ६ | आनंद लहरी | ७ |
| ७ | मुजरा | ८ |
| ८ | वारकरी | ९ |
| ९ | हटकणी | १० |
| १० | वावदूक | १२ |
| ११ | मराठवाड्याची जपमाळ | १३ |
| १२ | परिहार | १४ |
| १३ | हिंदमातेचा हंबरडा | १५ |
| १४ | प्रातःस्मरण | १७ |
| १५ | ध्वजवंदन | १९ |
| १६ | महाराष्ट्र शारदेस | २० |
| १७ | पुण्यस्मरण | २१ |
| १८ | वादाची ठिणगी | २२ |
| १९ | विरहोत्तर मीलन | २४ |
| २० | मिस्कील ताई | २६ |
| २१ | माझी रांगडी आई | २७ |
| २२ | माझा महाराष्ट्र | २९ |
| २३ | चि. संजीवनीचा शोध | ३१ |
| २४ | सायुज्यता | ३१ |

| | | |
|---|---|---|
| २५ | काव्यदेवीचा प्रभाव | ३३ |
| २६ | षष्ठ्यब्दपूर्तिनिमित्त | ३४ |
| २७ | मायबोलीशी हितगुज | ४४ |
| २८ | बाळ उल्हास | ३७ |
| २९ | हटवादी ताई | ३९ |
| ३० | आवाहन | ४० |
| ३१ | बंडखोर | ४१ |
| ३२ | भ्रमनिरास | ४२ |
| ३३ | मायबोलीची भूपाळी | ४३ |
| ३४ | मराठीचा साद | ४४ |
| ३५ | दैवी कलाकृती | ४५ |
| ३६ | त्रस्त महाराष्ट्र माता | ४६ |
| ३७ | माय मराठीची मांडी | ५० |
| ३८ | बेगडी पांढरी टोपी | ५१ |
| ३९ | वागीश्वरीस | ५२ |
| ४० | दिवंगत कवि टिळकास | ५३ |
| ४१ | थोर मराठा | ५५ |
| ४२ | अंतर्दशा | ५६ |
| ४३ | हें काय लोकराज्य? | ५७ |
| ४४ | आळवणी | ५९ |
| ४५ | श्रद्धांजली | ६० |
| ४६ | खटका | ६० |
| ४७ | अनुग मी तुझा | ६३ |
| ४८ | अमेरिकेस | ६५ |
| ४९ | फुलांची पखरण | ६७ |
| ५० | सुरांचे कण | ६९ |
| ५१ | अद्‌भुत द्वंद्वयुद्ध | ७३ |

# संसार व मन

अभंग

बाईल घरची सांगे हित गोष्टी
बोल परी ओष्ठी त्रासलेले

कटु गुटिकेशीं शर्करा वेष्टण
प्रेमाचें चाटण कां न देवें ?

सहजा सहजीं विरोधली वृत्ति
उलटीच गती क्रमूं सजे

संसाराचा पाश मज मानवेना
मन हें धिंगाणा घालूं पाहे

वाटे पुरी आग लागो या संसारा
उगा हा घोसरा उभा केला

काचलों कावलों जिकिरीच्या ढंगा
उफराटी गंगा नको नको

मन खरें खरें पुरें रितें भांडें
आघातें आरडें ठणाणून

देवा तुझ्या हातीं दिली ही कासंडी
भरूनी बोसंडी कृपाजलें

९-११-४५ ★

## रुग्ण शय्येवरून

### (पत्नीस उद्देशून)

झरझर सरलीं वर्षें सत्तर तनू जाहली जीर्ण
नकळत अवचित [illegible] वरचें येइल गे आव्हान

+ + +

कटु रव पडतां कधींहि कानीं लवहि न व्हावे कष्टी
रोषाच्या मानाच्या आता सर्व संपल्या गोष्टी
कटु शब्दांचे सतत वाहती वारे या जगतात
आले इकडुनि तिकडे गेले सूज्ञाची ही रीत

+ + +

सांज जाहली समीप येई हळूंहळूं अंधारी
चल ये आपण घरीं जावया करूं सिद्धता सारी
संसृति तापें तप्त मनाला निववी संध्या च्छाया
उभी ठाकली प्रसन्न वदनें तुला मला सुखवाया

ईशचिंतनी सजलों गानीं शीतल प्रेरक सांज
साथ करी गे करी घेउनी तव प्रेमाची झांज
रात–राणिचा परिमळ पसरे दरवळे मत्तगंध
धुंद होवुनी खचीत सखये गळतिल सारे बंध

गोड निशा ही शांतीदात्री परमेशाची दूती
करूं तयारी तिच्या स्वागता धरुनी प्रसन्न वृत्ती

२०–११–४५ ★

## आर्या

घाट मयूरपंती थाट अभिनव कुशाग्र कृति अचाट
चटका लावुनि गेला मराठिचा मुग्ध हासरा भाट

२१-११-४५ ★

## विडंबन

काय या म्हणावें देवाचें मंदिर
भरला बाजार राजरोस

ग्राम्य विनोदांत रमले कुटाळ
हास्याचे कल्होळ निनादले

उठे क्षणोक्षणी टाळ्यांचा गजर
गमे नाट्यघर सजलेलें

डांगर भोपळे आणीती कोंवडी
प्रदर्शना उडी जो तो घाली

पुकारिती चाले स्पर्धेनी लिलाव
देवाचेंचि नांव घेवोनिया

नाटक भक्तीचें भाव तो त्रेगडी
चालली फुगडी धडाडोनी

धीटले हे नीच परोशी दांभिक
धर्माचे अंतक पुरेपुरे

यरे यरे खिस्ता ब्रळाबले पुंड
येताना आसूड आणी तुझा

३०-११-४५ ★

## कलह

आज बाटे देवा तुझ्याशीं भांडावें
तंडुनी झुंजावें सपाटून

तुजला म्हणती जरी योगीश्वर
मनाचा तूं चोर ठावें मला

लाविशी भाविका नादझुनी पिसें
जनांतरीं हास हावूं देशी

खुळुनी त्यागीती भरल्या संसारा
आतगण सारा कोकलतो

लाविलीं बापुडीं अंतीं देशोधडी
उपाशीं उघडीं दारापोरें

दवा या पापाचा कसा देशी जाब
कशी तुझी आब सांभाळीशी

( २ )

हृदयाच्या दारीं राहे तुझी गस्त
पुरतें निर्धास्त होतें मन

गला तुझी स्वारी भेटाया कुणाला
चुकवुनी डोळा का° तरी

कवाड फोडोनी घुसोनिया आले
स्थानापन्न झाले अन्य सूर

अपत्यांशीं माझ्या वेगें झगडती
शिकस्त करीती हांकलाया

चाले घनघोर आदळआपट
कल्होळ निपट नादावले

पट्टीच्या डाकूंचा कोण धुमाकूळ
चोराला सामील तूंहि देवा

देवा हा आरोप माझा तुझ्यावरी
काय याचें करी पाहूं आतां

( ३ )

भाविक रंगती टाळ धुनकती
औदार्या वानिती देवाजीच्या

गानीं दंग होती पेरिती लाघव
सोकावला देव स्तुतीपाठीं

खुलवुनी घ्यावें लाभोनी वैभव
सगळा हा डाव गुलामांचा

परी मज ठावे देवा तुझी वृत्ति
हिमुटी कशीती सकुंचित

कृपादान देशी तेंहि इवलेसे
पुरेल किनुसें कार्यालागीं

टाक ऱ्याबोलें आणिक गांठोडें
ना तरी बाभाडे काढीन मी
जनांशीं कथीन तुझा माझा तंटा
करीन बोभाटा जगभरी
देवा करिशील टंगळमंगळ
प्रतिष्ठेचें बळ ओसरेल

( ४ )

तिष्ठत बसलों तुझ्या बोलासाठीं
मन धायकुती त्रस्त माझें
कां रे बोलेनाशी कां न ये उबग
गिळशील मूग कोठवरी
डाबा की उजवा कौल देई कांहीं
बावडें मलाहि कशाचें ना
सांग एकदांचि नको पेटूं हट्टा
भलतीच थट्टा करूं नको
काय तुझी इच्छा वाजवूं दिवाळें
जिभलीला टाळें लावूं कां मी
ऐसेंहि असलें, आहे ही तयारी
घ्यावया नादारी लगोलग
देवा हा जातीचा वृत्तीचा भिक्षुक
झालों कफल्लक तरी काय

( ५ )

विरोधी भावाचे बोललों जे बोल
झेलले तूं झेल देवा लीलें

चित्तीं आल्हादला वदनीं स्मयला
प्रसन्न जाहला प्रभू माझा

प्रसाद–जलाचा आला आला लोंढा
कशाला एवढा धाडिलाशी

मुखीं कानीं नाकीं शिरले तुषार
उठला झंकार शारदेचा

हात आबरी रे आता करी पुरे
जीव गुदमरे ओघापायीं

सरतां येईन पुन्हा उकळाया
धरणें धराया देवराया

तुझा आवडता संतापी भिकारी
देवा तुझ्या दारीं पडलेला

२४-२-४६ ★

## आनंद लहरी

गोड गोड बोला कलिका उमला
सौरभ उधळा दिगंतरीं

निष्फळ वादाचें नको देणें घेणें
नको तें गाऱ्हाणें संसाराचें

नित कुरबुर उभा हेवा देवा
फुका कां कांगावा माजवितां
अंतरा उजळा सजवा दिवाळी
फुटूं द्या उकळी आनंदाला
जादू ही अचुक मालवील भ्रांती
येइल भरती प्रेमभावा
आनंद प्रभावें सुटतील कोडीं
निखळेल बेडी भारताची
देवा ये उठूं दे महाराष्ट्रभरी
आनंदलहरी घरोघरीं

३–४–४६ ★

## मुजरा

( चाल : प्रतिकूल होईल कैसा )

अये मायबोली मम गे तुला घे प्रणाम
तूंचि मांगल्याचें माझें परम सौख्य धाम || धृ० ||

आवेगती तव गे स्पर्शे मनाचे मराठे
स्निग्ध साद पडतां कानीं भ्रातृभाव दाटे
विसवतील अंतीं सारे भ्रमाचे फुपाटे
एकजीव पुनरपि होइल मराटा तमाम १

रिपुदुर्जन सीमेवरती मांडिती धुमाळ
स्वापांया धावुनि जाती वीर तव सुभाल

ठणकाविति तडकाफडकी रोकडा सवाल
महाराष्ट्र गुणनैपुण्यें भारता ललाम २

तूंचि प्रेमवल्ली माझी आप्तगोत सारा
चित्त खिन्न होतां खुलवी मज तुझा इशारा
संजीवन सिंचती माये तुझ्या सुधाधारा
भावपूर्ण माथा लववी तुझा हा गुलाम ३

८-६-४६ ★

## वारकरी

निदिध्यास लागे तुझा मायबोली
अंतरंग खोली निःसंकोचे
तुझ्या दौलतीची उघडली पेठ
करूं देई लूट मनसोक्त
अतुल रत्नांची गवसली खाणी
तुझा चिंतामणी देई मज
शुचिर्भूत क्षेत्र तुझें निर्विकारी
तुझा वारकरी अखंड मी
तुझें माझें गुज मज तुज ठावें
कशाला वडवे ढवळाया
तुझी खांद्यावरी विराजे पताका
येवो येईना कां घाला घोर

तुझ्या रसरंगीं रमलों निर्भर
जाहलों निघोर पुरापुरा
माधुर्याचा टाळ धरियेला हातीं
डुंबलों संगितीं रात्रंदिन
या हो मराठ्यांनो! साथ करा गानीं
हीच संजीवनी स्वातंत्र्याची

१६–६–४६ ★

## हटकणी

मर्द मराठ्या असे सांग रे मर्दुमकी तव कुठे
'कुठे' हा निनाद भवती उठे

\+ + +

शिवरायाचे शूर इमानी धीरवंत मावळे
कुठे रे कुठे अहा लोपले

सह्याद्रीची कूस वांझली कां नुपजवी नरवरां
आटला वीरांचा कां झरा

वाग्वीरांचे तांडे फिरती सह्य पठारावरी
पलट घे भुजवल जिव्हांतरी

हे बोलघेवडे एक दुज्या छेडिती
हे शब्दाघातें मर्मभेद साधिती
राष्ट्रघ्न दुहीचे बीज अहा पेरिती

म........................ दि: ....................
क ........................ नों. दि ..................



घरभेद्यांचें पीक माजलें घातुक तण हें असें
घराचे वांसे फिरले कसे

२

उकरित बसशी जुनीं मढीं कां इतिहासा चाळिशी
फुकाचें वैभव कां उगळिशी

नव इतिहासा निर्माया तुज धमक न वा जरि गड्या
भरी रे भरी करीं बांगड्या

प्रारब्धाला बोल लाविशी होशी कां दुर्मुख
पुसटली स्वत्वाची ओळख

ही झापड पडली भ्रमें तुला मोहुनी
हीं न्यूनगंडयुत पुटें चढलिं स्वछुनि
दे दाट संचले तवंग भिरकावुनी

भाग्य तुझें मग तुझ्याच हातीं कुळुनि तुला येईल
दुर्दशा पुरी लया जाइल

३

सुंभ जळालें पीळ राहिला बदोत बदले कुणी
अनलकण दडले परि दडपुनी

भस्मपुंज हा दिसे वरुनि परि आग होय ओकितां
जरा कां कुणी सहज डिवचितां

येइल मांत्रिक शिवरायाचा वीरपुरुष हेरुनी
बलाची पुरी करिल मिळवणी

एकत्रुनि अवघें सह्यपठारावर
भारील चेतवण मारुनिया फुंकर
मंत्रुनी निपजविल ज्योती अजरामर
धडधडतील मग ज्वाला भीषण अशुभा भस्मावया
आहुती दास्याची व्यावया

४

स्वातंत्र्याचा भानु उदेला तळपे क्षितिजावरी
ऊठ रे ! नीज गड्या आवरी
हाक मारिते भारतमाता हुंकारी चल अतां
पाजळी फिरुनी तव वीरता
फडफडवी तव विजयपताका झळकवी यश उज्ज्वल
निवूं दे नेत्रे अतुराकुल
जयहिन्द स्फूर्त हा एकच एकच रव
या दऱ्यादऱ्यांतुनि पुनःपुन्हा उमटव
जयघोषावेशें दिशादिशा धुनकव
चैतन्याचे घुमतिल वारे फुटतिल वीरांकुर
झडकरी विरेल गंडांतर

मार्च १९४७

★

## वावदूक

गुंफूनी शब्दांची कसरत चाले
सौष्ठव उत्फाळे उच्छृंखल

बोलाची ही कढी बोलाचीं हीं शीतें
खुलबिले श्रोते उन्मादून

मिष्टान्न अपूर्व लाभले वदती
परी काय हातीं सांगा आलें

उथळया बोलांचा पिकला बाजार
कर्तृत्व संसार बिदूसला

हाय देवा ऐशी चाले ही कुठोरी
विनाशा नेणारी ग्रहदशा

१६–५–४७ ★

## मराठवाड्याची जपमाळ

ज्यांनी दिव्यरवें अमूप कवनें गोदातटीं गायिलीं
देवी ! भाव समग्र एकवटुनी पूजा तुझी बांधिली
ज्यांचे बोल अमोल नित्य घुमती लोकां रिझोनी सुखें
त्यांचे पाहति आजि वंशज अहा होऊं तुला पारखे

योगक्षेम कितीतरी जुळविण्या ध्याती आविंधा गिरा
नेणोनी भ्रमपूर्ण सत्त्व हरण्या निष्णात ही वागुरा
कोणा भाळवि लाघवी ढब तिची अंतर्गृहीं ही रिघे
'भाषा ही परकी न काय बिघडे' उद्गारिती कोडगे

ग्रासाया तुज नित्य राजवट ही उद्युक्त नानापरी
औदासीन्य असें परी निरखितां भीती थरारे उरीं

देवी ! तोंचि स्फुरे स्फुरोनि तुझिया स्फुलिंग नेत्रांतुनी
एकामागुनि एक पेटति झणीं ज्योती क्रमें चेतुनी
वन्ही हा घुमवो सदैव पसरो व्यापो महाराष्ट्रियां
देवी ! राज्य तुझें पुन्हां अवतरो देवो आम्हाला जया !

२५-५-४७

## परिहार

पाहता पाहता क्षोभ उता आला
द्वेष बोकाळला रानोमाळ

कधी विधर्म्यांची वळवूं गठडी
मनीं हीच अढी डांबरली

चाले जाळपोळ निंद्य भ्रष्टाचार
उठे हाहाःकार चहूबार

अबला वृद्धांचा तृसवें न बळी
अर्भकें कोवळीं चिरीयेलीं

नसे खंत खेद डाचणी लवहि
गमली पुण्याई फळा आली

कुठली ही नीति कसला हा धर्म
कसें नष्ट कर्म आठवलें

परी कां हो तुम्हा कसें उमजेना
आपुली ही दैना ओढवेल

कृपाणधारक कृपाणें नशति
निसर्गाची रीती ठरलेली

अन्या विनाशाया खोदियेली खांच
घरंगळे साच स्वयें आंत

नाश सर्वगामी असूयेच्या पायीं
नारळाची आई येणें हातीं

तुटल्या मनाच्या त्यजा हेटीमेटी
निसटू द्या गांठी वैराचारी

चला सजवूं या आंगत पंगत
उजवूं संगत अखंडित

उत्कर्षाचें बीज वर्ते खेळींमेळीं
देऊं या झळाळी मायदेशा

या हो नाचूं सारे धरूनिया फेर
संगिताचे थर रचूं स्फूर्त

प्रेमाने वागडूं रमत गमत
ऐकवूं हें गीत एकमेकां

२४-७-४७

## हिंदमातेचा हंबरडा

(वृत्त – भूपती वैभव)

ही कुणी उसकली मम देहाची मांड
हें कोण चालले भीषण हत्याकांड

दुमदुमे दिगंतीं स्वातंत्र्याची नांदी
परि हाय उडाली मम कलिजाची चांदी

स्वातंत्र्य स्वप्नीं होय न हो रममाण
तो कानीं पडलें सैतानी थैमान

हिसडिता हाणिती एकेका त्वेषानें
यमदूत भयानक बनलीं मम संतानें

संताप उफाळे उपजे रक्तपिपासा
असहाय जिवाचा क्षण लव ये न भरोसा

मोकाट चाललें कंदन हातोपाती
तडफडति कबंधें अगणित अवतीं भवतीं

चेतविल्या आगी चट सारें भस्माया
हा डोंब उसळला भस्मासुर निर्माया

पक्षांधें हेकट अवखळ माझीं बाळें
लव निमित्य मात्रीं क्षोभ जयांचा चिघळे

नित दोषारोपीं निमग्न मति बावरली
ही फुटीर वृत्ती राष्ट्रविघाता सजली

उजविली जयांनी सर्वस्वाची होळी
मोजिती अशांना शिव्याशाप लाखोली

तो शांतिदूत मम थोर धीर गंभीर
स्वातंत्र्य – विधाता निरुपम किमयागार

हेटाळिति त्यातें कृतघ्न ऐशा काळीं
हीं राष्ट्रकरंटीं कशास जन्मा आलीं

डागावरि देती डाग साधुनी फटके
झोंबती अंतरीं प्राणांतिक हे चटके

सोडवा वीरहो आणिक किती हो साहूं
स्वातंत्र्यबलाची चमक दाखवा पाहूं

१४-९-४७ ★

## प्रातःस्मरण

प्रभातीं स्मरे मायबोली तुला
अभावीं तुझ्या जीव धादावला

न ये बोल कानीं कुठोरी सहे
तुझ्याबीण कंठूं कसें आयु हें

घुमे अन्य बोली सभोतीं अहा
पुरी लाघवी कोण चाले चहा

न सोसे मला भाव हा बेगडी
तुझी मात्र भावे गिरा रांगडी

तुझी सह्यपोटीं वसे गे कुळी
तुझा पाळणा आंदुळे कातळी

उभीं शैलखंडें तुझे सोबती
तुला साथ देतां दिशा हालती

तुझा साद झेलोनिया पत्थर
मुर्दे फेकिती डाव वाऱ्यावर

दुणावें तिणावें बळें वैखरी
गडाडे ध्वनी मेघनादापरी

खुले जैं गुजांची तुझी पोतडी
मना वेड लावी तुझी गारुडी

तुझी रम्य पुंगी सुरा आळवी
डुले नाग जैसा मराठा कवि

तुझा स्पर्श रुजवी नवी पालवी
तुझी मुग्ध जादू मना हालवी

स्फुरे वीर्यशाली सुरांची गती
तुझा ताल साधी पुरी संगतीं

तुझी साथ लाभो सदा गे मला
स्फुरो मार्द्दिरा मंगला निर्मला

रहस्यें तुझीं झांकलीं व्यक्तवी
तुझा भाट गाईल गाणीं नवीं

तूं वल्लभा मम जिवाची सखी
तुझें नित्य गुणगान बसलें मुखीं

सये ! अंतरीं भाव कोंदाटले
तुझ्या रंगणीं रंग रेखाटले

धरी हा जरा जीर्ण वीणा करीं
मनोमोहिनी साजणे सुंदरी

फिरे अंगुली तैं हलें अंतर
" तुझाऽऽऽमी तुझाऽऽऽमी " विनोदे स्वर

८-१०-४७

★

## ध्वजवंदन

फडके ध्वज हा भव्य तिरंगी
अंतरिं फुलवी वोल
जगतीं याची आन राखण्या
देऊं जिवाचें मोल ॥ गड्यांनो ॥

अग्रमान श्रीशिवरायाचा, झळके भगवा रंग
आम्ही मराठे दर्शनी याच्या, उठतिल भावतरंग

हें त्यागाचें चारित्र्याचें, प्रतीक विलसे जाण
निजदेशाच्या शीलरक्षणीं, जावो राहो प्राण

धर्मचक्र हें मधीं विराजे, उमगा यांतील मर्म
पावित्र्याच्या धवल कुशींतुनी, निपजे मानवधर्म

शांतीचें सत्याचें पसरूं, भुवनतलीं साम्राज्य
असाच सजवूं प्रियकर अमुचा, भारत हा अविभाज्य

जीवन भरलें हिरव्या रंगीं, उत्कर्षाची खाण
पीडितरक्षण भाव उमटवी, निष्ठा मांडी ठाण

जाति पक्ष नी धर्मभिन्नता, याचा कुजला डाव
भारतभूचीं मुलेंच अवघीं, नुरला परका भाव

ध्वजप्रभावें सजलीं सारीं, भावंडें चौफेर
करीं गुंफुनी कर आनंदें, चला धरूं या फेर
सहर्ष नाचूं वंदूं प्रेमें,
ध्वज अमुचा अनमोल
याहो सारे मुदें धुनकवूं,
जयहिन्द एकच बोल ॥

१७-१-४८ ★

## महाराष्ट्रशारदेस

करी झंकार, बघ कशी लागली तार ॥ धृ० ॥
परदास्याच्या आगीं तपुनी
स्वातंत्र्याचें चढलें पाणी
सरतिल पुढती साद परिसुनी
समर झुंजार, बघ कशी लागली तार

छेड जरा ही तार शारदे
अखिल मराठा झुलेल नादें
तव नामाचा उठविल मोदें
जयजयकार, बघ कशी लागली तार

तव झंकारें उठतिल रानें
वठतिल वीरांकुर जोमानें
विजयश्रीचें फुलेल गाणें
जादूगार, बघ कशी लागली तार

प्रतिरव घुमतिल भुवन कोंदुनी
पुलकित होइल भारतजननी
लंघुनि जातिल सूर भेदुनी
अटकेपार, अघ कशी लागली तार
(हैदराबाद विजयदिन)

१२-९-४८ ★

## पुण्यस्मरण

मंद वयभारें पाउलें जयाचीं
रमे कार्यार्थी चाड ना वयाची
लवहि वाग्बाणें त्रस्त हो न संत
फिरे भूलोकीं विनय मूर्तिमंत

प्रभा शांतीची वसे भव्य माळीं
कळी हास्याची रमे नित कपोलीं
नयनिं चमके वात्सल्य सहजतेचें
मना आकर्षी नवल यांत कैचें

क्वचित वळकुटल्या वदनिं संचलेले
बोल स्रवति जन सेवण्या तृषेले
जसा जातीचा हपुस सुरकुतेला
अवीट माधुर्यी लाजवी सुधेला

कुणी संतापें धुंद चेतलेले
शिव्याशापाचा गजर मुखें चाले

स्कांधिं साधूचा स्थिर स्निग्ध हात
क्षुभित वृत्ती ती क्षणें होय शांत

कैक सन्मार्गी पतित लावियेले
अनाविष्कारें सतत कार्य चाले
बूज व्हावी जगतांत फल तपाला
शिवे ऐशी ना कल्पना मनाला

आयु सरलें निमिषांत अस्त पावे
ज्योत प्राणाची प्रभुपदीं विसावे
खुले चर्येवरि शांतसा तजेला
जणूं निद्रावश सुखे संत झाला

निघुनि गेलीं जरि तपें चार आजी
तया मूर्तीची स्मृति अजुनि ताजी
तीच अघपाशीं बला ओपि मातें
सदाचारातें मती वाकवीते

(निर्याण इ. स. १९०१)

१८-४-४९ ★

## वादाची ठिणगी

एक मी देखिली विद्वानांची सभा
कोण तिची शोभा परी होय

जो तो धडपडे उत्कट ईर्षेने
भरलीं आसनें दाटीखेटी

लांगूलचालना लाभली पर्वणी
आपुलीच वाणी ऐकावया

संपादाया फड सज्ज उभे खडे
काढाया वाभाडे अन्योन्यांचे

एक दुज्यावरी उलटवी बाजी
गोमाजी सोमाजी हरीखले

योजी दोषारोपीं कुणी दुष्टाचार्य
झोंबती पर्याय उच्छृंखल

पाहतां पाहतां वाद उतां येई
येती हातघायीं लगोलग

आळविती सूज्ञ परी शांतीपाठा
समेटाच्या वाटा चोखाळिती

त्वयार्धम् मयार्धम् आराधिती साम
कष्टें उपशम लाभे अंतीं

तोंचि सभेमाजीं उठे नास्तभाक्या
बेगळाची खाक्या गुलामाचा

शुभ्र अंगवस्त्र परटाची घडी
झळके पगडी झिळमिळी

बोले हळवूरें मधु मृदु वाचें
थेंब अमृताचे पाझरती

म्हणे बघुनिया मनीं संतोखलों
कृतार्थ जाहलों धन्य आजी

परी कां तगेल शांतीं बरकांती
मनीं हीच भीती उभी राहे

केले दोषारोप सारे जें तें कांहीं
खोडियेले नाहीं पुरे पुरे

भ्रमें अनिर्णित स्वास्थ्य ढासळेल
आग भडकेल कधी तरी

विकल्पाच्या पायीं पडतील तडे
भिजत घोंगडे ठेवूं नका

धुमसेल मनीं द्वेषाग्नी प्रखर
अस्तनीं अंगार भयकारी

दोष सप्रमाण सिद्धावे हे सारे
नातरी माघारे घेणें इष्ट

सुक्या चेतवणा लागे सणकाडी
धडाडे शेगडी भडाडून

मातला कल्होळ फूट गाभूळली
सभा उधळली देखादेखी

१–८–४१ ★

## विरहोत्तर मीलन

प्राप्त होय मज समयीं एका निवास सिंध प्रांतीं
दूर राहिलीं मुलें माणसें नसे कुणी सांगाती

होतें अनुकुळ सारें कांहीं ददात नव्हती कसली
ओढ परी मम चित्ता लागे परिसाया निजबोली

हुरहुर दाटे चित्त उडालें गोड न लागे अन्न
गमे हरपलें अलभ्य कांहीं मन मम होय विषण्ण

असाच चाले मंद पाउलीं क्रमितां पथ एकाक
तोंचि पडे मम अधीर कानीं मुग्ध मराठी हांक

स्तिमित जाहलों, पथीं थबकलों, मोहें पद उचलेना
कोठुनि येई चेतोहारी साद परी उमगेना

खिळितां दृष्टी अचूक सदनीं मालक पुढती आला
काय हवें हो, कठोर बोलें पृच्छा करितां झाला

क्षमा करा, मग उत्तरलों मी नका करूं कोपाला
मम भाषेचा रव ऐकाया जीव असे तान्हेला.

राग निमाला, प्रसन्न झाला, स्नेह मनीं उद्भवला
घेवुनि जाई सास्मित वदनें वेगें निज सदनाला.

अंवती भंवती जमवी सारे मुग्ध बाळगोपाळ
न कळे कैसा निघोनि जाई हृदयंगम तो काळ

किती ऐकावें, किती वदावें मन मम मोहुनि गेलें
मधु गुंजारव घुमतां भंवती हर्षें नाचत सुटलें

अद्भुत कैशी तंव गे ठायीं जादू भरली माये
तव रव पडतां अवचित कानीं मोद मनीं न समाये

स्फूर्तिदायिनी तूंच खरी गे अमुची प्रेरक शक्ति
जडे न कैशी तंव भक्तांची तुझ्यावरी आसक्ति

तुझे कवी तुज नित्य नटविती नवनव वस्त्राभरणीं
तळपति तेजें वाक्संसारीं तुझीं खेळतीं नाणीं
तव लीलेचे भाव अंतरीं येतां जे उफळोनी
प्रेमभरें कवि गाई सुस्वर रम्य मनोहर गाणीं
सूर दिव्य हा उधळित रत्नें दिगंतरीं जाईल
तुझा भाट हा तुझे पवाडे प्रेमें नित गाईल.

२०-८-४९ ★

## मिस्कील ताई

ये गे ताई मम छकुले
चल ये गोळा करूं फुलें

असोत सारीं भलीं बुरीं
गमती अम्हां परि हंसरी

आल्या चिमण्या थवा थवा
बगिचा फुलला हा अवघा

चिंव चिंव करिती
दाणे टिपिती
कशा टुमकती

जातां जवळी परी जरा
भुर्रकन उडती भराभरा

२

लबाड कुठली मम ताई
रुसे फुगे रांजिस येई

म्हणतां घ्य मम गेंद करीं
झोंबे झुंजे भुतापरी
देतों वदतां खुले कळी
फुले खळी कैशी गालीं
खुदकन हंसली
धपकन पडली
क्षणांत रुसली
हिला हवा माझा चेंडू
देइन मी धम्मक लाडू

२२-८-४९ ★

## माझी रांगडी आई

तुझा गावठी गे बोल
मधु शाहळीचा मळा
शीण जिवाचा फेडाया
सदा कदा फुललेला
क्षणें रुसे, तंडे, झुंजे
क्षणें फुलवी हास्याला
विसरावें कसें वेगें
हेंचि शिकवी जगाला
पहुडतां तुझ्या अंकीं
गोंजारिशी मज माते

आणि धरितां पोटाशीं
येई प्रेमाचें भरतें
चाळवितां पोटीं डोई
फुले प्रेमाचा फुलोरा
पान्हावली माझी माय
ओपी अमृताच्या धारा
निवळली दृष्टी माझी
तिचें पाही रूप नव
उचंबळे आपुलकी
उसळला प्रेमभाव
तार गुंजे अंतरींची
जाय जीव हुरळोनी
किती किती वाटे गावीं
माझ्या रांगडीला गाणीं
युगायुगांच्या कोलांट्या
चालल्या या सभोंवार
सुन्न मति हो बघुनि
भराऱ्यांचा बडिवार
सरबत्ती अत्युक्तींची
स्वैर कल्पनाविलास
मज नको हा जंजाळ
तुझा मात्र आई ध्यास

२४-१०-४९ ✶

# माझा महाराष्ट्र

जयें नित्य जोपासली त्यागवृत्ति
परांच्या सदा सेवनीं तन्मय
जयाचे सदा रक्षणीं भारताच्या
उभे ठाकती वीर तेजोमय
स्फुरे अंतरीं ध्येयनिष्ठा जयाच्या
मती नित्य ज्ञानार्जना हो भली
विराजे महाराष्ट्र संपन्न ऐशा
गुणें थाटली आमुची माउली

२

करी सह्यराजी पुरी दक्ष माते !
तुझ्या रम्य गोमांतकीं जागल
जिच्या दर्शनें भारुनी लोक सारे
तुझ्या लेकुरांचें दुणावें बल
मनोयोग्य ऐश्वर्य संपन्न राणी
तुझी भव्य मुंबापुरी सुंदरा
तुझी नित्य माते ! तुझी नित्य राहे
तुझी यांत शंका न कांहीं जरा

३

उजारे जिवा दिव्य ही सह्यराजी
पुनर्जीवना मुक्त वारा वहे

उले भावना देखुनी वीर्यशाली
शिवाजी नृपाचे उभे दुर्ग हे
तुझे पुत्र गोदातटीं गांजलेले
पुनर्मीलनीं तेजती गौरवें
मुदें घोष चाले तुझा गे विदर्भीं
तुला वंदिती लोक निष्ठा रवें

४

तुझा ध्यास लागे जया नित्य माये
तुझी संतती ही न किंतु जरा
जिथें मुक्तकंठें सदा वैभवानें
तुझी गर्जती गे मराठी गिरा
असो पक्ष जाती न संपर्क बाधे
तुझ्या भाषिकांच्या कदा मीलनीं
भरे प्रेम उत्साह येती उमाळे
तिथें एकतानें तुझ्या पूजनीं

५

यशस्वीपणें गुंफिती प्रेमरज्जू
प्रभावे मनाचे मराठे खरे
फुपाट भ्रमाचे त्वरें लुप्त होती
नुरे भेद एकत्व पावे पुरें
मनीं ऐक्य थाटे, हृदीं प्रेम दाटे
अहा भाव हेलावती अंतरीं

' महाराष्ट्र माझा, महाराष्ट्र माझा
उठे लाख कंठांतुनीं वैखरी '

२२-२-५०

★

## चि. संजीवनीचा 'शोध'

कुणी सुचविलें बाई कराया हा आटाआट
ओढ घेशी कासया गे हुडकाया न्यारी वाट

बाळबोध जातीवंत तुझें मनाचें माहेर
नाविन्याचा दर्प कुंद तुझी गंजबील तार

तुझ्या निर्झराचें जल झुळझुळ गाई गीत
अवखळ कल्लोळाशीं तुझें काय नातेंगोत

आजवेरी संगोपिली छायेमाजी जी निवांत
तुझी सुकवील वेली नैराश्याचा झंझावात

दुःखें कष्टें भाराबली धरणी ही सदाकदा
परी 'सत्यम् शिवम्' मंत्रें लाभे सौख्याची संपदा

शारदेचे मंजु सूर मांगल्याचें अधिष्ठान
आळवी गे आशावादें ऐकवी सुस्वर गान

('सत्यकथा' एप्रिल, ५०)

१०-५-५०

★

## सायुज्यता

टकारांची उकारांची तुझी गे घोस अंगेष्टी
कुणा भावो न भावो ही धिटांची धाडशी धाटी

कुणी निंदो हंसो कोणी म्हणो ही रांगडी साची
हिच्या शब्दें स्फुरे वर्धे परी पैदास वीरांची

२

कृशांगी दर्शनीं भासे परी निःशंक निर्धोक
न मोडे हा पिळू जाता तिख्याचा बारका फोक
फिरे हेरी दिशा छानी प्रकाशाचा हिचा झोत
कुणाचा देखता कावा झपाटे जागती ज्योत

३

बलाची, आत्मत्यागाची कशी ही उत्फळे खाण
उभ्या या भारतीं धुंडा कुठे घावे असा बाण
अये माये खरी माझी जिवाची तूंच गे राणी
उभी ठाके मनोहारी तुझी मूर्ति मनीं ध्यानीं

४

किती वर्णूं, किती वानूं, किती गाऊं तुला गाणीं
मना वाटे परी खुंटे कशी ही तोकडी वाणी
हृदीं कोंदे विना नादें स्वरांचें मत्त थैमान
स्फुरें वेगें दिनीं एका सुटें मोकाट बेभान

५

कुणी उद्गारिती गातां फुका हा स्वैर बोभाट
कसा त्यागील गे छंदा तुझा हा कोडगा भाट
तुला ओपीन गे देवी नवाळीचें नवें लेणें
तुझ्या येईल गे अंगीं झळाळी देखणी जेणें

६

जियेच्या देखता रुपा तुझी लागोनिया प्रीत
तुझे सत्पुत्र सत्कन्या तुझें गातील संगीत
चला या हो मराठ्यांनो ! चला या मेळवा सूर
स्वरें संचारितां देवी तिच्या व्हा पूजनीं चूर

७

हृदें अन्योन्य एकत्वा तदा होतीं पुरी सज्ज
नुरे 'मी – तूं' कदा कांहीं
खरा हा मोक्ष सायुज्य

६–८–५०

★

## काव्यदेवीचा प्रभाव

होतों कंठित काळ रुग्ण शयनीं दुर्दम्य त्या यातना
झाला जर्जर जीर्ण देह अवघा नैराश्य व्यापी मना
वैतागें असहाय दुर्बल मुकें कार्या भुकेलें मन
सारें शून्य दिसें गमे निफळ हें झालें अहा जीवन

२

देवी ! तों इतुक्यांत तार सहजीं गुंजे तुझी अंतरीं
दैवी मंगल मंजु साद घुमती या अंतराभीतरीं
नादब्रह्म नभांतुनी अवतरें चैतन्य चित्तीं स्फुरें
नष्टं दैन्य समग्र जीव उजरे दौर्बल्य कांहीं नुरे

३

चालें गान हृदीं अहा उपजवी आनंद शांति सुखा
दैवी नाद रवें समस्त अशुभा झालों पुरा पारखा

छंदीं दंग तरंग हे धुनकती संगीत दिव्य स्वनीं
वेतें मन्मन नर्तनीं जणुं लभे स्वर्गीय चिंतामणी

\+ \+ \+

अंतीं या लहरीवरी बसुनिया गेहीं सुखें जाईल
आत्मा हा विसवोनिया प्रभुपदीं गीतें नवीं गाईल

७ ८–५० ★

## षष्ठ्यब्दपूर्तिनिमित्त

ज्याने गौरविली अखंडित रवें माझी मराठी गिरा
वादीं दक्ष परोपरी कुशल जो वाक्संगरीं आसरा
दत्तोवामन नाम हें दुमदुमे ज्याचें जगीं गाजतां
त्याची सज्जित हो अजी बहुजनीं षष्ठ्यब्दपूर्ति अतां

२

सौजन्यें नटला परी न हटला सत्यग्रही मोहरा
भीष्माचार्य अपूर्व निग्रहमणी हो ब्रह्मचारी खरा
लाभो औक्ष पुरे सुभाग्य वितरो नांदो हरीच्या परी
ओपो स्वस्थ अमूप ज्ञानकण ते जे संचले अंतरीं

४–९–५० ★

## मायबोलीशीं हितगुज

सुभाग्य रवि मावळे दरवळे वळें ध्वांत हा
अतर्क्य विजली दशा विकट घोर भीतीवहा
उठे भयद डोंब गे भडकशी निराशा जनीं
रमें परी खुशाल मी तव सुरम्य संकीर्तनीं

कुणी हिणविती मला उधळ कां उगा मांडिली
किमर्थ रसनेप्रती फुकट झीज संपादिली
असीमवत एक हा स्तव पुनः पुन्हा गायिला
रसाळ मधु ओपण्या विषय नान्य कां घावला

तयां लवहि ठावुकें न मम अंतरींची कळा
कशी मज अमोल तूं अवघि एकली चित्कळा
परस्थ असतां दुरी तव वियोग गे बाणला
अहा तव विवंचनीं बहुत काळ मी कंठिला

अकल्पितपणें तुवां मज खुणावुनी बाहिलें
असंभवित योग हा जुळुनि चित्त आल्हादलें
समीप तव पातलों धुमति मंदिरीं गोडवे
अलभ्य सहवास हा मज न विस्तरें वर्णवे

यथेच्छ अवगाहुनी नवरसीं पुरा डुंबलों
सुखें इतर सांडुनी भजनिं एक मी रंगलों
ममत्व उसळे मनीं परम सौख्य लाभे पुरें
कशीं सरलीं सत्वरें सुखद सप्त संवत्सरें

फिरे फिरुनि भाग्य हें तुज दुरावलों गे वये
अवीट तव चोखटा मधुर बोल कानीं न ये
समागम पुन्हां कधीं तव लभेल चिंता मना
निमग्न नित घोकणीं पुरवी कोण ही कामना

न संभव उरे अता गमुनि चित्त सुन्नावलें
विषाद उतुनी उरीं जरठ नेत्र पाणावले

अये ! तुजविना कसें मम विराण झालें मन
सहूं कुठवरी अहा उद्वेग हा असा दारूण

असह्य विरहानलें क्षिणक अंतरंगीं उठे
विदारक विनाध्वनी हृदयीं आर्त टाहो फुटे
उपाय न सुचे कसा विरह ताप हा आवरूं
तसाच वसलों मुका तटत मी तुझें लेकरूं

क्षणैक रिझवावया भ्रमित या तुझ्या भावुका
तुवा द्रवुनि धाडिली चुळबुळी तुझी दूतिका
प्रफुल्ल नित हासरी विमल बोलकी सुंदरी
नवांबुज दलीं थटे धरूनि रम्य वीणा करीं

गमे सजलि चंचला ! निसट पाउली कामिनी
जणूं झगझगे नभीं तरल खाष्ट सौदामिनी
क्षणें रुणझुणें क्षणें मृदुरवें कथी भाकितें
क्षणें चमकुनी तमीं गुपित सृष्टिचें दाविते

मना चववि मंत्रुनी गुणगुणे स्वरांची गती
क्षणांत मति भारुनी रव तुझे हृदीं गुंजती
खुलें त्वरित होय गे तव अमोल भांडार हे
अमूप लुटवावया मम मनीं जिगीषा वहे

तुझा मधुर साद गे स्फुरवि ओज या अंतरीं
नितांत बलवंत तूं अतुल वीर्यवाही खरी
प्रभाव तव संचरे भिनुनि रोमरोमीं अहा
तदा विभवयुक्त हो फिरुनि गे महाराष्ट्र हा

मम श्वसन दिव्य तूं बहिलवान तूं प्राण गे
त्वदीतर न चिंतनीं मुदित चित्त माझें लगे
खुशाल हिणवो कुणी मज न खंत वा मी न भी
अहेव पुरवावया सबल ब्रह्मकन्या उभी

अये हृदयहारिणी तव वसे छवी अंतरीं
सहर्ष नित वागवी धरुनि एकचित्तें उरीं
चितो विकट आपदा मन रमें परी नर्तनीं
अपूर्व हृदयेश्वरी खचित गे तुझी मोहिनी

त्वदीय गुण गावया मम सदैव वाणी सजो
तुझ्या सतत सेवनीं विकल देह माझा झिजो
तुझाच रव अंतिं गे मज सुखें सखे ऐकवी
वहील तव भाट हा तुज अखेरची भैरवी

१६–९–५०

★

## बाळ उल्हास

करी घेवोनी गेंद कचकडीचा
निघे क्रीडाया बाल लघु वयाचा
पकड चेंडूची मुठीं हात हाले
मान कलथोनी डुलत डुलत चाले

शुभ्रवर्णी लघु गोल टेहळून
भ्रमें भासे पक्ष्याण्ड जया जाण
अतराळांतिल काक दोनतीन
उडत येती अंगणीं लालचून

बाळ फिरके ठमकती कावु मागे
गोल मटकाया आर्त जीव टांगे
नजर गेंदावरी मांडिती तनाना
कशा लवलवती लिबलिबीत माना

बळें आपटितां गेंद उंची घेई
बाळ उल्हासें हर्षभरित होई
झेल झेलोनी समाधान पावे
कार्यसिद्धीची भावना सुखावे

हुके दुर्दैवें झेल एक वार
रोख निसटोनी गेंद हो पसार
मुखीं अलगत पकडोनि एक काकें
उच्च जागीं भुरकुनी उभा ठाके

बाळ किंकाळे जागविल्या हांका
अबल बच्छाची कदर काय काका
गृहीं बसलेला एक जो समोर
त्वरित परिहारा धावला किशोर

दगड भिरकावुनि काक जेर केला
भयें चंचूंतिल गेंद तो गळाला
धरीं गोंजारी हृदीं ये उमाळा
बाळ परते आनंदुनी घराला

बाळ उल्हासा जगीं स्वार्थसाधू
कैक असती दुर्मती कपटसिंधू

डाव त्यांचे जातील विसकटून
ईश त्राता तव मान हें प्रमाण

देव बाळातें सदा सुखी ठेवो
सतत सुमतीचे दीप तेज दावो
बाळ उत्कर्षी जगति भाग्य काढो
ममत्वाची ही वंशवेल वाढो

२७–२–५१ ★

## हटवादी ताई

अगदी वेडी
का उगा घालिशी फुगडी ?

कसा असा तव भोंगा वाजे
घर आवाजें सारें गाजें
उगी उगी गे ताई माझे
रुसबा सांडी
का उगा घालिशी फुगडी ?

पुरे करी गे लाडू बाई
कळसा जाई तुझी फुगाई
कोण कशाला कुटबर साही
तव कुरघोडी
का उगा घालिशी फुगडी ?

हटवादी तूं रडकी भारी
पटेल कोणा अशी नोवरी

तुला न्यावया आला दारीं
बघ लंबाडी
कां उगा घालिशी फुगडी ?

२३-२-५१ ★

## आवाहन

ये ये गे! शिणती नयन
ये माझे आई !

प्रकटवि तव वीर रूप
देखुनि जें ये हुरूप
मोह दूर हो अपाप
अनुपम पुण्याई

उठवुनि तव सत्वरान
पराक्रांत करि जनमन
विकल हृदीं फुंकि प्राण
गे जीवनदायी !

स्वजन मनीं प्रीत रुजव
उभव संघशक्ति पर्व
ध्वंस कलहबीज सर्व
लेश नुरो कांहीं

समय विते विकट घोर
अही करिशा कां उशीर

तिथें मन हो अधीर
ये ये लवलाहीं

२१-८-५१ ★

## बंडखोर

तूं बंडखोर गे सजणी
धसमुसळी तव उसळी
तू बंडखोर गे सजणी

उपचारांची तुला न चाड
दांभिकतेची तुज ये चीड
कशि क्षणांत गे धसमुसशी

सत्तालोलुप कुणि नादान
ठोकुनि देती खुळें निदान
खवचट शब्दें सुखाविशी

दडपाया नव धुंद उभारी
लोळवितां तुज कुणी भूवरीं
उफळुनि घेशी कशी उशी

आणि भारता संकटिं बघुनी
उडी घालिशी कशी रक्षणीं
निवळ सोनेंचि बावनकशी

२०-३-५२ ★

# भ्रमनिरास

कासया हा रूसवा आई
संत्रस्त मना ताप देई
जगा ठावुकें अवमानाचें
शल्य तुझ्या हृदीं बोचें
परि हेंचि साधी बलवर्धन
सत्य, सत्य माते ! जाण.

\+ + +

खिन्न अशी कां उगी बैसशी माते घुंगट पांघरुनी
ऊठ अता गे तव भाग्याची कमान चढली बघ गगनीं

उपेक्षिलें तुज अपकर्षाया मानकऱ्यांनी परोपरीं
नावडतींचें मीठच आळणी करी कसेंहि कार्य जरी
संकेतुनि जलविद्युत् कार्या लावुनि आशा चाळविलें
मत्सरभावें तुला गांजिलें वुऱ्यांतुनि परि निघे भले
झांप उडाली दुही निमाली सजती तव जन संघटनीं
ऊठ अता गे तव भाग्याची कमान चढली बघ गगनीं

२

नव्या युगाचे नव्या दमाचे युवक तुझे हे उभे खडे
वीरकन्यका सत्त्वधीर तव गस्त घालिती चौंहीकडे
तवहितद्वारा भारतवैभव उभवाया हा संघ सजे
ध्येयनिष्ठ गे स्वार्थत्यागी चतुर धाडसी वीर तुझे
भ्याली मग गे माय कुणाची तुज छेडाया जाणपणी
ऊठ अता गे तव भाग्याची कमान चढली बघ गगनीं

३

अपकाराचा घेतिल बदला उपकारांच्या बहुमोलें
सत्प्रेमानें मनें जिंकितां निशंक भारतभाग्य खुलें
पावित्र्याची कास धरूनी नीतिभ्रष्टता नशतील
दीर्घोद्योगें भारतभूला वैभवशिखरीं नेतील
स्थापित होइल रामराज्य मग खरेंखुरें गे या भुवनीं
ऊठ अता गे तव भाग्याची कमान चढली बघ गगनीं

६-४-५२ ★

## मायबोलीची भूपाळी

प्रभातकाळीं तुझी लागली ओढ मायबोली
भंवती गुंजे तव गुण गानीं मंगल भूपाळी
ज्ञानामृत गे तुला पाजिलें संत ज्ञानदेवें
नाथ समर्थें तुझीं फोडिलीं शब्दांची पेवें
भक्त तुका तव तार छेडितां जनमत आंदोळें
साथ कराया भंवती जमले संतांचे मेळे
शिवशाहीचे भाट वाहती तुला कुर्निसात
शृंगाराबरि वीररसाची झाली बरसात
चलन पटविती तुझे धोंगडे मर्द गांवढाळ
जिवट किती ही मूस रांगडी तुझी टांकसाळ

नव संज्ञा योजनी ना अडे
सत्वर फुटती ध्वनि रोकडे
सुघटित गुलजार नी फाकडे

रोखठोक हा नाद छणाणे नित रानोमाळीं
भंवती गुंजे तव गुणगानीं मंगल भूपाळी

२

जडणघडण तव निसर्गनिर्मित राकट दळदार
थेट निग्रही तुझा पिंड गे कर्तृत्वा धार
कुणी डिवचितां प्रखर सूर तव लगोचि खडसावी
भीती लवही कधी कुणाची नसे तुझ्या गांवीं
स्निग्ध साद परी तुझा परिसतां फुले दिव्य आशा
परंपरागत फूट वातुकी गुंडाळी गाशा
नसानसांतुनि प्रेम पाझरे खुलें दैव आता
उजरें जीवन तुझ्या प्रभावें तूं आमुची संस्था
जनता तव संथेचि भारली
थेट एकरूपता पावली
उजवाया भारत धावली
महाराष्ट्रभू विजयोत्साहें तुजला कवटाळी
भंवती गुंजे तव गुणगानीं मंगल भूपाळी

२९ ५-५२ ★

## मराठीचा साद

चैतन्य दिव्य स्फुरवी
तव साद गे प्रभावी

मन लालचे विलासा
शैथिल्य गुंफि फासा

कर्तव्य मार्ग दावी
तव साद गे प्रभावी १

खुपती पथीं सराटे
नैराश्य दाट दाटें
आशा तरंग फुलवी
तव साद गे प्रभावी २

आपत्प्रसंग येतां
असता परस्थ नेता
झुंजार वीर सजवी
तव साद गे प्रभावी ३

ये घोर शत्रुघाला
दे हात भारताला
चढवील राष्ट्र विभवीं
तव साद गे प्रभावी ४

१०–२–५३ ★

## दैवी कलाकृती

पूर्वेची कडसारूनी ढकलिला कोणी बरी गोल हा
मेघांचे नभिं शुभ्र पुंज जमले ज्याची कराया चहा
ज्योत्स्नेचे कण शोषुनी घन कसे सऱ्हास तेजाळले
तेवो मेघ नभीं जसे रजतसें तेवी खरे शोभले

पिंजारी बसला अदृश्य गगनीं कापूस पिंजावया
निर्नादें हलकें फिरे धनुकली वायूसवें लीलया

कौशल्यें धुनके दिसे मृदु जणूं कापूस हा शेवरी
त्याचे गुच्छ इतस्तता तरळती या मंद वाऱ्यावरी
तें पल्याड वरी तटाट पसरे अह्लाद नीलांबर
तेजस्वी गहिने हिरे जडवुनी हो सिद्ध ही चादर
रत्नोन्मेष सतेज दिव्य उसळे स्फुल्लिंग उद्दीपना
मेघांचा शिलगावया मज गमे चाले जणूं विंझना
विश्वेशें सृजुनी कलाकृति अशी शृंगारिलें अंतर
डोलें मन्मन हर्षुनी बघुनि हें लावण्य चेतोहर.

२८–२–५३ ★

## त्रस्त महाराष्ट्र माता

धडुत रकट्यापरि केश विखुरलेले
दीठ आकुंचे वदन गलित झाले
बसे गालातें लावुनिया हाता
खिन्न दिसली मज महाराष्ट्र माता

२

भंवति हिंडे परिवार थोर सान
क्वचित कोणाचें तिच्या ठायिं ध्यान
बहुत गढलेलें नित वितंडवादीं
सूज्ञ म्हणवाया मग्न याच छंदीं

३

सजति तंडाया मीपणें शहाणे
नाद टंठाणे फुटति जणुं फुटाणे

पदिं न कोणाच्या ठरे पायपोस
मत्त जोषें चालला हायदोस

४

कुणी कवटाळी आपुल्याचि ढंगा
सज्ज फिरवाया मातृहृदीं इंगा
फुगे कोलाहल मातविला धिंगा
मंचति घालाया राजरोस पिंगा

५

बंधु उत्कर्षें कुणि रचि कुभांडा
कुटिल छद्में घातिला कोलदांडा
स्वार्थ बोकाळे रमति घातपातीं
एकमेकावरि दांत ओठ खाती

६

सुपुत शिणवी कुणि कष्टवुनी काया
एकजिनसी मंदिरा उभाराया
विघ्नसंतोषी कुणी जना डौंची
सजे भंगाया मूर्ति देवतेचि

७

तिच्या बाणीचे थोर शिल्पकार
झिजति निर्माया शब्दचमत्कार
नुरे निरखाया समय मातृदैनीं
गर्क होती अपुल्याच मानपानीं

८

'ऐट मातेची' वृत्ति ही चटोर
असें उद्गारी कुणी शिष्ट थोर

मातृनांवें जणु जाय फुरगटोनी
बंधु विश्वाचा असा आव आणी

९

स्वहित साधाया रंगविला डाव
मळो मळलें जरि माउलिचें नांव
वित्त संचयनीं होवुनिया दंग
बळें मातेचा करी मानभंग

१०

स्वजन बसलेले उपाशी अनाशी
शिवे कसलीना भावना मनाशीं
कुणी आमंत्री सुखासीन अन्या
अहा मौजें चालल्या मेजवान्या

११

कुणी गरिबांचा बळें सजुनि वाली
एक दशकाचा सुखें अंक घाली
घरीं सोन्याचा निघे सतत धूर
सजे धर्मात्मा असा दानशूर

१२

बघुनि पोरांच्या अधम घोर लीला
उबग येई बापुड्या माउलीला
आणि थोरांची उदासीन वृत्ती
उठवि भडभडुनी आग मस्त चित्तीं

१३

आस ढासळली तिडिक हृदिं सळाळे
जीव धारतावें प्राण कंठिं आले
मनीं चरकुनि मी तिजसमीप जाई
म्हणे कळवळुनी उगी उगी आई

१४

निवुनि जातिल गे दिवस हेहि माते !
उगा चित्ता कां तापविशी चितें
पुत्र असतां तव वीर्यवंत देवी
मनीं भलती कां भावना धरावी

१५

मंद तेवे अंतरीं प्रेमज्योती
स्वार्थ मीपण कज्जलें क्षिणे कांती
कमुनि टिचकीचा मार बसे जेव्हां
मुक्त झळके हा दिव्यदीप तेव्हां

१६

मदोन्मत्तांच्या खाउनिया लाथा
आणि इतरांच्या सहुनि नींद्य बाता
मनीं उमगुनि त्यजितील वृत्ति घोर
विरुनि होइल गे नयन पटल दूर

१७

संघशक्तीच्या मग उभेल साठा
बंधुप्रेमाच्या उसळतील लाटा

शिरीं वसवुनि तुज नाचतील सारे
भरुनि अंगीं हें नवें दिव्य वारें

१८

बघुनि भारतभू अंतरीं फुलेल
मोल जाणुनि तव हृदीं तुज धरील
धजे छेडाया कोण मग मवाली
अहो ! कोणाची काय माय व्याली

१९

अतुल प्रेमाचें राज्य अवतरेल
अतुल भारत जय जगीं दुमदुमेल
आस ऐशी [illegible] तुझ्या भावुकाची
ईश चरणीं [illegible] हीच सदा याची

२६-३-५३ ★

## [illegible] मराठीची मांडी

माते अंक तुझा विमोहक खरा जादू कशी जागती
भोगांची अवघ्या सुखें पहुडतां होते मला विस्मृती
क्रीडाया तव दांडगे रव कसे चौफेर घोंगावती
त्यांची साथ करावया मन गढें रात्रंदिनीं संगितीं

हेंगाडी म्हणती म्हणोत तुजला अज्ञान हें खोचरें
वीरत्वें भरलें कसें खचित मी सामर्थ्य जाणी पुरें
मंत्रूनी सजिली तुझ्या रवबळें तेजाळ वीरावली
आचंद्रार्क घुमेल गे सतत हें सौरभ्य भूमंडलीं

वेचानी तव धष्टपुष्ट रव हे वाऱ्यावरी फेकिले
शोषोनी कण दिव्य ते परतती स्फूर्ती भराया वळें
माते ! मोद अलौकिक असा शब्दें तुझ्या साधिला
ब्रह्मानंद गमे फुका तुजपुढे निस्तेजसा भासला

वाटे स्वर्ग नको नको अमरता कांहीं नको लोढणीं
आकर्षे मन एकमात्र तुझिया अंकावरी लोळणीं

२८-३-५३

★

## बेगडी पांढरी टोपी

अतुल प्रतापी
बेगडी पांढरी टोपी
जनसेवेचा करी बहाणा
वळें लुडबुडे दावुनि करुणा
युक्तिप्रयुक्ति लढवुनि नाना
मलिदा चोपी

११९९०

चोख इमानी अशा शासका
कुभांड रचुनी देई हिसका
सत्कार्याचा करवी विचका
खडतर खप्पी २

साध्य कराया अपुले डाव
गांधीजींचें मिरवी नांव
यथेच्छ लुटला सारा गांव
अधम हपापी ३

कुठोर चाले हा पुंडावा
हाणा मारा झोडा तुडवा
पायीं चिरडुनि धुळीस मिळवा
नीचतम पापी ४

१९–७–'१३ ★

## वागीश्वरीस

सती शारदे चंचले वीर्यवाही अम्हां भावुकांच्या अये पक्षिणी
फिरे जेधवा गे तुझी स्वैर कांडी उफाळे मनीं मुग्ध मंदाकिनी
प्रवाहीं तुझ्या क्रीडतां भोग माझे कसे मंदुनी पार ओशाळती
तुझे देखुनीया चमत्कार नाना भ्रमें भांबवे भावडी मन्मती

इशारें तुझ्या मंत्रुनी भारलेले छुपे शब्द येती कसे धावुनी
अलंकार शृंगारुनी प्रास सारे कसे वाकती गे तुझ्या सेवनीं
तुझ्या स्पर्शमात्रें अहा शब्दसृष्टी कशी रम्यरूपा नव्या पावली
कसें नादुनी दिव्य संगीत चाले जणूं स्वर्ग हो हा उभा भूतलीं

तुझा वीर झंकार कानीं पडे तें मराठा कसा चेकळे चेतुनी
त्वरें सांडुनी फूट साहाय्य साधी महाराष्ट्र स्वत्वाचिया रक्षणीं
अशी संघशक्ती जरा विस्कळाया असे काय प्राज्ञा कुणाची तरी
विभांडूनि वैरी स्थिरावील अंतीं अहा भारता वैभवाच्या शिरीं

तुझी ओढ नाही असे कोण ऐसा किती ही जरी रुक्षता रोधवे
तुझी झोंबता धार पाषाण गाळी झणीं आर्द्र होवूनियां आंसुवें

तुझी चेतता अंतरीं दिव्य ज्योती भरे मूर्त चैतन्य या जीवनीं
पळे धाकुनी दूर वैकल्य सारें खरी गे खरी तूंचि संजीवनी

२४-१०-५३ ★

## दिवंगत कवि टिळकांस

बरिषें पसतिस पुरीं जाहलीं कवे! तुला जावोनी
पूर्वकथेच्या स्मृती उजळतां जाई मम मन उलुनी
जेव्हां जेव्हां तूं मम गेहीं येशी मुक्कामाला
मन आनंदुनि उधाण येई अमुच्या उत्साहाला

बिकट चाकरी सरकारी मम सूळाबरची पोळी
घडेल अवचित ऑगळ कांहीं सदैव चुटपुट जाळी
आगमनें तंव विसरे सारें मन होई निर्धास्त
भाव उसळती भेटे जणु हा जिवलग अमुचा आप्त

तुझी देखतां नित मंदस्मित प्रसन्न वामनमूर्ति
स्नेह उद्भवे हीच खरोखर परमसुखाची प्राप्ती
वाचस्पति तूं, श्रोता मी तव, जोडी रसिक जमावी
कां न तरी मग काव्यरसाला तुफान भरती यावी

तुझ्या आग्रहें मम आवडतें दत्तकवन मी गाई
गुंजविशी मग सूर मिडवुनी तुझी नवल नवलाई
गुंजन चाले सरकवि भुंवया हालचाल मौजेची
तुझिया इवल्या नयनीं चमके झगमग दिव्यत्वाची

काव्यरसाच्या सरी वर्षती संतृप्ति चित्ताला
आरंभिशि मग तूं संदर्भे तुझ्या दिव्य भाष्याला

अमर्याद तव प्रीत दांडगी हिंदभूवरी साची
प्राणाहुनिही प्यारी तुजला संस्कृति निजराष्ट्राची

तुझी अस्खलित अमोघ वाणी अविरत झुळझुळ वाहे
गवसे मन मम तुझ्या कोंडणीं आकर्षुनिया मोहें
तृप्ति न होई आणिक श्रवाया मन घेई हव्यास
जाती निघुनी मज मोलाचे जरी तासचे तास

ध्येय न नुसतें कर्मवीर तूं सेवानिष्ठ स्वभावें
व्यक्तित्व तुझें थोर किती तें पुरतें मजला ठावें
खिस्तभक्त तूं म्हणुनि उपेक्षा तुझी कितीही झाली
गुमान न तुला शांत वृत्ति तंव कदा न किंचित ढळली

हेटाळिति तुज वात्र्या म्हणती कुचेष्टिती कवन्मातें
स्मितयुत वदनें तुवा शमविले माझ्या क्षुभित मनातें
नुच्चारिति तव नांव न साहे तुझी जरा चाहूल
वेड लाविते परंतु रसिका तव वनवासी फूल

रसरसलेली तव रसवंती आर्त हाक हृदयाची
भरुनि चालली प्रसादवाही गंगा पावित्र्याची
साध्या शब्दीं प्राण फुंकुनी उठवि कसा झंकार
मंत्रमुग्ध करि रसिकजना हा वाग्भट किमयागार

तुझ्या शारदे निरखुनि दिधले कवे ! तुला वरदान
जिवे मराठी घुमेल तोंवर प्रासादिक तव बाण
भवितव्येच्या स्यंदनिं वसुनी रसिक नवे येतील
ारुनि सारे विभ्रम तुजला उत्थापन देतील

क्रम.................... दि: ....................
क .......................... नों: दि: ....................


कविकुलतिलका ! प्रसादराजा ! हृद्गत किती कथावें
कंठ दाटला बाणी नुमटे इथेंचि विराम पावे
ऋणको मी तव व्यक्त कराया अल्प स्वल्प हें गाई
ये आता घे स्मृत्यंजलि ही प्रेमें तुजला वाही

९–५–५४ ★

## थोर मराठा

किती किती तूं थोर, मराठ्या,
किती किती तूं थोर !

देश पेट घे परि तुज राजा ! लवहि न चिंता घोर ॥
मराठ्या, किती किती तूं थोर ॥

ऐदि होउनी खुशाल रमशी सजशी हेकडखोर
खंत न तुजला मिळो कशीहि भाकर जरि चतकोर १

म्हणुनि भाबडा नागविती तुज फसवे उदमी चोर
लूट चालली झोडपती तव माळावरची बोर २

झिडकारिशी तूं हिततत्पर तव बंधु सख्याचा बोध
खवळुनि कोपें घरघालू तव उमटति सूर कठोर ३

सेबारत तव बाइल घरची काय तिचे तुज चोज
धनीपणाचा आव आणुनी होशि कसा शिरजोर ४

उच्चपदीं तव बंधु विराजे तुज न सहे हा योग
परक्यासह तूं कसा खेचिशी अपकर्षाचा दोर ५

शांतिभाव तुज कदा नावडे नित कलहाचा सोस
नाक कापुनी वडविशी अशुभा किती वर्णावे थेर ६

सरळ बोललों नको अवठरू हितवादी हा बोल
मनीं विंबतां बिरतिल राजा ! ढग हे काळेभोर
मराठ्या ! खचीत होशिल थोर ७

१२-६-५५ ★

## अंतर्दशा

(मातृपुण्यतिथि)

स्वातंत्र्या ! तव नांव धारुनि अहा स्वछंद बोकाळला
स्वार्थें स्वस्थ मनें खुशाल अपुला कावा पुरा साधिला
जो तो साध्य करावया धडपडे दुष्प्राप्य ही पर्वणी
सोद्यांचा जणु राजरोस भरला बाजार कोंदाटुनी

२

शुद्धाचार दडे खला दचकुनी श्रद्धा मुकी जाहली
नीतीची उरली न चाड कसली खालावली पातळी
धर्मा मत्तपणें पदीं तुडवितां दुर्वासना चेतली
येणे देश जळे, जळो, न इवली चिंता मना स्पर्शली

३

स्पर्धाया अनुभूतिशून्य नकटे भोंदू उभे राहिले
छद्में द्रव्यबळें जना छकवुनी उच्चासनीं बैसले
सोपरकार हवे तसे मिरवती दावावया धन्यता
सारासार विचार लोपुनि मुरे अंगीं अहंमन्यता

४

तज्ज्ञांचे अनमोल बोल न कदा ध्यानीं मनीं आणिती
सत्तेचा मद मस्तकीं उतुनिया निर्बंध हेटाळिती
एकामागुनि एक सत्वर निघे बेछूट आज्ञावली
पाठोपाठ सुटे हुकूम उलटा प्रजा बुडे गोंधळीं

५

द्रव्याबीण इथें न पानहि हले अव्याजता मावळे
उध्वस्ते व्यवहार त्रस्त जनता गांगारुनी विव्हळे
तंत्रें हीं वशिलावगें उधळलीं स्वेच्छावळें चौखुरीं
माजे गोंधळ साबळा अवतरे बेबंदशाही पुरी

६

लाभे देवदयें अपूर्व वरदी नेता जगव्द्वंद्य हा
उत्कर्षा अडवी प्रभावळ परी ऐशा कुकर्मे महा
भोंदू हेकट तामसी अवगुणी चौचाल हे दुर्मती
राष्ट्रा नाडुनिया खुशाल अपुले संसार शृंगारिती

७

चाले कोठवरी अराजक असें दुस्वप्न केव्हां सरे
कल्याणप्रद रामराज्य विभवें येथे कधी संचरे
केव्हां होइल 'सत्यमेव जयते' मुद्रा यशस्वी निके
ह्याचें उत्तर सार्वभौम जनता, ही मात्र देऊं शके

२३-८-५४ ★

## हें काय लोकराज्य ?

सत्तेचा अभिलाष ग्रासुनि मना सद्भावना लोपली
न्यायान्यायविवेक मंदुनि अहा पक्षान्धता तुंदली

होती बद्ध विचारवंतहि कसे पक्षाचिया दावणीं
जै पक्षार्पणमस्तु सर्व घटना हा भाव चेते मनीं
दुष्कृत्यें बहु राजरोस करुनी सोकावले दुर्जन
पक्षाधार म्हणोनि क्षम्य सगळीं हो स्वच्छ संमार्जन
कोणी अंतरटोचणी न सहुनी रोधावया आतुरे
शिस्तीचा बडगा परी निरखितां अंगीं भरे कापरें

स्वेच्छें भोंगळ योजना नवनव्या आकांक्षुनि आखिती
जेणें भारतसंपदा विफलुनी संभाव्य ये दुर्गती
तज्ज्ञांचे अवहेलुनी वच तयां पक्षाबळें दापिती
जावो देश रसातळीं न इवली चिंता न किंचित् क्षिती

गांधीचें नित पुण्यनाम वदुनी भोळ्या जनां भाळिती
चाले चर्पटपंजरी सतत ही झाकावया दुष्कृती
दुर्भावावरि पांघरूण सरसें खासें कसें घावलें
जिव्हाग्रें मधु अंतरीं उभविलें स्वस्थान हालाहलें

पक्षादेश मिळे विवेक ढगळे ये वक्रता चिंतनीं
कौटिल्यें झटती मतें मिळविण्या कीं हो पुरी मोजणी
मत्तें लोकमतां पदीं तुडविती निर्बंध हेटाळुनी
" सारें राष्ट्रहितार्थ " आव लटका अंगीं बळें आणुनी

यातें नाहक लोकराज्य म्हणणें निर्लज्ज चेष्टा दिसे
प्रज्ञेचा उपमर्द बेधडक हा, चाले कुठोरी असे ?
होवो होईल सार्वभौम जनता एके दिनीं जागृत
सत्तेचा पटधुंद हा उधळुनी लावील हें निश्चित !

प्रकाशन : 'सह्याद्री' मार्च १९५६ ★

# आळवणी

संकट तूचि निवारी, प्रभु रे !
संकट तूचि निवारी

पुंजीपति हे मदे ताठले
संपत्तीच्या उंचें झिंगले
राष्ट्रश्रेष्ठी कसे हुरळले
चळले सूज्ञ विचारी १

मुस्कटदाबी स्वैर चालली
गणराज्याची सजे टवाळी
अन्यायाची सीमा कळली
हलली दुनिया सारी २

अपमानाच्या सरी वर्षती
सोज्वल कलशा चिखल फासिती
त्यागाला कां फल हें अंतीं
भ्रांति चित्त विदारी ३

ऊठ मराठ्या ! भाव पेलवी
शिवरायाची स्मृति जागवी
मदांधतेची लाट परतवी
पुरवी ईश उभारी ४

८-६-५६ ★

## श्रद्धांजली

दास्यातें कवटाळुनी जन सुखें संसार संपादिती
तें ज्योती शिलगाविली प्रखरशी ज्यानें उभ्या भारती
ज्याची दिव्य अशांतता उफळुनी सर्वत्र हो शिंपण
त्या लोकोत्तर लोकमान्य टिळका माझें असो वंदन.

चौखंडीं चतुरस्र हेजिब तुवां निरबासुनी धाडिले
क्रांतीबीज जिथें तिथें रुजवुनी अस्वास्थ्य फैलाविलें
त्वन्नामें बलवंत राजवट ती भेणें जणूं पेंगळे
यावच्चंद्रदिवाकरौ वधविणें हा भाव कालें गळे.

भो आर्या पुरुषोत्तमा नरवरा! तूंतें हृदीं सांठवूं
सर्वश्रेष्ठ अशा अतुल्य तुझिया प्रेमें गुणां आठवूं
ग्लानिग्रस्त समस्त देश असतां त्वां ओतिलें जीवन
सारा भारत आदरें तुज सदा देईल उत्थापन.

तूं नाहींस इथें परी स्मृति तुझी स्फूर्ती अम्हा देतसे
अन्याया प्रतिकारुनी सम तुझ्या झुंजूं सदा साहसें

११–७–५६ ★

## खटका

संसारा तव शारदे! विसकुनी साहित्यिकें नासिलें
देखोनी झगडे अराजक असे मच्चित्त खिन्नावलें
त्याची नीट घडी जरा जमविण्या आदेश मातें मिळे
गेलों तै तव मंदिरीं निरखिलें औदास्य कैसें खिळे

माना हावरती परी नच रुचे खस्ता जरा खावया
ऐसे कार्यचुकार शिष्ट जमती हैदोस घालावया
काया मानस सर्व एकवटुनी नष्टावया हें झटें
झालें कार्यहि अल्पस्वल्प परि तें अत्यंत राही थिटें

जातीं यापरि दीर्घ सप्त वरिषें वार्धक्यहि वाढलें
कार्यातें स्वजने मनावुनि मला सोडावया लाविलें
गेलों दूर रमें सुखें प्रियजनीं आनंद भोगी परी
माझें चित्त अधीमधी उफळुनी जाई तुझ्या मंदिरीं

तों तूं फुंकर घालुनी मधुरशी, विक्षेपिलें मन्मन
वीणा छेडुनिया स्वरें भुलविलें नादीं मला लावुन
माझ्या या हृदयांतरीं तरळले ते सूर उन्मादक
कैसा तै प्रतिनाद गुंजुनि उठे माझें मला टावुक

आले सूर, फुलें प्रफुल्ल फुललीं या भाविकाच्या हृदीं
प्रेमें वंदुनि वाहिलीं मनभरी मन्मायबोली–पदीं
सन्मित्रें बघुनी प्रसन्न हृदयें वाखाणिली चातुरी
साहित्यीक परी मला म्हणवितां संकोचलों अंतरीं

ज्यांना मीं उपहासुनी बघविलें एकत्रुनी मंदिरीं
त्यांचें तें पद कां मला डिकावितां कां हो अशी मस्करी
यत्नामें व्यवहारशून्य जन जे आकृष्ट तंडावया
प्राणी व्रात्य असे अहा तरळती दृष्टीपुढे माझिया

हा सारा तव खेळ खाष्ट लहरी मीं शारदे ! जाणिलें
डौचाया मज ही अशी खिजवणी ऐकावया लाविलें

मातें तें अभिधान गोड न गमें ठावें तुला हें न का
जाणोनी मग कां असें हिणविलें या भावड्या भावुका

साक्षेपें गुदरीन साहसबलें फिर्याद आता जनीं
सारे लोकहि हासतील तुजला वृत्ती तुझी देखुनी
लोकान्तीं तुज खेचुनी तुजवरी टीकास्त्र मी सोडिन
बाभाडे तव काढुनी जगभरी नक्षा तुझा खंडिन

काढी पाश तुझे न अल्प तुजशीं संबंध माझा उरे
पूर्वीचें व्यवहार्य कार्य करण्या मच्चित्त हें आतुरें
वेडाबे मज हासुनी मग वदे, "हें शक्य का होइल ?
का हा रंजक धुंद नाद सहसा पिच्छा तुझा सोडिल !

ज्ञात्यां दुर्लभ तो प्रसाद लवसा प्रेमें तुला ओपिला
भाषाज्ञान जरी तुला न पुरतें संकल्प निस्तारिला
मंत्रोनी मम दूत शब्द सरसे साह्या तुझ्या धाडिले
थोडें जें तुज साध्य होय तितुकें त्यांच्याचि स्फूर्तीबळें

थोड्याचें बहु विक्रियाकरण हें साहित्यिकी लक्षण
त्याची नक्कल थेट तूंहि करुनी तें मानिशी भूषण
तूं साहित्यिक निर्विवाद असतां कां शब्द हा बोचला
रे मूढा ! न खुळा तुझ्यासम असा कोठे कधी पाहिला

या साऱ्या तव अर्थशून्य गमजा दे बा कसा सांडुनी
माझी वक्र जरा तरी नजर हो जाशील पस्तावुनी"
हृत्कोशीं अनुताप कोंदुनि भरे बोलां अशा ऐकुनी
वेगें आर्तरवें 'क्षमस्व' वदलों दोन्ही करां जोडुनी

झालें गेलें विसरुनि अता जाय गे स्वच्छ देवी !
वृद्धावस्था अधुनिमधुनी अंतरा खूळ लावी
त्याची किंचित् दखल सदये ! तूंहि चित्तीं न ध्यावी
लाडेंकोडें कवळुनि मला पूर्ववत् लोभ ठेवी.

२–८–५६ ★

## अनुग मी तुझा

क्रुसा खिळुनिया बळी करिति तो उभा भूवरी
खुशाल लटकाविला मनुजदेह आधांतरी
गुरुत्वबल ओढितां तनु खिळ्यावरी पेलिली
भरें व्रण विदारुनी भडकली कशी काहिली

वसंत ऋतु मध्य ये बहरली धरा जोमुनी
तपे रविबळें अता जणुं सचिंत बिव्बसनीं
नभीं क्रमित सूर्य ये झगमगोनि माथ्यावरी
कशा बरसती अहा प्रखर आतपांच्या सरी

असह्य चरका बसे तपुनि लोह शंकु व्रणीं
जणूं नसनसीं उठे शिणक इंगळी दंशुनी
अपंग वपु लेवुनी प्रभु असा क्रुसीं टांगला
सहोनि यमयातना प्रहर एक ओलांडला

उभे स्वजन ठाकती द्रव न ये जयांच्या मना
हृदीं अकस भारुनी करिति नींद्य निर्भत्सना
बळें नृप करावया कसुनि जे तया धुंडिती
कसे उलटती अता, विचल लोकगंगा किती

जनां नित सुखाबया सुखजयें परित्यागिलें
क्रुसीं खिळवुनी तया अणिक हाय हेटाळिलें
कृतघ्न खल हे परी द्रवुनि चित्त कारुण्यलें
ममत्व उतुनी उरीं गहन प्रेम बोसंडलें

म्हणे द्रवुनि गा पित्या करिति काय हे नेणती
क्षमा करि तया, न घे दखल, हो न किंचित् मिती
दयातर्तम बैखरी कुणी कधी अशी ऐकिली
अमूर्त जगदीश्वरीं करुण मूर्ति साकारली

प्रभो ! मनुजवत्सला नरवरा ! दयासागरा !
तुझ्यासम लभे कुठे मज दुजा असा आसरा
कसीं निरखितां तुझें बिमल निष्कलंकी जिणें
उणें इतर भासतें जग दिसें कसें ठेंगणें.

तुझें चरित चिंतितां स्फुरवि भिन्न संवेदना
उदात्त नव शील दे अचल सौख्य शांती मना
प्रसाद तव लाभतां दुरित भाव चित्तीं नुरे
प्रपंचन न मानवे अनुग मी तुझा हें पुरे

२८–६–५७ ★

---

गुरुत्वबळ = The force of grauity. भरें = भारानें. कसीं = कसोटीवर लावून. भिन्न संवेदना = निराळीच जाणीव. गहन = गाढ, Nystecatas (दोन्ही अर्थी) प्रपंचन = चऱ्हाट.

# अमेरिकेस

नका घोळ घालूं दिमाखा उगाळू चितारूं नका दृश्य आडंबरी
दिपेना जरा मी जरी द्रव्यराशी तुम्ही ओतिल्या गंज या भूवरी

नका घोंगवू दैन्य कानीं कपाळीं कराया फुका वल्गुनी पैरवी
असो रंक कंगाल मन्माय भूमी तिच्या लक्तरांची मला थोरवी

शताब्दें अम्हा दोन लुंगाडुनिया पुरे शोषिले जीवनाचे झरे
प्रजा क्षुब्ध होतां पळाले इथूनी तुम्हां भैरबांचे सगे सोयरे

अता मोहिनी अस्त्र योजूनि आला तुम्ही आमुचे सत्व नागावया
धनें भारुनी पत्करूं अर्थदास्या असें भासलें हो तुम्हां कासया

तुम्ही जोखिले ना पुरे भारताचें चिरंजीव अध्यात्म शक्तिबल
सदा डुंबता हीन द्रव्येंद्रजालीं कसें गम्य हो ध्येय हें उज्वल

इथे जन्मले तत्ववेत्ते महात्मे किती, कल्पना काय तुम्हा असे
गणाया कदा ये न वैपुल्य ऐसे जगीं अन्य देशी कुठे हो दिसे

तपस्वी महर्षी वनीं वास ज्यांचा जयें ज्ञानभांडार केलें खुलें
मनःसंयमी ब्रह्मचारी युवांचे जथे जेथ विद्यार्जना पावले

शुचिर्भूत आचार सच्छील वृत्ती सदा सत्य हें ध्येय चित्तीं उभे
प्रभावें जयांच्या जनीं नीति वर्धे मनःस्वास्थ्य सामान्य लोका लभे

परी अन्यदेशीय लोभी लुटारू इथें येउनी देश भ्रष्टाविती
अहा पाश्चिमात्यें कडू भेदबीजें किती पेरियेलीं उभ्या भारतीं

तरी यादवी झुंज सर्वत्र माजे असूया अविश्वास बोकाळली
किती शेलकीं नीतिमूल्यें युगांचीं कशी हाय सर्रास डागाळलीं

सुदैवें अकस्मात स्वातंत्र्यरूपीं उगे सूर्य तेजें झळाळे किती
युगांची अतां संपली मोहनिद्रा पुन्हा भारता प्रात हो जागृति

सदा संचरें दिव्य स्वातंत्र्यवारें भरे मूर्त चैतन्य लोकीं पुरे
सरे लोपुनी हीन दौर्बल्य सारे बलोपासना अंतरंगीं मुरे

भयें आमुचा देश हो साम्यवादी अबाडाब नाना तुम्ही मांडिले
नवोद्‌भूत सामर्थ्य खची कराया कशा धूर्त डावा तुम्ही योजिले

तुम्ही धाडुनी धर्ममार्तंड येथें अहा आमुचें ऐक्य नासावलें
छुपा द्वेष फैलावुनी नागलोकीं फुटीचें कडू बीज उत्पादिलें

धनाच्या सरी वर्षुनी लुब्ध केले भुकाळू अधाशी टगे हेरुनी
उभा सज्ज गोतावळा दांभिकांचा कसा गुंतवी भाबड्या घेरुनी

पुरा व्हावया भेद या संघराज्यीं तुम्ही लाविली कंटकी सावर
सदिच्छा अम्हा दावुनी निंद्य भावें कशी ठोकिली घातुकी पाचर

कसा आणिता आव सच्छीलतेचा सदा ख्रिस्त हें नाम उच्चारुनी
क्रियेवीण वाचाळता चालेली अहा मुद्रणी, भाषणी, लेखनीं

तया आफ्रिकेच्या अभागीं प्रदेशीं कशी राक्षसी घोर चाले कृती
परी झाकितो नेत्र निढावुनीया बकाचे परी दंभ हा दुर्मती

कसा मांडिता खेळ भोळ्या जिवांचा तुम्ही गौरकायी अहा लीलया
असे काय तुम्हा जरा लाजलज्जा फुका ख्रिस्त नामा मुखें घ्यावया

मनःपूत अण्वस्त्र रुद्रास्त्र ऐशीं महाघोर अस्त्रें तुम्ही निर्मिलीं
पुरी दक्ष ग्रासावया जीवसृष्टी जगा हादराया तुम्ही योजिली

जपानीय पौरांवरी झोकुनीया प्रजा भावडी पार निर्दाळिली
अहा जीव कासावता अर्धमेले जरा कींव नाही मना स्पर्शली

अता दाविता धाक साऱ्या जगाला कशी तामसी पाशवी वृत्ति ही
अहा क्रौर्य–नैपुण्य उच्चांक गांठी तुम्हा लाजला क्रूर सैतान ही

सदा धीर गंभीर ही आर्यभूमी तुम्हा भीक घाली वृथा कल्पना
जगूं वा मरूं वा परी स्वत्व राखूं पुरी बाणली अंतरीं भावना

श्रमूं घाम गाळूं अम्हा आमुची भू यथाकाल दे लाभुनी वैभव
फुकाचे नको द्रव्य जे हानिकारी नको व्हावया न्यून–गंडोद्भव

हृदीं छद्म ठेले वरी मानभावीं सदा बोलणें चित्त उद्वेगिते
सहे हें कुठोरी पुरे स्तोम आतां चला येथुनी शीघ्र व्हा चालते

## फुलांची पखरण

किती तरी तुज गाया गाणीं उतवलों नायबोली
बहुत गायिलीं परंतु नाहीं भूक मनीची शमली

एक एक रव तुझा लकाके तेजवंत जणुं मोती
घडण घडविती सहज गांवढे सुघटित हातोहातीं

क्षणोक्षणीं गे भुलवी मजला जादू तव बोलांची
रानोमाळीं कशी पसरली पखरण स्वैर फुलांची

किति वेचावीं, गुंफाव्या किति रम्य मनोहर माला
मन हव्यासें जीर्ण करी परि जोम न आता उरला

नैराश्याच्या परिसुनि बोला रुठली अंतःस्फूर्ति
वाणी नुमटे स्तवार्थ तुझिया सुचे न एकहि पंक्ति

दत्तोबामन ऋत्विज तव गे तुझ्या खेळवी बोला
मंत्रमुग्ध करि क्षणैक झुलवी साऱ्या श्रोतृगणाला

न. रें. फाटकें तुझीं जोखिलीं सूक्ष्म छटांची गूजें
कुशाग्र धीची कठोर वृत्ति हृदिं जरि प्रेम विराजे

तव उत्कर्षा बांधुनि हातीं कंकण विठ्ठल घुमवी
प्रफुल्ल कणखर चेतोहरी घाटी रव ओजस्वी

शृंगाराची ध्वजा फडकवी कुशल ललित सम्राट
भडक रंगली कलाकृती परि अनुपम हृद्य अचाट

सत्वगुणाचा भाऊ आला वर्धवि तव संभारा
स्वीकारूनि पथ कोटिक्रमाचा करि कोट्यांचा मारा

न बधे म्हणुनी रसवंतीला त्यागी बापू माटे
तिची बानगी गद्यीं फुलवुनि तिची टवाळी थाटे

दंड थोपटी हजरजबाबी आचार्यांची स्वारी
विषयग्रहण क्षम चतुरस्रबलें उडवि सहज भंबेरी

हा बघ इकडे भागानगरीं जातिवंत शाहीर
विरलेल्या गारांची आणी तुला अलौकिक नजर

तापटकाका खरा तपस्वी जमदग्नि अवतार
परसत्ता उलथाया परजी कणखर नाट्यकुठार

कविकुलतिलकें तुला चढविला अमर फुलांचा साज
कुणीहि भुंको गजपति चाले प्रसन्न प्रसादराज

तैलभावना तर्क अपरिमित ये क्रांतीची उकळी
गिरक्या घेई लक्ष्मणशास्त्री वैचारिक बावटळीं

विचारचक्रीं उद्दीपुनिया कांत क्रांतिपुजारी
तव वाक्पटलीं नैराश्याचीं दृश्यें भडक चितारी

निस्पृह विवरण रवी घेऊनी मास्तर चतुर उभेला
क्षीरसागरीं मंथुनि काढी नवनीताचा भेला

तत्वतरंगी मुसमुसलेला विशाल नेत्री काळे
बूज करो वा न करो कोणी ज्ञानानंदीं डोले

करी मोकळें उदार हस्तें यशोधनाचें पेव
लुटा कितीहि कदा न आटे यशवंताची ठेव

मंगेशाची पुलकित वाणी थयथय नाचत चाले
कंपें कवितनु कंपवि रसिका अपुल्या मधुमधु बोलें

भावरसाचा तत्वज्ञाचा बोरकरी हा थाट
उठुनि दिसे तंव कंठाभरणी गोमांतकि हा घाट

## सुरांचे कण

मनीं नसे भाव
मला देवी पाव हाका मारी

\+ +

कधीं कोणे काळीं जुळलें यमक
भासलें गमक प्रतिभेचें

\+ +

आवृत्ति कोशांची घडोघडी

\+ +

नको नको देवा तोंडपाटिलकी
याहुनी म्हारकी पुरवेल

\+ +

सांगे भाट ही तो अंतरीची खूण
घ्या हो ओळखून पुरे पुरी

\+ +

कशी उतरणी सळाळली

\+ +

सदा निर्भळ सत्तेचा उफाळा अंतरीं माजे
सदिच्छेची परी भिद्दी तुतारी प्रत्यही वाजे

\+ +

अशी सर्रास चाले ही छुपी छञी बुवाबाजी

\+ +

लावुनि घेशी मागें फुकट
प्राणांताचें शुष्ककाष्ठ

\+ +

कार्यांची नस दाबणे अनुदिनी हव्यास ज्यांना असे

\+ +

ठेबी जो क्षतदृष्टि अक्षय अशी त्याची असे ही गत

\+ +

केला निश्चय भंगिला परि तुवां ना भेकडाच्या परी
होई मन्मति खिन्नवृत्ति बघुनी ऐशी तुझी बावरी
सोडी चंचलता धरी दृढ मनीं निर्धार शूरागत
वेळेची महती सदा बळखुनी कार्यीं पुरा हो रत

१०–८-५७ ★

\+ + +

मेघांचा जणु विंझणा हलतसे स्फुलिंग उद्दीपना

\+ + +

ख्रिस्तमेध होतां सांग लोपे कर्मकांड
खुलें झालें देवाजीचें कवाड सताड

ख्रिस्तमेध होतां सांग गोप्या नुरें स्थान
चिरें अंतःपट घडे रहस्यदर्शन

ख्रिस्तमेध होतां सांग सिंचे भूरुधिरें
ठायीं ठायीं झिरपती जीवनाचे झरे

ख्रिस्तयज्ञ होतां सांग उंचावले दीन
स्मरणीचा होय मेरू मार्या माग्दालीन.

\+ + +

कवितेची गुंफण होत असतां कधी कधीं मजेदार गमतीचा अनुभव येतो. सूर उमदळले म्हणजे सुलभ प्रसूति होते, पण एखादें अवखळ मूल अडलें म्हणजे प्रसूति–वेदना जाणवूं लागतात. मनांत आशय आला असेल तो कवितेंत व्यक्त होतो हें ठरलेलेंच, पण कांहीं कांहीं वेळां सुराच्या सपाट्यांत निराळेंच शब्द उमटले

जातात व आशयाचे मुद्दे ध्यानीं मनीं नसतांहि बदलले जातात. एखादे वेळेस तर मनांत असतें एक पण तें बाजूस सारून उफळ-लेल्या सुरांच्या मागें दौडावें लागतें. हा अनुभव मला ' हटकणी ' व ' कलह ' या कविता स्फूर्त होत असतां चांगला आला. असें झालें म्हणजे अखेरीस या उच्छृंखलपणास आळा घालून सूर पूर्व-संकेतानुरूप उठविण्यास कसरत करावी लागते.

\+ +

एक मज ठावा पट्टीचा विद्वान

ग्रासे अहंपण परी जया

\+ +

★

## "अद्‌भुत द्वंद्वयुद्ध"

या खंडकाव्याचें रावसाहेबांच्या शब्दांत संविधानक.

प्राचीन काळीं, ज्याप्रमाणें भारतांत देवदानवांचीं (सुरासुरांचीं) म्हणजेच आर्यानार्यांचीं युद्धें होत असत, त्याप्रमाणें पलिस्तानांत (Palestine) पलिष्टी व एस्राएल या दोन राष्ट्रांचीं सारखीं युद्धें जुंपत. प्राचीन काळीं युद्धाचे सर्वसमंत असे कांहीं नियम होते. एखादे वेळीं एका राष्ट्राचा योद्धा द्वंद्वयुद्धाचें आव्हान देत असे व या युद्धांत जो योद्धा पतन पावेल त्याच्या राष्ट्राचा पराभव झाला, असें ठरविण्यांत येत असे. या नियमास अनुसरून एका युद्धप्रसंगीं पलिष्टी राष्ट्राचा गल्याथ नांवाचा एक योद्धा असलें आव्हान देण्यास सिद्ध झाला. हा योद्धा म्हणजे एक अजस्त्र धूड होतें. उंची सात हात. त्याचा भाला सामान्य माणसांस पेलणें देखील शक्य नव्हतें. आव्हान स्वीकारण्यास इस्रायल राष्ट्रांतील कोणीहि योद्धा धजला नाहीं. सकाळीं व सायंकाळीं अशा दोन वेळां चाळीस दिवस गल्याथानें हें आव्हान उच्चारिलें. बेथलेहेम गांवीं इशाय नामक गृहस्थाचें ईशभक्तिपरायण असें घराणें होतें. त्याच्या आठ पुत्रांपैकीं सर्वांत धाकटा मुलगा दाविद हा आपल्या घरच्या मेंढ्या राखीत असे. त्याचे तीन वडील भाऊ इस्राएलच्या छावणींत शिपाई होते. त्यांचा समाचार कळावा म्हणून बापानें दाविदला शिधा सामग्री देऊन तिकडे पाठविलें. चाळिसाव्या दिवशीं सकाळीं (माझ्या कल्पनेप्रमाणें) ज्या खोऱ्यांत उतरून गल्याथ आव्हान देत असे त्या खोऱ्यांत दाविद दाखल झाला. आव्हान ऐकल्यानंतर त्यानें देवाचा धावा केला असावा. (ही माझी कल्पना) आव्हान स्वीकारण्याचा त्यानें निश्चय केला व शौल राजाची भेट घेतली. दाविद मिसरूड न फुटलेला असा अननुभूत तरणाबांड जवान होता. राजानें त्यास युद्धास उभे राहण्यापासून परावृत्त

करण्याचा प्रयत्न केला, पण मेंढ्या राखीत असतां आपण एका सिंहास व अस्वलास कसें ठार केलें याचें त्यानें निवेदन केलें. राजाने त्यास शिरस्त्राण व चिलखत घालावयास लाविलें. पण तें इतकें जड होतें कीं तें काढून टाकून दाविदानें आपली मेंढपाळाची आकडीची काटी बरोबर घेतली. त्याच्या जवळ गोफणहि होती. जातां जातां यार्देन नदीच्या वाळवंटांतून त्यानें पांच गुळगुळीत गोटे निवडून बरोबर घेतले. सायंकाळीं गल्याथाची स्वारी आली तेव्हां दाविदानें आव्हान स्वीकारलें. गल्याथ त्याची चेष्टा करूं लागला व आपल्या सार्‍या देवांच्या नांवांनीं त्यास शाप दिला. तुझें शरीर गिधाडांना खावयास देईन असा त्यानें धाक घातला. दाविदानें प्रत्युत्तर केलें कीं माझा हवाला देवावर आहे. तुझा आयुधावर आहे पण देव माझा संरक्षक आहे. गल्याथ त्याच्यावर धावून जाण्यास सरसाविला तोंच दाविदाने गोफणींत गोटा घालून ती भिरकाविली. गोटा गल्याथाच्या कपाळांत घुसून तो बेशुद्ध होऊन भूमीवर पडला. दाविदाने धावून गल्याथाचीच तलवार घेऊन त्याचा शिरच्छेद केला. हें थोडक्यांत दिलें आहे. पण मुळांत फार चित्तवेधक आहे.

# अद्भुत द्वंद्वयुद्ध

(प्रास्ताविक कांड)

श्रीपरमात्मने नमः ।
जय विश्वेशा सर्वसमर्था
अणुरेणूंचा तूंच शास्ता
जय देवा तूं नामातीता
विघ्नहर्ता नमोस्तुते

२

स्वयंभू तूं परात्पर
सृजिलीं विश्वें तुंबा अपार
निसर्ग सृजिला किमयागार
अपरंपार अनुशासुनी

३

तुझीं कल्पिलीं नाना नांवें
जयास रुचलीं त्या त्या भावें
करुण भयादि प्रकृति स्वभावें
कुणास ठावें कशीं तरी

४

तुझ्या स्वरूपा आकळून
अत्यादरें इत्रीजन
देती तुजला नवअभिधान
सार्थ पूर्ण "या हवे" हें

५

वाच्यार्थ सरळ ऐसा वाहे
"जो आहे मी तो मी आहे"
तदितर नांव न मजला साहे
आदेशी हे जगदीशा

६

भूत भव्य सामावतीं
वर्तमानीं लीन होतीं
आस्तिक्याची पुरी महती
प्रतिपादिती गूढपणें

७

याच तत्वीं अनुरक्तुनी
पारसिकादि भाविकांनी
संबोधिलें तुज 'खुदा' म्हणोनी
स्वयंभू धनी तूंच एक

८

सर्व समर्था अनाद्यनन्ता
चराचरावरि तुझी सत्ता
निसर्ग केवळ तुझी मत्ता
तूं चालविता खराखुरा

९

परि शास्त्रज्ञा पडे भ्रांती
'निसर्ग' म्हणुनी नाचताती

नवयुबकांचीं मनें कर्षिती
प्रोत्साहिती स्वच्छंदा

१०

तूं बिश्वाचें आदि कारण
सद्‌गुणांचें समापन
सदाचाराचें प्रेरण
प्रतिबंधन मोहाचें

११

बंधन असलें उपेक्षून
स्वेच्छाचारें फिरती तरुण
व्हावें जें तें येई घडून
उगा दूषण दुर्दैवा

१२

कुणी असती सत्प्रवृत्त
प्रकृति स्वभावें सुगुणांकित
सदाचाराचें नितव्रत
सुखद निश्चित आचारिती

१३

गबसतां परि दुस्तर मोहीं
गौण्य नुबडे कुणि कधि कांहीं
अशा जाणिवें अस्ता जाई
अहा लबलाही सात्विकता

१४

कृत्रिमतेचें तळें निर्मिलें
भाव जलें तुडुंब भरलें
मोह तापें रितें झालें
बिंदू न मिळे ऐन समयीं

१५

कुणी सत्यनिष्ठ असती
पेंचप्रसंगीं परि वावरती
आपद्धर्म म्हणूनि त्यजिती
झणि सत्योक्ति असत्यपणें

१६

कुणांची ती त्यागवृत्ति
स्वजनांवरी अतुल प्रीति
तनमनधनाची आहुती
निःशेष देती नरश्रेष्ठ

१७

मिळे अपुरें तेंहि कदन्न
धड्डत न पुरतें तेंही जीर्ण
हाल जिवाचे ऐसे करून
अध्यापन कार्य करिती

१८

परी प्रियांचे हाल बघून
द्रव्यार्जना लोभें मन

नुक्रम........................ दि: ....................
मांक ........................ नों: दि: ..............


पूर्वध्येय होय हीन
जाति विसरून कुणी कुणी

१९

चळे ध्येय ये दुर्बिकार
बिद्यादान हो व्यापार
भरला उचल्यांचा बाजार
लूटमार करावया

२०

अहा मानसशास्त्रज्ञांची
चर्पट चाले मृदु मृदु बाची
दीन युबकां मोहुनि बंचि
ही निरयाची जणु प्राप्ति

२१

कामबिकारा नको रोधणें
हें तों निसर्गाचें देणें
इंद्रिय दमनें तया दडपणें
घातुक जाणें बदती ते

२२

नबलकथांची नबनिर्मिती
ललित कलेची पराकोटी
शृंगाराच्या गुलगुल गोष्टी
उत्पादिती ध्येयच्युती

२३

सुबक मोहक रेखिव जाल
गुंफियेलें सूक्ष्म निर्मल
पणास लावोनिया सकल
कला कुशल अष्टपदें

२४

रम्य गोजिरवाणी दिसे
श्रमपरिहारा शय्या भासे
मक्षिकेला लागे पिसें
सहज फसे नाशार्थी

२५

जन्मा येती जितुके प्राणी
सान थोर जीव झाडुनी
अधीन सारे कामोद्दीपनीं
प्रजोत्पादनीं स्फुरलेलें

२६

याच नियमें मानव जात
याच विकारें हो पीडित
संयमना परि अंतरिं वसत
सदा जागृत शक्ति एक

२७

श्वसन देवें प्रतिष्ठिलें
सत्वगुणा चरितें झालें

विवेक शक्ति नाम पावलें
संयमिं सजलें दुर्विकारा

२८

या शक्तीला डावलोनी
रमे मानव रतिचिंतनीं
विषय डोहीं जाय डुंबुनी
अधःपतनीं सज्ज होई

२९

पशुवृत्तीची जोपासना
कामुकतेची उपासना
कुणाकुणांच्या ग्रासी प्राणा
कोण गणना करूं शके

३०

प्रेम निराळें काम निराळा
एक दैवी गरळ दुज्याला
सुधा विषाचा ओंगळ काला
शांति सुखाला अंचवितां

३१

ब्रह्मचर्य तप उज्वल
भारतभूचें भूषण अतुल
जयांत सत्तम सरस सकल
योगबल संचलेलें

३२

चळें जयाच्या वीर्यशाली
हिरे चमकले तया काली
खुलुनि दिसे ती वीरावली
वैभवशाली भरतखंडीं

३३

विपुल सुवर्णाची खाण
लालचावें परकें मन
वीरभयें परि वक्र नयन
क्षेपी कोण काय कथा

३४

सकल विद्याज्ञान मंडित
तिचे विलसले मुनिपंडित
अतर्क्य कलांहीं अवगुंठित
हो कुंठित जगन्मती

३५

तिचे विणकर कुशलोत्तम
कर्पास तंतु कातुनि सूक्ष्म
वस्त्र विणिती अपूर्व तलम
जगीं अनुपम हें कसब

३६

अंगुष्ठांची कारागिरी
कधी ये ना इतरा सरी

मोलें बरचढ जरि जरतारी
वसन बहारी फिकें पडे

३७

तिच्या तिख्याची जात न्यारी
तीक्ष्ण कणखर वज्रापरी
गुणें लोभली दुनिया सारी
येरझारी लाभाया

३८

मिळवुनि दुर्मिळ तिखें असलें
पराजित पोरस नृपें योजिलें
शरणभेटीं अपूर्व ठरलें
मोहित केलें जगज्जेत्या

३९

मात करावी कालावरी
अशी जिगीषा उपजे उरीं
सह्यनगाच्या भेदुनि उदरीं
उभवे खरी अचाट कृती

४०

प्रकटति प्रतिकृति अतिसुंदर
विशाल सूक्ष्म शिल्प कुसर
चित्र कलेचें हें माहेर
स्फूर्ती घर मंगलमय

४१

कौशल्य एकवटुनी सारें
उभारिलीं हीं नरकुंजरें
प्रासादतुल्य शैलमंदिरें
अतुल हिरे भारताचे

४२

कुमारिका त्या कोमलांगा
कर्दळीच्या उभ्या रांगा
केतकीच्या वरिती रंगा
वश न ढंगा कसल्याही

४३

ईशश्रद्धा हृदयीं बसे
सात्विक तेज नेत्रीं विलसे
अंवतीभंवती अघतम निरसे
भ्रांत्या गवसे सौख्यशांती

४४

युवक तियेचे सुदृढ सुजाण
सतेज निर्भय हरी समान
विनीत वीर्याची ही खाण
आशास्थान राष्ट्राचें

४५

दिव्याध्याशी षडैश्वर्यी
जयें उघळिली ज्ञानपोई

अशा मुनींच्या बसुनी पायीं
ज्ञानोपायी मग्न होती

४६

पुरी देवाठायीं आस
चित्तिं भ्रमाचा लवहि न भास
नित श्रद्धेची धरोनी कास
सुबुद्धि विकास फला येई

४७

श्रद्धा अंतःशौचजननी
सुविचारांची उठावणी
उत्कर्षाची वरदायिनी
चिंतामणी स्वर्गीचा

४८

ओसरे हा दिव्यभाव
अंतःकलह साधी डाव
भारताचें मळलें नांव
जगतीं भाव पडी पडे

४९

श्रद्धा म्हणजे अंतःस्फूर्ति
देवाविषयीं मनिं आसक्ति
अंतरीची दिव्य ज्योती
सतत जागती तेवलेली

५०

श्रद्धा नोहे प्रतिपादन
तार्किक सत्य विश्लेषण
नोहें नुसतें नामस्मरण
अंधानुकरण खचित नाहीं

५१

मुखीं तिष्ठे देवनांव
अंतरीं धुमसे द्वेषभाव
धर्माचा वरि कोण आव
बाह्य छिडकाव श्रद्धेचा

५२

येतां जातां उच्चारिती
भगवन्नाम स्वैर घोळिती
हिंसा कार्यीं याच रीतीं
सरसावती नीच अधम

५३

ही श्रद्धेची निर्भत्सना
मानवतेची विटंबना
सात्विकतेच्या विध्वंसना
द्वेषभावना चेतविली

५४

बुद्धि प्रामाण्याच्या बळें
तर्क बळसें उगाळिले

श्रद्धा चळे दूरी पळे
भाव डळमळे अंतरीचा

५५

जनाराधन जया नांव रें
हेंही बरें तेंही खरें
धरसोडीच्या मार्गीं चरे
कां न बावरे नर ऐसा

५६

भजन रंगलें भक्तिरबांचें
नाट्य मुग्ध तालसुरांचें
इथें पाहिजे परि जातीचे
गवाळ्यांचें काम ना हें

५७

बोल दांभिक करुण रसाचे
लोट चालले वक्तृत्वाचे
इथे पाहिजे परि जीवाचे
अंतरीचे उच्छ्वास

५८

आपुलकीच्या उग्र ऊर्मी
खळखळ करिती अंतर्यामी
अंगीं बाणे उर्मट गुर्मी
घाव वर्मी घालाया.

५९

श्रेष्ठतम असुचें तत्वज्ञान
जल्पति इतरां हेटाळून
क्षुद्रतेचें प्रदर्शन
तामस गुण निश्चित हा

६०

सुजनावरि फिरवाचा डाव
हाच चित्तीं नित प्रस्ताव
श्रद्धा कसली अहंभाव
जयफाळिं हाव रोमरोमीं

६१

अढळ श्रद्धेचा जिता झिरपा
त्वरित शमवी मोह तापा
दूर टेवी महापापा
देवकृपा निश्चित ही

६२

प्रेम सेवा ज्यांचें अन्न
परदुःखाचें नित चिंतन
ईश सान्निध्याचें ध्यान
रात्रंदिन जया हृदयीं

६३

अशा सेविका श्रद्धावान
सर्वस्वाचें करिती हवन

ईश चरणीं समर्पण
तनमनधन शेष रहित

६४

स्वकीय परका भेद न भासे
रत्नें अवघीं भाव मनिं वसे
असो घाणवट कुरूपसें
अर्भक दिसे रम्य तया

६५

नित्य नेमीं सेवा करिती
रुग्णजनांच्या खस्ता खाती
उसंत लवहि न ऐशा रीतीं
देह झिजविती सत्कार्यीं

६६

यापरि रत या दया–दूती
त्रस्त पीडिता संगोपिती
लाचारांचा दुवा घेती
भुवनीं करिती स्वर्ग उभा

६७

जेथे पुरा श्रद्धाभाव
पैका हाच जिथे देव
तिथे कोठुनि दयान्याव
सजले साव उपरि जरी

६८

दीर्घाभ्यासी विधिरक्षक
शब्दश्लेषीं पुरे दक्षक
कैक गरिबांचे भक्षक
धूर्त तक्षक टपलेले

६९

कलहबीजा फैलाविती
जनहितामिषें डाव साधिती
गळीं भाबडे मीन अडकती
सुखें चरती पोटजाळू

७०

भेषजांची सजली टोळी
एक दुज्याची भरवी झोळी
एकमेकां देती टाळी
करिती कुचाळी गरिबांची

७१

कुणि धर्मात्मे लव न हावरे
परी हुडकवें कैसें त्या वरें
उडदामाजीं काळें गोरें
निवडणारें कई निवडे

७२

पढतमूर्ख कुणि नादान
ठोकुनि देई रोग निदान

परी अडला नारायण
वंदी चरण गर्दभाचे

७३

सेवाधर्म जयांचा बाणा
परिचारिका बिकत नाना
सजती पीडितजन पीडना
छळिती दीना धनलोभें

७४

साधुमिषें हा भोंदु आला
धनिक भोंगळ्या ईश्वर दिसला
भय मगरांचा थवा लोटला
कर्मी सजला किळसवाण्या

७५

उन्मादला लोक सारा
भ्रमें त्यजिलें युक्त बिचारा
दुनिया झुले झुलविणारा
वंचनारा जईं निपजे

७६

आला गरिबांचा कैवारी
थाटमाट झळके परी
कंचडळ हें रूपधारी
ही उदरी सबकलेली

७७

करी समतेची घोषणा
परी कवटाळी स्वार्थासना
पोळी वरी घृत कर्षणा
नित वासना उभी चित्तीं

७८

मातबाया घालमेला
जयाची गर्जे गिरा बावुळा
गरिबा भासे देव धावला
वाली अपुला निःस्वार्थी

७९

पैअडक्यांच्या पडती सरी
भरे तुंबडी लतमाजोरी
धटिंग भटा दिली ओसरी
निःशंक पसरी हस्तपाद

८०

येणेपरी नानाविध
धुंद व्यवसायीं मदांध
झुगारिती नैतिक बंध
कोण प्रतिबंध करी तयां

८१

सत्यनिष्ठेचा अभाव
अश्रद्धेचा पुरा उठाव

समाजतरुच्या मुळी घाव
अनर्थें डाव साधियेला

८२

भरुनी चालली लोकगंगा
स्वार्थी धनी मातवि दंगा
द्वेष असूया घालिति पिंगा
फिरेल इंगा कधिं देवा

८३

आक्रंदती जन बापुडे
आसवांचे पडती सडे
धनिक निर्घृण परी आवडे
शिकवी धडे त्यागाचे

८४

क्रांती क्रांती जन आरडती
परी घडतां ठरे भ्रांती
इथें पाहिजे हृदयक्रांती
खरी प्राप्ती स्वास्थ्याची

८५

विश्वेश्वरा तुझा पसारा
अगाध अथांग अतर्क्य सारा
कुणा वर्णवें या परिवारा
उकल पामरा केवि लभे

८६

नभीं दिसती तेजोगोल
रम्य मनोहर नित विलोल
गणूं जातां संख्याबल
हो अटकळ षट् सहस्त्र

८७

दूरदर्शिका घेतां हातीं
नव नव उडुगण नभीं प्रकटती
निर्मितीला कदा ना मिती
हीच प्रतीति प्रत्यया ये

८८

जों जों बधें दुर्विण व्यास
तों तों विकसे नभ विलास
नक्षत्रांची अभिनव रास
पूर्व कयास क्षुद्र ठरे

८९

गुरुतम दुर्बिण जी अर्जिता
मधुनि तियेच्या वेध घेतां
तारकांक भरे गणितां
अनुमानितां अब्ज च्यार

९०

शतपट व्यासाचा वाढावा
कालांतरीं शक्य जेधवां

कोटि गुणित तारकांचा थवा
दृश्य व्हावा निश्चित हें

९१

निपजति निश्चित श्रद्धाबळें
प्रेम त्याग सेवा फळें
जन गंगेचें जीवन नितळें
सहज उफळे तुष्टि पुष्टि

९२

संगें घेउनि ग्रहमंडला
भ्रमती तारे खंड न गतिला
एक लघु उडु तयांतला
सूर्य आपुला सहस्ररश्मी

९३

परार्धो परार्ध अंक दीन
न हो येणें खगोल गणन
धरा आमुची रजःकण
मानव कोण काय कथा

९४

घेतां झेंप अंतराळीं
भवंती फरके नव नवाळी
सृष्टि अद्‌भुत रसीं रंगली
विकल झालीं ज्ञानमूल्यें

९५

दिशा संज्ञा लोप पावली
आकाराची रेषा पुसली
नुरे भेद हा वरती खाली
अनंत पोकळी अनंताची

९६

अपरंपरार हें चिद्‌गगन
अदृश्याचें पुरें दर्शन
विधात्याची छवी प्रसन्न
प्रकटीकरण सत्याचें

९७

विश्वव्यापी विश्वेश्वर
भरुनि उरे हें अनंतांतर
अणु नियमनीं नित तत्पर
अदृश्य कर नियंत्याचे

९८

अनंताक्षिची प्रभा फाके
अतर्बाह्यीं दृष्टी फिरके
असो अशुभ वा असो निकें
लवहि न झाकें दृष्टिपथीं

९९

निर्मुनि जड भू उभी केली
नंदनवनें भूमीं तलीं

ठायीं ठायीं चितारलेलीं
रम्य वनाळी कलेश्वरें

१००

धरा नटली पुष्पलतांनीं
सजे पालवी गोजिरवाणी
नव लतांकुर रमती झुलनी
जणुं नर्तनीं नागपिलें

१

जीव सचेतन जरी अचर
कंद फलादि देती रुचिर
आस्वादाया विश्वंभर
निर्मी चर पशु पक्षी

२

द्विज युग्मांच्या मोहक तती
मधुरालापें भुवना भरिती
विविध पशूंच्या रम्याकृती
सहस्र रमती बागडुनी

३

कुशल जरी हे कलावंत
उपजत ज्ञानें मर्यादित
पुरेतपणीं निसर्गांकित
परंपरागत कला त्यांच्या

४

एकसूत्रीं चलन बलन
विभुवात्सल्यें संगोपन
हें प्रेमाचें उगमस्थान
पुर्ण जीवन जीवांचें

५

वत्सलता ही जरी उत्कट
सृष्ट जीवा न हो प्रकट
प्रेमीं हृदयीं परतभेट
हव्यास पेट सहज घेई

६

स्फुरे वांछा वत्सल मनीं
वात्सल्या जो समर्थ ग्रहणीं
स्वयं प्रेरित ऐसा कुणी
सुबुद्ध प्राणी निपजावा

७

आधिभौतिक आध्यात्मिक
जयांत सांगड ऐसा एक
जीव सृष्टीचा नायक
चतुर योजक निर्मियेला

८

विधात्याची ही प्रतिछाया
अमरतेची मर्त्य काया

अव्याहत ज्ञानाची किमया
नित स्पर्धाया निसर्गासीं

९

क्षुद्र दिसे जरि मानवप्राणी
देवाघरची अघटित करणी
दृश्या दृश्याच्या आकलनीं
ही निसरणी प्रश्नेंची

११०

घेउनि प्रश्नेची सहाण
ज्ञानमात्रा उगाळून
वितर्कांचीं पुटें देउन
सिद्ध अंजन संभ्रमाचें

११

संभ्रमाची झापड पडे
पात्रा पात्रीं दृष्टि अडे
संदेहाची प्राप्ती घडे
चित्तीं जडे अहंभाव

१२

कल्पकतेचें भरलें वारें
क्षुब्ध केलें अहंकारें
विवेक शीड अहा थरारें
हो मातेरें प्रश्नेचें

१३

पंचतत्वावरी मात
अल्पस्वल्प होता ज्ञात
कर्तुमकर्तुम् अहं समर्थ
अहा अविरत सोस चित्ता

१४

अहंतेचा गुंजे सूर
कोण कुठला तो ईश्वर
अज्ञांचे हे भ्रामक थेर
सूत्रधार निसर्ग एक

१५

वर्चस्वाची हुंगुनि भूल
धूर्त निपजे देव–खूळ
तन्नामाची उठविती धूळ
मिरविती हूळ धर्मगुरु

१६

देव नांवाचें मोहन
अपहर्त्यांचें प्रबळ साधन
निमूट सहती भाविक जन
असो जाचण कसली ही

१७

अशीं तर्कटें लढवुनि नाना
बुद्धि भेदण्या सजति योजना

आस्तिक्याच्या उच्चाटना
करिति जल्पना देवद्रोही

१८

कैक परी हे नास्तिक ज्ञानें
राशि ग्रहांच्या लागति भजनी
भवितव्येची नित पाहणी
सचिंत मनीं उभवलेली

१९

उठतां बसतां चाले होरा
स्वयें वंचती वंचिती इतरां
शुभाशुभांचा घोर पसारा
फोल घोसरा जीवाला

१२०

देव गेला दैव आलें
कुतर्क पिशाच्च सन्मुख ठेलें
पंचांगाविण पान न हालें
जळो जळें काज सगळें

२१

पथिं मृत्यु हा घातवार
गमना त्याज्य गमे अनिवार
सुखें क्रमिति पथ जन इतर
न हो कातर मन लवही

२२

ग्रहराशींचें वसतिस्थान
कुठें कितुसें अनुकर्षण
घरीं नियंत्री नरजीवन
अचुक निदान कल्पियेलें

२३

नव ग्रहांच्या निरखुनि गति
शुभाशुभ ठरविति जाती
प्रारब्ध फिरे घडतां युती
ही निश्चिती उरीं धरिली

२४

उलटे सुलटे जें जें अढळें
हेरुनि त्रसविति ठोक ताळे
फळा येतां जनता हुरळे
किती हुकले कोण गणी

२५

पाल पिंगळा काक शिंक
तिथि वारादि शकुन अनेक
तेहि न पुरती घेती अंक
सुखें निःशंक नाचविती

२६

कुशाग्रधीचा पीळ पिसाट
कल्पकतेचा कडेलोट

ज्ञान कसलें खूळ अलोट
अभूट अफुट अवनतीचें

२७

समीप उफळे जीवनझुळु-
दूषित नयनां सुमर्गी जरी
भ्रमे मृगजळीं जीव बावरा
होय घाबरा तृषातां

२८

धरा प्रसवी हिरव्या तृणा
झुंट धारिती प्रफुल्ल पर्णा
जीवनाच्या उभ्या खुणा
पटति न मना परि भ्रमें

२९

जयें सृजिली सृष्टि सकल
नित ओपी जो पुष्टी बल
जीवनाचा दाता सढळ
ईश सोज्वल अर्चनीय

१३०

हो शास्त्रज्ञां परि बावडें
आस्तिक्याचें गूढ कोडें
ठायीं ठायीं साक्षी खडे
वचति न तिकडे मूढ ज्ञाते

३१

उत्क्रांतीचा वाद मातला
कैक पंडितां व्यापुनि मुरला
समाज अवघा संभ्रमिं रमला
मेरू ढळला स्वास्थ्याचा

३२

संशयात्मे उभे तर्कटी
श्रद्धाळूंचीं हरिती तुष्टी
समाजाची मळली पुष्टी
अंतःसृष्टी ढासळली

३३

विलास प्रेरित मन बांकुडें
सुलभ ऐशा तत्वीं जडें
बंधनाच्या पलीकडे
सहज धाबडें घडोघडी

३४

अनंत शक्ति सृष्टि विधाता
अनुक्रमाचा पुरा भोक्ता
घोळंकार न रुचे तत्वता
तया भगवंता अणुमात्र

३५

गुणधर्माचें तंत्र सृजिलें
विकास ऱ्हास तत्व गोविलें

अल्प संकरा स्थान दिधलें
परिमित केलें उत्पादनीं

३६

केली शून्यीं संकल्पुनी
मूलद्रव्यांची पेरणी
जाय अवघी सृष्टी भरुनी
हो उभारणी जड भूची

३७

परमाणूंची सुप्त शक्ति
प्रकट होतां जन हादरती
ही तो अवघी चुणूक नुसती
परम प्रकृति कुणा जोखे

३८

खगोळ अगण्य उल्कांतून
गुरुत्व ओढ जया प्रेरण
चक्राकार गती देउन
कक्षाभ्रमण चालविलें

३९

या द्रव्यांचें विकृतिभवन
अल्पमात्र कुणा साध्य न
लोह कदा न हो सुवर्ण
करा विधान कसलें हि

१४०

कदा जाहलें आरंभण
कुणा करवें कालगणन
युगें जया दिसासमान
धनी भगवान कालाचा

४१

उद्भिज बीजें सिद्ध केलीं
गुणधर्मांच्या तंत्रें रुजलीं
झुण्ट तरु तृण स्वैर बहरलीं
धरणी नटली सौंदर्यें

४२

एकेक जाति परि अविकार्य
उत्क्रांतीची मात्रा काय
गोधूमाचा तंडुल होय
असंभाव्य कालत्रयीं

४३

असंख्य जिवांच्या अगणित जाती
एकेकीची भिन्न कोटी
मूल युग्मकें जन्मा येतीं
हो निर्मिती ईशेच्छें

४४

सूक्ष्म जंतु ते जीव श्रेष्ठतर
सारे सृजिले संगतवार

साम्यां साम्यांचा संभार
चित्र विचित्र उभारिला

४५

सुखदुःखाची जीवां प्राप्ती
जनन मरणा नसे मिति
उद्धारक संहारक शक्ति
अंबती भंबती वावरती

४६

नव नव जाती हो निर्माण
हो कैकांचें पुरे ध्वंसन
कासया ही अशी पिंजण
एक भगवान मात्र जाणे

४७

सूक्ष्मतम पेशी विस्तारती
स्वयें गुंफुनी जीवा सृजिती
क्रमें तयांची हो उत्क्रांति
या सिद्धांती भाव चळे

४८

परी अचानक उदया येती
अजस्र प्राणी पुन्हा नश्यति
ही न उत्क्रांति, परि क्रांति
घजे नियति, अतिपाता

४९

जीवावशेष अश्मीभूत
गतयुगांचे सच्चे दूत
जगदीशाचा कथिती हेत
संकल्पित कार्य त्याचें

१५०

संलग जाती ही अवतीर्ण
संकीर्णांचें पृथक् सृजन
संगतवारें नव नव भवन
गवसे विकरण कुठे न कदा

५१

सवर्णियांची समरूपता
सुलभ भासे विकार्यता
परि न देखिली अशी सांगता
रचनात्मकता कुणी कदा

५२

श्वेत मूषकांचे मेळे
प्रयोगशालीं बेटी धरिले
पिढ्यानपिढी अवेक्षण चालें
रूप न हालें इवलेंही

५३

दडपलेलीं भूगर्भ पोटीं
गवसे विकृत नर–करवंटी

इष्ट तर्कटा चढता पुष्टी
मोट बांधिती प्रमाणांची

५४

प्रमाणांची संचे चवड
जयांत मुरले तर्क बोजड
सव्यापसव्याची सांगड
तत्त्व भाकड मायावी

५५

बुद्धि बिताल अपूर्व प्रखर
लुटी ज्ञानाचें भांडार
बितर्कांची लहरी लहर
उभवी जहर ज्ञानपात्रीं

५६

अतुल व्यासंगाच्या बळें
तर्कान्वित सिद्धांत उगाळे
उपपत्तीचें निघो दिवाळें
परी झळाळे मांडणी ही

५७

संदेहाचा लाटुनि रवा
कल्पकतेचा भरुनी रेवा
सुबक रांधिला प्रलोभक मेवा
निश्चित गोवा विकल्पाचा

५८

विकल्पपात्रीं स्वैर घोळिले
तर्कटाचे तार्किक चाळे
ठोकुनि दिधले अळेवळें
भ्रामक सगळें विचारांतीं

५९

कल्पनोद्‌भूत तरंग उठले
भारे वाऱ्यावर बांधिले
जनतेपदरीं माप घातिलें
सत्य म्हणविलें खुळा असल्या

१६०

वितर्कांचा अवघा खेळ
कुशल साधिला ताळमेळ
पढत ज्ञात्या घाली भुरळ
म्हणती खूळ देवधर्म

६१

जरा येतां कोणी आड
लगे कोपती ताडमाड
विरोधाची कुठली चाड
म्हणति लिगाड अज्ञांचें

६२

ही तों पुरी भुलसावणी
दुरात्म्याची हुलकावणी

नास्तिकांची गुरकावणी
हुताशनी श्रद्धेची

६३

कोटिक्रमाचा व्यूह रचून
लागेबांधे बादरायण
वानरा ये मनुष्यपण
ठाम निदान उभे केलें

६४

मर्कट मानवरूप त्याला
मूळ स्वभाव परि कां सुटला
प्रवृत्तीचा लोप झाला
पुरा बदलला शक्य कां हें

६५

शाकाहारी मर्कट जरी
आद्य मानव मांसाहारी
बिसंगती ही नुमगे परी
अजब खोपरी ज्ञात्यांची

६६

मानव जाती प्रगतिकारी
प्रत्यहि वर्धे मति हावरी
कपी कोरडा पहिल्यापरी
गेलीं जरी अयुताब्दें

६७

घडता साम्याचें दर्शन
एकोद्भव हें गमें प्रसरण
विभ्रमतेनें भरलें भुवन
इकडे न मन पुरें वेधें

६८

सदृश्यता ही जरी बावरे
कंठीं कंठीं साद न्यारे
वैशिष्ट्याचें स्वैर फवारे
अहंकारें खेळविले

६९

मोटारीचें शिंग वाजे
तऱ्हेतऱ्हेचा नाद गाजे
परिचित असलेल्या आवाजें
तुरंत उमजे कवणाची

१७०

झाडुनि मुखडे वेगळाले
भिन्नत्वाचे खडे दाखले
वसणें फिरणें तेंहि निराळे
आळे पिळे भिन्न नाना

७१

पुरें साम्य कैक जुळ्यांचें
कोणकोणता कोडें साचें

ठसे उमटती व्यक्तित्वाचें
परिचयाचे मातृपितया

७२

विचारांची घडण निराळी
भिन्न भिन्न वाक्प्रणाली
वक्तृत्वाची भिन्न शैली
जनीं खेळली वैचित्र्यें

७३

असेंच चाले अंवती भंवती
वैचित्र्याच्या झडती नौबती
प्रकृति तितुक्या जितुक्या मूर्ति
सार्थ उक्ति सत्य ठरे

७४

पर्णा एका दुजें पर्ण
तुलितां भासें समसमान
सादृश्याची परी वाण
ये उमगुन निरीक्षणीं

७५

दो पानांची नसे संगती
रेषा अवघ्या भिन्न असती
फुलती तेवी नरतळहातीं
ही निष्पत्ती स्नायूंची

७६

घड्या उमलती बिविध अनेक
उघडझापा सुकरदायक
निर्मिति हस्तसामुद्रिक
सिद्धसाधक धूर्तपणें

७७

नर्मदेचे गोटे गोल
कैक गमती पुरे समतोल
विचक्षणा हें करी फोल
हरी आळ समतेचा

७८

द्वैत नांवारूपा आले
परि अद्वैतीं आकर्षिलें
अन्योन्याचें मीलन झालें
स्फुलिंग स्फुरलें अमरदिव्य.

७९

पुरी विषमता आसपास
परी झळके साम्याभास
सौंदर्याची ही आरास
उपन्यास सृष्टीचा

१८०

साम्य वैषम्याचा मेळ
स्फुरें यांतुनि गीत सुरेल

सृष्टि अवधी धरी ताल
सुसंगत चाल एकतानें

८१

मूक गान चेतोहारी
शांत रसाच्या उठवी लहरी
प्रसन्नतेला अवनी वरी
जीवित करी कृतकृत्य

८२

चक्रीं धरी कुंभकार
आर्द्र मृतिके दे आकार
क्रमें संचे घटसंभार
सुबक मनोहर एकघाटी

८३

सदृश सारे दिसती घट
परी साम्य न तंतोतंत
व्यक्तित्वाचा इथें हात
हो व्यंजित उघडपणें

८४

तशी देवा तुझी करणी
रमे विविध रूपें थटुनी

सज्ज सदा तव आविर्भवनीं
तत्वबोधिनी सत्वाची

८५

मीमांसेचा लागे छंद
विवेकाचा विरे बंद
अंतर्दृष्टी होय मंद
श्रद्धानंद दूर पळे

८६

तुज पुसटाया चाले डाव
परी अंतरीं दडे भाव
आपत्कालीं पडता घाव
घेई धांव तुझ्याकडे

८७

आस्तिक्याचें आविष्करण
हेंचि माझें सदाश्रयण
असो ऐसें सदा मनन
चळो न मन किमपीहि

८८

जयदेवा ! तूं प्रेम मूर्त
निज भक्तांचा वत्सल तात

तुजसमान प्रीतिवंत
अखिल जगांत कोण असे

८९

घाला घोर पडतां बघुनी
भक्तासाठीं ये धावुनी
अथांग तव प्रेमाच्या कथनीं
दुर्बल वाणी जड माझी

१९०

भक्तिबलाची अद्भुत कथा
वदवी वाचे जगन्नाथा
तुझ्या चरणीं ठेवी माथां
हो सर्वथा प्रेरक मम

९१

निरखी माझा उलथा पसा
कथानकीं या भरी सुरसा
रसनीं मम तव उमटो ठसा
हीच लालसा एकमेव

९२

करितां आतां आरंभण
मायबोलिचें घडे दर्शन

समर्थ दुजी न तिजसमान
रसपोषण करावया

९३

ये गे माझ्या मायबोली
सखये सजणे महाकाली
भावतरंग माझे पेली
प्रेमांजली वोपि तुला

९४

मायबोली मममानिनी
वीरकथांची रसवाहिनी
कथानकीं तिज अनुयोजुनी
पुरता मनीं धालों मी

९५

सह्यगिरीच्या अंकावरीं
दरीकपारी गहन कुहरी
निपज हिची झाली पुरी
दिगंतरीं फैलावें

९६

सह्यनगाचे पत्थर काळे
टंकारीता छिनी वेंभळे

तैसे जीवट हिचे उमाळे
कां न भाळे वीरवृत्ती

१९७

भरतखंडीं भाषा नाना
समर्थ व्यक्तावया भावना
एकेकीची परी घटना
तथा धारणा भिन्न भिन्न

१९८

थाट कुणाचा तो दरबारी
हांजी हांजी वाऱ्यापरी
मुखमें राम मनमें छुरी
असल्या सुरीं विलसे ती

१९९

एकीचे ते बोल बोबडे
मुखीं भासती धरिले खडे
'व' वर्णी 'स' वर्णी जिव्हा अडे
हे धिंडवडे भाषेचे

२००

रमे दुसरी मृदु मृदु बोली
देवघेवीं नित पाल्हाळी

श्रीमंतीचा टिळा कपाळी
परी गवाळी वृत्ति दिसे

१

आली तिजी खडखडाटे
जणुं भेकांची रटरट थाटे
हेल सुरांची गर्दी दाटे
हुल्लडिं वाटे सजे जशी

२

परी मराठी माझा बोल
धोपट मार्गी सोज्वळ सरळ
मर्द असे हा न्यारा डौल
कणखर बल भाषिकांचें

३

ही वीरांची वीरवाणी
मावळ्यांची अमृतस्त्राविणी
मराठमोळ्यांची वारुणी
भेडसावणी अरिवृंदा

४

श्रवणीं पडता साद गंभीर
वीरश्रीचा हो संचार

करी घेउनी रणझुंजार
सजती शिर बोपाया

५

रण शब्दाचा प्रतिध्वनि
शिवरायाच्या मावळवनीं
रमे दरबळे घुमे अजोनी
जाय भेदुनी दिक्काला

६

महाराष्ट्र भारतबाहू
महाराष्ट्र वीर बाहू
महाराष्ट्र अनीति राहू
दरिद्र साहू महाराष्ट्र

७

ही त्यागाची पुण्यभूमि
सतत विद्यार्जुनानुगामी
विलसे सदैव रत उद्यमीं
सेवाधर्मीं हर्ष हो हिला

८

तूं भारताचें आशास्थान
मानवतेचें दिव्य निशाण

धन समृद्धि तुझ्यावरून
ओवाळून टाकीन

९

करी हिजला परि जर्जर
स्वजन द्रोह व्याध दुस्तर
अन्योन्यावरि करिती प्रहार
कलहातुर पुत्र हिचे

२१०

क्षुद्र कारणी झोंबाडिती
एक दुज्याचें वर्म काढिती
बुद्धिबलाची झाली माती
उपहासिती परकीय

११

कधीं देवा, दैववशात
साडुनि अवघे घातपात
अखिल मराठा एकजात
एकचित्त विराजेल

१२

होईल होवो समीकरण
सुरम्य दिव्य संघटण

तोषतील माझे नयन
सुखें निर्याण करीन मी

१३

जुळणी झाली कथानकाची
लेखन साधन संभाराची
उसळे गर्दी ताल्सुरांची
परि अंतरिची तार नलगे

१४

शारदे गे करुणा करी
भावे दे घे तुला सुपारी
तिष्ठत बसलों तुझिया दारीं
संकट वारी दीनाचें

१५

कवी न मी परि असे रसिक
म्हणू नको मज आगंतुक
क्षुद्र जरी मी तव सेवक
मूक गायक एकनिष्ठ

१६

उभाराया तव संसार
अल्पस्वल्प हातभार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

घजलों लावावया दुष्कर
कार्यभार पत्करिला

१७

तव लाडेले साहित्यिक
मानपाना अत्युत्सुक
झुंज खेळती जसे शावक
श्वान बिडालक द्वाडपणें

१८

फूट घातुक सांधावया
ऐक्योद्भव बल एकवटाया
शिणविली ही वृद्धकाया
कष्टवुनिया एकतानें

१९

चाळगिली ना क्षिती जनांची
प्रियजनांच्या सद्रोषाची
कां न बारसा मी तुझाची
भीति कुणाची मला असे

२२०

मम हृदयीच्या सैल तारा
लावुनि छेडुनि करि झंकारा

खुलव फुलव मम चित्त विहारा
निपज फुलोरा रमणीय

२१

तालसुरांचें मधु स्पंदन
रसिक वरांचें काव्यगुंजन
करि न कुणाचें मोहित मन
अरसिक सोडुनि जगतीं या

२२

ही सौख्याची परमावधी
वैराग्याची पुरी समाधी
हिच्या प्रभावें दुष्कर आधी
दुस्तर व्याधी शमतील

२३

देवबापा! ये ये आता
तुजविण गुंफूं कसे संगिता
सद्‌भावांचा तूंच विधाता
तूं बोलविता मुकस्तंभा

२४

काव्यौघाचा मुग्ध छंद
कसा सावरूं मी मतिमंद

असो सदा मज तंव घरब्रंद
तूं सुखकंद ज्ञानाचा

२५

तिष्ठत असतां लय लावुनी
तुझ्या चरणी नत होउनी
प्रकृति स्वभावें जाता अडुनी
तुझी रेटणी मला लावी

२६

मुक्त कंठें छंद गावा
तुजला रुचे असल्या भावा
हीच भिक्षा दे गा देवा
हाच ठेवा हो माझा

२७

नादलुब्ध होता स्वरीं
नुपजो भाव भिन्न अंतरीं
चुकलों भुललों वाटेवरी
ने सत्वरी दयाघना

२८

तूं धर्माचा पूर्णोच्चार
संत कवींचा दिव्यविहार

तंव नामाचा जयजयकार
हो अपार विश्व भरुनी

२९

या हो आतां श्रोतेजन
शांत चित्तें करा श्रवण
तुम्हा ओपिलें हें रांधण
असो कदन्न असें परी

२३०

तरंग अंतर्यामीं स्फुरले
आले तैसे रेघाटले
रसिकापुढती मांडियेले
रुचोत रुचले कुणातरी

३१

कुणी कुचेष्टो नसे विषाद
स्तवन निंदा दोन्ही सुखद
आत्मानंदीं होय धुंद
कुणा पसंद असो नसो

३२

कथानकीं हें प्रथम कांड
पुरें होय न पडतां खंड

जयजयकार करा उभंड
कृपा उदंड त्या प्रभुची

## द्वितीय कांड

( अभिषेक कांड )

जयदेवा ! तूं प्रेम मूर्त
निज भक्ताचा वत्सल तात
तुजसमान प्रीतीवंत
अखिल जगांत कोण असे

२

सेवुनि वनिचा मुक्त वारा
प्राणवायुच्या सुधा धारा
पिंड सजला सतेज सारा
रोगा थारा केवि मिळे

३

आरोग्याची रम्याकृति
सात्विकतेची प्रसन्न मूर्ति
काव्यरसाची मूर्त स्फूर्ती
फिरके भवती बघतांना

४

वीरतेचें निर्भिड मन
शालिनतेचें चलनवलन
कविहृदयाचें हळवेंपण
ये घेउन जन्मातें

## तृतीय कांड

( आव्हान नामा तृतीयकांड )
श्री परमात्मने नमः ||

जयजय देवा विश्वचालका
निज भक्तांच्या विघ्नहारका
तूंच आसरा अम्हा भावुका
प्रतिपालका नमोस्तुते

२

प्रेममय जग संकल्पिलें
सुखशांतीचें भवन निर्मिलें
द्वेष असूया यांहीं भरलें
कां न कळे देवबापा

३

कार्यकारण भाव मंत्र
शास्त्रज्ञांचें अमोघ अस्त्र

दक्षुनि जपति अहोरात्र
परि तंव तंत्र उकलेना

४

समवायी वा असमवायी
कारण कसलें पडें न ठायीं
अशुभाविना मोल सवायी
शुभा न येई असेल असें

५

सत्वगुणयुत मानव सृजिला
जया अनिरुद्ध लभे चित्कला
स्वैराचारें दिव्यत्वाला
कसा मुकला मोह तापें

६

दुरात्म्याच्या गवसुनि भुली
सत्प्रवृत्ति क्षणें रुठली
दुर्विकारा मती सजली
सरसावली अशुभकर्मा

७

चित्तीं जडे अहंभाव
वर्चस्वाची उसळे हांव

अंकित इतरा करण्या डाव
नित अवास्तव मना ग्रासी

८

अन्योत्कर्षी उपजे हेवा
अपकर्षाया बांधी कावा
"नांदा, इतरां सुखें नांदवा"
फासी तत्वा हरताळ

९

कुणी उभविता प्रतिबंधन
भरे क्रोधें विकृत मन
करूं पाहे निर्दालन
इथें हनन सुरूं झालें

१०

समानवर्ती एकवटती
गटागटांची हो निर्मिती
यांतुनि राष्ट्रें उदया येती
प्रवर्तती झुंजाया

११

धारातीर्थी देह विसर्जन
करितां लाभे नंदनवन

भ्रमें ऐशा भारुनी मन
रणकंदन पुण्य भासें

१२

नरबंधूचें अमूल्य रुधिर
अमूप सांडावया अधीर
अधिकाधिक जो करी संहार
शूरवीर तया म्हणती

१३

निर्मुनि नव नव संहारक
शस्त्रें अस्त्रें प्राणघातक
स्पर्धा चाले भयानक
जणुं अंतक टपलेला

१४

शांतिः शांतिः शांतिरस्तु
घोष चाले मुखें, परंतु
टपति हराया प्राणतंतु
यांत न किन्तु किमपीहि

१५

लढवुनि नाना डावपेंच
चाले उभयीं डिवचाडिंवच

क्षणें शांतिचें विरल कवच
तडकुनि आंच फोफावे

१६

याच नियमें पलिस्तानीं
आग भडके अधुनी मधुनी
इस्रि पलिष्टी राष्ट्रं जुनीं
नित मग्न मनीं आक्रमणा

१७

सायंतनीं एके दिनीं
सीमारेषा ओलांडुनी
क्रमें पलिष्टी दल सज्जुनी
नजर चुकवुनी टेहळ्यांची

१८

धीरे धीरे सरकें आंत
चूपचाप रातोरात
पातें प्रभात समयिं प्रशांत
रम्य दरींत इस्रियांच्या

१९

हरित वसनें नटली दरी
समरभूमी जणुं साजिरी

सन्मुख दिसतां उभा गिरी
तयावरी सैन्य बैंधे

२०

दाटीवाटी न डाव रचिति
तळ दुर्भेद्य कराया झटती
नाना नाना व्यूह योजिती
उभारिती दुर्ग जणूं

२१

बळें कर्कती मग रणभेरी
नाद निनादे गगनोदरीं
मधुनि आरवे रणलल्कारी
हो घाबरी इब्रिजनता

२२

सुसज्ज कसबी नित कसलेली
इब्रिसेना त्वरें धांवली
वायूसवें गमे स्पर्धली
उधळित धूलि चोहिकडे

२३

अग्रभागीं दौडे थट्टुनी
जवें तुरंग दुग्धवर्णी

वरि आरुढे सरसेनानी
चतुरस्त्र रणी अव्वनेर

२४

भाले परशु खड्ग दुधारी
सवें घेउनी शस्त्रें सारीं
वेध धुरंधर धनुर्धारी
अश्वावरी अनुसरती

२५

लदुनि युद्धायुधें भारी
गर्दभ उंट वारूवरी
पथक निघालें पादचारी
मुंग्या परी रीघ लागे

२६

अश्वपथकें तोडियेलें
अंतर वेगें सहज लीलें
अचूक खोरें गांठियेलें
निरीक्षिलें शत्रुसैन्या

२७

शत्रु व्यापी पश्चिमगिरी
मात कराया तयावरी

विरुद्ध दिशेच्या खड्या डोंगरी
ठाण स्थावरी इब्रिदल

२८

तीन दिवस रात्र तीन
उभय पक्षीं शरसंधान
बीर धाडशी दरीं उतरून
अधुनमधुन स्वैर चाले

२९

प्रातः समयीं चवथें दिनीं
उठे पलिष्टी दलांतुनी
जयघोषाचा उर्मट ध्वनी
ही पालवणी युद्धाची

३०

बालार्कांची प्रभा पसरली
ढवळ्या किरणीं झांक गुलाली
पश्चिम सेना तेजाळली
उठून दिसली इब्रिदलां

३१

कसुनि कडकडे दुदुंभि रव
भित्या मना भीति प्रसव

व्यक्त कराया दल वैभव
आविर्भाव अहंतेचा

३२

एकाएकी हो स्तब्धता
पसरे शांत अशांतता
भवितव्यतेच्या उदरीं आतां
कोण आपदा दडे न कळे

३३

या परि एक घटिका सरे
विशिष्ट शंखनाद लहरे
संकेताया ऐशा स्वरें
आव्हान खरें द्वंद्वयुद्धा

३४

पलिष्ट्यांचीं पथकें तीन
उतरूनि जाती गिरीवरून
व्यूह आयताकृति रचून
तटति सजून दरी कांठीं

३५

उतरे निवडक इब्रिदल
रणसराइत चतुर कुशल

पूर्ण चंद्राकृति मंडल
थट्टुनि निश्चल उभें राहें

३६

आव्हानाया मग सत्वर
निघे पलिष्टी बलाढ्य वीर
चतुष्पादीं जसा कुंजर
अचाट नर दिसे असा

३७

फुंकित कर्णा क्रमें सेवक
पाठोपाठ ढालधारक
दोही बाजू देहरक्षक
नोकझोक वीराचा

३८

शिर्षी पितळी शिरस्त्राण
चिलखत पितळी गमे दर्पण
सूर्यकिरणीं लकाकून
बघतां नयन दिपवीतसें

३९

फुगबी दांड उरोभाग
मनीं बलाची उफळे आग

चिरडाया जणुं मत्त कजाग
शहाजोग पद टाकी

१४०

डोलत डोलत ऐबट चाले
पदाघातें धरणी हाले
खगगण भेणें दूर पळाले
तृण सळाळें भंबताली

४१

या परि तुडवित दर्पें धरणी
पावे अंतीं योजित स्थानीं
इभ्रिदलाच्या संनिधानीं
जाय थबकुनी निहाळाया

४२

पत्थराचा उभा स्तंभ
कीं हिप्पोचा केवळ दंभ
मृत्तिकेचा अजस्र कुंभ
अगडबंब दिसे असा

४३

लागे निसर्गाची लहर
मूस अचाट हो तयार

वडलें वाळ हें भेसूर
अकर नकर अडदांड

४४

षट् नि अर्ध हात देह
नका मानूं मिथ्यावह
कासया हो उहापोह
नसे संदेह तिळमात्र

४५

शतकांतरीं या चमत्कृति
कदाकाळीं प्रतीत होती
पाताळखंडी ऐशी व्यक्ति
असे संप्रती विद्यमान

४६

निरखुनि सज्जित इब्रीदल
क्षण खिंकाळे कुत्सित खल
उपसुनि म्यानांतुनि करवाल
दावी खेळ दटवाया

४७

गरगर फिरवी उग्र कृपाण --
अफाट फाडी ताम्र नयन

दंत विचकी धटिंगण
जणु सैतान अवतरला

४८

थटवुनि असले भीषण नखरे
आव्हानाया मग सांवरे
फुलवुनि स्वैर हातवारे
खर्ज स्वरें बोल बोले

४९

मत्त म्हशाचें डुरकावण
कीं श्वानाचें भेसूर रुदन
रासभाचें किंचालन
याहुनि स्वन कर्णकटु

१५०

म्हणे सजला युद्धा खास
शौल नृपाचे तुम्ही दास
पलिष्टी मी, उभयीं नाश
अटकविण्यास उभा इथें

५१

टाळावया रणकंदन
द्वंद्व युद्ध हेंचि साधन

रणनीती ही पुरातन
हिचें बंधन आज वाली

५२

निवडा कोणी वीर धाडसी
रणनिष्णात नी तामसी
हा गल्याथ गाथवासी
सिद्ध तयासी झुंजाया

५३

यदि प्रारब्धें ठरुनि सरस
करील तो मम प्राण नाश
होऊं आम्ही तुमचे दास
सेवायास निश्चित हें

५४

पडतां परि जर उलटा फांसा
मी तयाचा पाडिन फडशा
गुलाम बनवुनि करूं दुर्दशा
विना आशा अम्ही तुमची

५५

उभ्या इस्रायल दळभारा
करी आजी मी धिक्कारा

धाडा तरींच तुमच्या वीरा
लढूं संगरा ईर्षेनें

५६

समृद्ध आमुचें पलिस्तान
न बापाचें तुमच्या धन
कुटिल रीत्या हिरावुन
परत वरून कोकलता

५७

या चोरांनो, घमंडानों,
फुकट खाऊ, माजोऱ्यांनो,
या नीचानों, वाचाळांनों,
या बंढानों, या पुढतीं.

५८

करीन तुमचे निर्दालन
स्थंडिलाचें उच्चाटन
होइल तुमचें निःसंतान
ठाव ठिकाण कुणा न कळे

५९

निर्धारें मी मांडुनि ठाण
फेकी तोंडावरि आव्हान

धमक तुमची काय जाण
दिसतें ध्यान पुढें उभें

१६०

सैराबैरा बघता काय
म्हणा आता हाय हाय
प्यावया हें ज्वलत्कषाय
व्याली माय कोणाची

६१

असीमवत अपशब्दें हसडी
यथेच्छ उडवी मिरेंवडी
थाके होता जीभ बोबडी
निघे तांतडी परत शिबिरा

६२

असाच चाले छत्री खेळ
दिनें देबडें सांज सकाळ
इंग्रि सारे भयाकुल
अगतिक शौल भूप त्यांचा

६३

उगवे चाळीसावा दिन
तांबड धूलि फेके अरुण

ग्रंथ ...
वि: ...
नों वि: ...


रुपतां नयनीं जरा तरसून
दे उघडून बालरवि

६४

अनिलाची मग स्वारी आली
मित्रकार्या फुंकर घाली
[illegible]क गुलाली स्वैर पसरली
अवनी घाली टवटवुनी

६५

गताध्यायी कथिल्या परी
ये नेमका दाविद दरीं
निरखुनि परदळ रक्षकाकरीं
निघे सत्वरीं दलाकडे

६६

बंधुत्रय जे दलीं दाखल
तयां भेटुनी क्षेमकुशल
हो कळाया अतुराकुल
गाठी तळ तातडीने

६७

बंधुदर्शनीं तो सज्जन
करी अत्यादरें वंदन

सुखें चालतां संभाषण
दे अवधान एक चित्तें

६८

तोंचि थडके द्वाड श्वान
भुंकित नित्याचें आव्हान
भयें निसटति तयापासून
इब्रीजन दूर वेगें

६९

छचोर मदोन्मत्त बलगना
दाबिदाच्या बोचति मना
स्वीकाराया या आव्हाना
प्रबळ कामना चित्तिं उठे

१७०

उभे सन्निध जे सैनिक
पुसें तयासी वीर नायक
जिंकुनि हो जो तत्सूदक
पारितोषिक काय तया

७१

इस्रिदलाचा देव जागता
तया निंदी भीति न धृष्टा

असुन्नत पलिष्टाचा पेटा
असे करंटा कोण हो हा

७२

जन उत्तरती कीं जो कोणी
वधील यासी द्वंद्वीं लढुनी
भूप ओपिल तया लागुनी
होउनि ऋणि निज दुहिता

७३

गृहीं धनाची पडेल रास
जन्मांतरिची फिटेल आस
पितृकुलीं हो कुणी न दास
अभय खास लभेल तया

७४

दाविदाचा अग्रज भ्राता
संवादें या कुपे परिसतां
वडलाईचा फुगवुनि भाता
मद होत्साता खडसावी

७५

म्हणे ठावुकें मज तव गमजा
येशि बघाया संगर मजा

कुणा दिला उरणांचा कब्जा
बा अंत्यजा ! सांग मजशीं

७६

त्योचे कनिष्ठ सहोदर
क्षणे लोपे अग्रजादर
········जने कां न गोचर
········वीर ममागमना

७७

विन्मुख होवुनि करि सत्वर
सवालाचा पुनरुच्चार
भाव जाणुनी प्रत्युत्तर
पूर्वापर जन देती

७८

"धावे वीर" उठली भुमका
करि अस्वस्थ नवथर युवका
धकेल कैसा प्रसंग बाका
हान्वि धसका मन घेई

७९

मन विचारें चिंतातुर
पाय नेती न कळत दूर

निर्जन निबांत टेकावर
पावतां स्थिर उभा राहे

८०

अंतर्मुख हो व्याकुळ मन
लोपें सारें बाह्यज्ञान
केलें मागें आपत्त्राण
तोचि भगवान भवती भासे

८१

भाव सारे एकवटून
ईशचरणीं खिळवी ध्यान
भूवरि घालुनि लोटांगण
स्वरें करुण विनवीतसे

८२

म्हणे काय हें देवा! केलें
आपदार्णवीं आम्हां लोटिलें
निज राष्ट्राचें तुला असलें
········काय रुचलें

८३

जनतेनें तुज अवमानिलें
करूं नये तें सारें केलें

अनुतापाचे मूक उमाळे
मनीं दाटले परि आतां

८४

दुष्ट पलिष्टी क्रूरकर्मी
स्वार्थपरायण लोभी छन्नी
आक्रमतील अमुची भूमी
ये परिणामीं दास्य त्रिकट

८५

मग्न होता अशा तर्कटीं
भडके भयद आग पोटीं
धाव धांव या संकटीं
गा जगजेटी, उडी घाली

८६

भ्याड मूषका जशी मांजरी
धरी सोडी सोडी धरी
ऐशा लीला करितिल अरी
हो भयकारी दशा अमुची

८७

कर्मकरंटी नियती असली
कलथा घेउनि करीं बसली

तम तैलीं परते ढवळी
कशी कहाली जीवाची

८८

परवशतेचें दुर्धर व्यसन
याहुनि बरवें असें मरण
जित्या जीवीं मृतासमान
परांकित जन काळ क्रमिती

८९

तूं राष्ट्राचा अचल मेरू
दुर्बलांचा आशा ध्रुरू
भयार्णवीं तूं अभय तारूं
आस धरूं मात्र तुझी

९०

अंबती भंबती तापद ज्वलन
प्रसाद जलें करी तूं शमन
लाभाया तव दिव्य जीवन
तृषेलें मन ओळंघे

९१

तळपें मन मम भय चिंतनीं
झेप घेई तुझ्या चरणीं

तुजविण अम्ही केविलवाणी
तूंच शिराणी त्रस्तांची

९२

हस्त जोडी पदर पसरी
लोटांगण तंव चरणावरी
तुजविण संकट कोण निवारी
तूं कैवारी दुर्बलांचा

९३

आद्य पूर्वजा तुझी भाक
स्मरोनि अमुचा हो रक्षक
चुकले तरी तव सेवक
नत उपासक इव्रिजन

९४

मोहें सांडुनि परंपरा
रोषविलें तुज विश्वंभरा
कोपूं नको दयासागरा
तूंचि आसरा गा अमुचा

९५

तुझें लाभतां कृपादान
भीती सारी पळे धाकुन

कसेंहि येवो भय दारुण
तृणासमान भासमान

९६

देइन साधुनि इष्ट अडाखा
बलाढ्य अरिला प्राणतडाखा
तूं असतां मम पाठीराखा
प्रसंग बांका निस्तरेल

९७

भयानक जरी समरांगण
तूंचि माझें ओठंगण
समक्षतेचें तुझ्या मरण
रात्रंदिन मज होवो

९८

जीव राहो अथवा जावो
तुझ्या ठायीं जडला भावो
वक्षस्थल तव स्वस्थ विसावो
नित उंचावो तव महिमा

९९

उरण मी तूं मम पालक
ददात कसली मज न टाऊक

चण चण टिके क्षण न एक
तूं पोषक मम असतां

१००

स्वास्थ्य लाभो मजला म्हणुनी
सदैव रमशी मम चिंतनीं
मृदुल तृणांच्या सुखासनीं
हरित रंगणीं लोटविशी

१

व्हावें माझें तृषाशमन
उजाराया मम जीवन
नेशी मजला करीं धरून
निवांत प्रसन्न पानवठीं

२

धर्म मूर्त तुझें नांव
न्याय नीती यांची ठेव
असता माझा ऐसा भाव
देशी ठाव धर्ममार्गी

३

मृत्यु असला आ वासुनी
भीषण असल्या दरींतुनीं

तूं सांगाती असता गमनीं
न गांगरूनी जाइन मी

४

अधिबलाचें द्योतक वेत्र
दिव्य करीं तव विलसे यत्र
हिंस्र पशूंची त्रेधा तत्र
नाश सत्र सर्पांचें

५

बांकदार तव कणखर काठी
पथीं घसरतां मारी मिठी
घासपातीं सज्य पुरवठीं
उभय तुष्टी मम करिती

६

पात्र थाटिशी मम भोजनीं
वरमति शत्रु विलोकुनी
केशकलापा येता म्लानी
तैलमर्दनी सज्ज होशी

७

पुरविशि मजशी अन्न बिपुल
खाद्यपेय जें दुर्मिळ

सुग्रासांची रेलचेल
पुरी चंगळ हो माझी

८

परमेशाचें दिव्यालय
स्वास्थ्य जेथें निरामय
बसेन तिथें मी अक्षय
निःसंशय आनंदें

★

## चतुर्थकांड

(युद्धकांड)

जय जय देवा सर्वोत्तमा
सकल सद्गुणांच्या उगमा
अतुल सुखाच्या मंगल धामा
मूर्त प्रेमा ! नमोऽस्तुते

२

जीव सृष्टि यदा निर्मिली
सद्गुण बीजें तुवा पेरिलीं
सहकाराची दीक्षा दिधली
पुरी मुरली जीवमनीं

राठा
नुक्रम...
वि: ..................
...................... ग्रं: क्र: ..............



३

क्षुद्र बाळवी पिपीलिका
चतुर कसवी मधुमाक्षिका
सजति जीवन पथदर्शिका
अध्यापिका जीवमात्रा

४

साहचर्यीं उपजत ध्यान
जया प्रेमाचें कोंदण
सामुदायिक सहजीवन
हेंचि साधन स्वास्थ्याचें

५

संघराज्या प्रस्थापिती
एकमेकां साह्या देती
एकदुजाच्या खस्ता खाती
संगोपिती अन्योन्या

६

जय जय देवा कृपासागरा
कारुण्याच्या जित्या निर्झरा
त्रस्त पीडितां तुझाचि थारा
दीनोद्धारा नमोऽस्तुते

७

अन्योन्यीं नित सेवाधर्म
खरा सौख्याचें हें वर्त्म
तुवा लाविला देवा नेम
मनुज न मर्म परि उमगे

८

मर्त्य अवघी मानव जात
मनीं न आणे परि संकेत
अमर पट्टा लभे निश्चित
मन धुंदींत नित्य रमे

९

एकेक कलाकृति साबडे
प्रासाद भव्य डोळें अकडे
आकाशाची वीज कडाडे
क्षणे उलंडे धडाडुनी

१०

संपन्न रम्य नटली नगरी
हाव अक्षयतेची धरी
आकाशीची तुटता दोरी
कंपुनि उदरीं घे धरणी

\+ \+ \+

११

झुंजू मुंजू होते समयीं
परतुनी दरींत सैन्य येई
जरा विसावुनि गती घेई
गिरि लवलाही गाठियेला

१२

झुळुझुळु शीतल प्रभात भवन
दूर घालवी देह शीण
बालार्काचें रम्य किरण
देती उजरण जीवातें

१३

विजयोत्साहें ये उभारी
अल्पायासें चढती गिरी
सारुनि अडगळ दूर सारी
घुसति शिबिरीं पलिष्ट्यांच्या

१४

शिबिर रक्षणीं नियुक्तलेले
होते थोडे ते जागले
सैन्यागमनीं भांबावले
करिते झाले सूंबाल्या

१५

खवळे खोचक वचनें अरि
त्वेष न मावे लव अंतरीं
चवताळुनि प्रतिस्पर्ध्यावरी
भराया स्वारी सरसावे

१६

वीर नायकें अवलोकुनी
गोटा जुगवी झणी गोफणी
भरभर भवती भोंवडुनी
दे भिरकुनी नेटाने

१७

सणणण सुटे गुंफण गोटा
घुसे भेदित इंधक लाटा
कोण तयाचा गती सनाटा
पवन सुसाटा क्षुद्र भासे

१८

द्विभ्रूकुटींचा मध्य साधुनी
घसटे अर्धांगुळ रोवुनी
गल्याथ आघातें भोंवुनी
पडे धडकुनी भूमितलीं

१९

धूड आजस्र तें आदळतां
धरणी हदरुनि हो कंपिता
पतन अकल्पित असें देखता
हो भय भीता पळिष्ठी चमू

२०

भंग पावतां मर्मस्थान
उडुनी जाई देहभान
उपदि तडाइत भाळ ठेचुन
शेष चेतन लोप पावें

२१

बसता हबका सैलावुन
निसटें दूर शिरस्त्राण
पडे नागडी उघडी मान
विशाल भीषण दृष्टि पथीं

२२

उमगुनि अचूक लागे नेच
जाय धावुनी वीरोत्तम
तनुवरी चढे न घेता दम
निर्धास्त ठाम रोवी

२३

गल्याथाची सडक समशेर
उपसी म्यानांतुनि नरबर
पेलुनि बळें बेगवत्तर
मानेबर घाव घाली

२४

शीर्ष होता धडावेगळें
वेगें उसळुनि रुधिर भळाळे
क्षणें संचें घन थारोळें
लोंढा चाले तयांतुनि

२५

विजयोन्मादें करि उड्डाण
रुद्र मुद्रा दाबिद करून
उचली मस्तक केश धरून
यमा समान भीम दुसरा

२६

अबती भबती धरती न्हाली
फुले दूरवर तांबडलाली
कलत्या भानू किरणें आली
भडक झळाळी भयावह

२७

एके हातीं शिर उंचावी
मागे पुढती स्वैर हेलवी
करें दुज्या निज दला पालवी
गर्जुनि एवीं उच्चस्वरें

२८

हाणा मारा धूळ चारा
पलिष्टयांच्या सैन्यभारा
करा महत्तम संहारा
जरा न थारा कुणा द्यावा.

२९

उठे दलीं मग सभोंवार
गगनभेदी जय ललकार
इब्री सारे मिळविति सूर
जाय शिबिर दुमदुमुनी

३०

जरा शांतता हा जयघोष
गर्जे उच्च रवें वीरेश
गवसबिला अरि आजी खास
देवें नाश करावया

३१

आदेशा या सन्मानुनी
शिंग फुंकी सरसेनानी
शस्त्रें अस्त्रें सरसावुनी
सावधानी दळ तिष्ठे

३२

नादे सूचक रणतुतारी
अफाट सेना दौड मारी
अश्वारूढ धनुर्धारी
शरांच्या सरी वर्षविती

३३

घुसती पाठोपाठ पदाती
कराल शस्त्रें घेउनि हातीं
घायाळावरि तुटुनी पडती
तया धाडिती यमसदना

३४

गल्याथ पतनें गर्भांगीळ
हो आधीच पलिष्टी दळ
तशांत येतां घाला प्रबळ
काढी पळ जिवानिशी

३५

लोकांतरा भानु जाई
रजनीनाथ उदया येई
उसळे दंगल ऐशा समयीं
पळता भुई होय थोडी

३६

सांडुनि अपुलीं जड अवजारें
सैरावैरा पळती सारे
वीरश्रीचें भरुनी वारें
इंग्रि त्वरें लगट करिती

३७

पुढे पलिष्टी इंग्रि मागें
धायकुतीची शर्यंत लागे
भयें धाकुनी अरि वैतागे
भिडती वेगें इंग्रि तया

३८

खड्गप्रहार कोणी करिती
कुणी भालाग्रें वपु भोसिती
कुणि परशूचे घाव घालिती
शिरें विदारती क्रुद्धपणें

३९

पट्टा परजी कुणि चौफेर
सहज लीलें उडवी शिर
चमके चपलेसम समशेर
करिती वार सपासपां

४०

असेंच चालें हें शिरकाण
ससेहोलपट अतिदारुण
मढीं पडलीं छिन्न विच्छिन्न
असंख्य भयाण जागजागीं

४१

कैक योजनें दौड मारुनी
पलिष्ट्यांच्या ये एकोनी
मध्यान्ह रात जाय उलटुनी
तरी कंदनीं सैन्य रमे

४२

हात आंवरा मागें फिरा
करी सैन्याधीश इशारा
लुटाया पलिष्ट्यांच्या शिबिरा
त्वरा करा हुकुम सुटे

४३

युद्ध थांबवी विजयी सेना
हर्षोत्साह मनीं मावेना
जो तो करी आलिंगना
दुग्ध ज्योत्स्ना साथ देई

४४

हातीं घेउनि डफ मांजिऱ्या
जमती युवती भवती गोजिऱ्या
अर्धोन्मीलित कळ्या लाजऱ्या
गमती पऱ्या अवतरल्या

४५

मोरचंग कुणी सोडिती
सुरेल मुरली आलापिती
कुणी डफावरि ताल धरिती
गीतें गाती मधुस्वरें

४६

भूपस्तवार्थ एके मेळें
सूत्रबद्ध चरण गुंफिले
सहस्रावधि वधिले शौलें
असें गायिलें आवेशें

४७

आणि दाविद अमुचा वीर
करी अयुतांचा संहार
ऐसें सूचक प्रत्युत्तर
दे सत्वर समूह दुजा

४८

परिसुनि उसळे जयध्वनि
हजारों इस्त्रि कंठांतुनी
टाकी दिशा दणाणुनी
जय भेदुनी चतुःसीमा

४९

त्रिवार ऐसा जयजयकार
करिती इस्त्रि नारी नर
चला आपण मिळवुनि सूर
दावूं आदर वीरश्रेष्ठां

REFBK-0011990

५०

वीर रसमय कांड तुरीय
ईश कृपेनें पुरे होय

भक्तिबलाचा होई विजय
करा जय जय घोष मुदा

५१

येरे आतां पुरुषोत्तमा
ममांतराच्या सार्वभौमा
सुखशांतीच्या मंगलधामा
व्यक्त प्रेमा अतुलनीय

५२

तुझें राज्य जगीं उतरो
बंधुत्वाचें नातें पसरो
जगत आनंदानें भरो
समूळ विरो कलह असुया

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९९०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों दि ..............